पोलादपूरचा रणराक्षस

भा. रा. भागवत



कुमारांसाठी ज्यूल व्हर्न कादंबरी माला : १६

पोलादपुरचा रणराक्षस

अनुवादक

भा. रा. भागवत

राजा प्रकाशन

प्रकाशक
सौ. शुभदा ज्ञानेश्वर मुळे.
२२५ / ३ पांडुरंग भुवन,
ले.ज. रोड, शिवाजीपार्क,
मुबई : ४०० ०१६,
दुरध्वनी क्र : ४३० ०४ ०३.

© भा. रा. भागवत

प्रकाशन क्र : १३०

प्रथमावृत्ती : ३१ मे १९९८

मुखपृष्ठ व आतील चित्रे
अनिल दाभाडे

अक्षरजुळणी
अभिषेक टाइपसेटर्स
१२४३, सदाशिव पेठ,
पुणे : ४११ ०३०

मुद्रक
श्रीवेदविद्या मुद्रणालय
४०, बुधवार पेठ,
पुणे : ४११ ००२

ISBN - 81 - 7424 - 027 - 6

प्रास्ताविक

माझ्या कुमार मित्रांनो! ज्यूल व्हर्न या लोकविलक्षण लेखकाच्या कितीतरी कादंबऱ्या तुम्ही आतापर्यंत वाचल्या असतील. आधुनिक विज्ञानकथेचा त्याला जनक मानतात ते उगाच नाही. त्याच्या प्रतिभेने आतापर्यंत त्रिखंडात संचार केला आणि तुमच्या कल्पकतेला त्याने जागं केलं.

पण हा चतुर लेखक एवढ्यावरच थांबलेला नाही. तुमच्या हातात असलेली ही नवी कादंबरी वाचा म्हणजे तुमच्या आश्चर्यात आणखी भर पडेल. कारण आता त्याचं एक पात्र अंतराळात उड्डाण करतं आहे. तुम्ही म्हणाल, पूर्वीच्या पात्रांनी केलंच आहे की! चंद्रावर स्वारी, इतकंच नाही तर सूर्यावर सुद्धा स्वारी करून झाली. त्याच्या काही बहाद्दर पात्रांचा अकस्मात शेंडेनक्षत्रावर मुक्काम पडला आणि धूमकेतूच्या शेपटावर बसून ते अंतराळात भरकटत गेले. होय. त्याची तुम्ही मला आठवण करून द्यायला नको! त्यावेळीही ज्यूल व्हर्नने तुम्हाला अचाट उद्योग कसे करावेत त्याचे धडे दिले. पण त्यावेळचे त्याचे कथानायक विधायक दृष्टीचे होते. बाह्यत: ते हुकुमशहा वाटले तरी ते मानवाच्या कल्याणासाठी झटत होते आणि त्यांचा जनक एक द्रष्टा लेखक असल्यामुळे त्याने त्यांच्या हातात भविष्यकालीन यंत्रे दिली होती - जी आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मानवाच्या उपयोगी पडलेली आपण पाहतो आहे. पण विज्ञान आपल्या उपयोगी पडते तसेच आपला नाशही करते हे

या दूरदर्शी लेखकाच्या त्याच वेळी लक्षात आले होते. या नव्या कादंबरीतला खलनायक म्हणजे अक्षरश: एक कर्दनकाळ झोटिंग आहे. मानवाचा सत्यानाश करणे एवढेच त्याचे ध्येय आहे.

अलीकडे इराकी युद्धात दूरगामी क्षेपणास्त्रे शेकडो मैलांवरचे लक्ष्य गाठून कसा संहार करतात ते तुम्ही दूरचित्रवाणीवर पाहिलेत. ही क्षेपणास्त्रं पुढे अंतराळात सुद्धा शिरू शकतात. पण असं क्षेपणास्त्र देखील ज्यूल व्हर्नच्या दृष्टीने १८७९ साली पाहिलं होतं हे तुम्हाला माहीत होतं का ? तुमची उत्सुकता मी अधिक ताणत नाही. कराच वाचायला सुरुवात.

पण थांबा. एक गंमत सांगायची राहिली. ज्यूल व्हर्नकृत मूळ फ्रेंच कादंबरीच्या ज्या इंग्रजी अनुवादाला मी हे मराठी रूप दिले त्या पुस्तकाचे नाव आहे 'दि बेगम्स फॉर्च्युन.' हिंदुस्थानातल्या एका संस्थानिक राणीकडून मिळालेल्या अनपेक्षित संपत्तीवरच या कथानकातला प्रचंड उद्योग रचला गेला. सारेच काल्पनिक असले तरी हिंदू राणीला बेगम म्हणत नसत. ही एक लहानशी चूक ज्यूल व्हर्नकडून झाल्याचे लक्षात येते. ते असो; पण मुलांना आकर्षक वाटणाऱ्या नावाची ही कादंबरी बाजारात दुर्मिळ होती. आमचा मुलगा रवि लंडनला गेला असत त्याच्या इंग्लिश मित्राने ग्रंथालयातून पुस्तक आणून त्याची माझ्यासाठी झेरॉक्स प्रत पाठवली, त्यामुळेच मराठी वाचकांपुढे मला हा 'पोलादपूरचा रणराक्षस' उभा करता आला. याशिवाय रे कँटवेल याने मला ज्यूल व्हर्नचे सुंदर चरित्रही भेट म्हणून पाठवले. आमच्या या रसिक इंग्लिश मित्राचे सप्रेम आभार मानल्याशिवाय मला राहवत नाही.

—भा. रा. भागवत

अनुक्रम

१.	सॉलिसिटर शार्प धक्का देतात!	१
२.	दोन मित्रांचे दोन नमुने	९
३.	पैसा बोलतो आहे!	१४
४.	प्रतिस्पर्धी	१८
५.	एका आर्याचा तळतळाट	२३
६.	स्टालस्टाट अर्थात पोलादपूर	२८
७.	हा तरूण कोण ?	३१
८.	खाणीत काय घडले ?	३६
९.	एक पाऊल पुढे	४१
१०.	आधुनिक राक्षसाच्या गुहेत	४४
११.	प्रो. शुल्झ रहस्य फोडतो	४८
१२.	फ्रँकव्हिलला धोका!	५३
१३.	मरणाच्या दारात मॅक्स	५७
१४.	राखरांगोळी	६३
१५.	खतरनाक खबर!	७०
१६.	आणीबाणीची वेळ	७४
१७.	संकट टळले	७८
१८.	बचेंगे तो और लढेंगे	८२
१९.	व्यापारी जगात खळबळ	८६
२०.	शुल्झच्या शोधात दोन तरूण	९०
२१.	कोण आहे ते ?	९३
२२.	स्टालस्टाटच्या गाभाऱ्यात	९७
२३.	पहारेकऱ्यांचा परामर्श	१०१
२४.	भीतीने गोठवणारे दृश्य	१०५
२५.	शेवट गोड!	१११

१. सॉलिसिटर शार्प धक्का देतात !

"खरंच, काय झकास असतात ही इंग्लिश लोकांची वर्तमानपत्रं!" आरामखुर्चीत मागे रेलता रेलता डॉक्टरसाहेब उद्गारले.

डॉ. सॅरासिन एकटेच होते आणि तरी मोठ्याने बोलत होते. स्वगत बोलण्याची या श्रमिष्ट माणसाला सवयच होती.

वय वर्षे सुमारे पन्नास. चेहरामोहरा विलक्षण सुसंस्कृत. चष्म्यातून चमकणारे डोळे तजेलदार आणि चर्या गंभीर असूनही दिलदार.

लंडनच्या प्रमुख वर्तमानपत्रांवर ते तुटून पडले होते. दोन दिवसांपूर्वी 'आंतरराष्ट्रीय स्वास्थ्य परिषदे' पुढे त्यांनी जो प्रबंध वाचला होता त्याचे वृत्त त्यात छापून आले होते. रक्तपेशींची चिकित्सा करणारे एक उपकरण त्यांनी शोधून काढले होते, त्याबद्दलची ती माहिती होती.

पेपर खाली ठेवताहेत तोच हॉटेलचा एक वेटर खोलीत येऊन थडकला आणि त्याने साहेबांपुढे नम्रपणे एक कार्ड देऊन त्यांना आश्चर्याचा धक्का दिला.

"सॉलिसिटर? आणि मला भेटायला आलाय? तो कशासाठी? ...ठीक आहे, पाठव त्यांना आत."

काही क्षणांनी खोलीत प्रवेशला एक सडपातळ तरुण. छडीसारखा बारीक. जणू एक अस्थिपंजर. चेहरा नि अंगकांती प्रेताला शोभण्यासारखी. ओठ शुष्क नि पातळ. डोळे मात्र सुईसारखे तीव्र भेदक.

ही भकास व्यक्ती आत येताच अदबीने कंबरेत वाकली, आपल्या डोक्यावरची हॅट नि हातातली बॅग तिने खाली ठेवली आणि आपण होऊनच एका खुर्चीत बैठक मारीत तो म्हणाला, "माझं नाव वाचलंतच आपण. वुइल्यम हेन्री शार्प, ज्यूनियर. 'बिलोज, ग्रीन, शार्प अॅन्ड कंपनी' – तून मी आलोय....आपण डॉक्टर सॅरासिन ना?"

"येस सर."

"फ्रान्सुआ सॅरासिन?"

"अगदी बरोबर."

"दुआईचे?"

"होय. मी फ्रान्समध्ये दुआईलाच राहतो."

"वडिलांचे नाव इसिदोर सॅरासिन?"

"राइट."

एवढी खात्री करुन घेतल्यावर तरुणाने आपल्या कोटाच्या आतल्या खिशात हात घातला अन् आतून एक नोटबुक काढले. ते उघडून त्याने वाचले, "इसिदोर सॅरासिन पॅरिस शहरी, रू तॅरान रस्त्यावर ओतेल द एकोलमध्ये ५४ नंबरच्या खोलीत १८५७ मध्ये मरण पावले. हे

हॉटेल आता अस्तित्वात नाही--पाडलं गेलं आहे.--"

"सगळं कबूल," डॉक्टरसाहेब आश्चर्यात आणखी बुडत म्हणाले, "पण या सर्व गोष्टींचा----"

"त्यांच्या आईचं नाव--"मि. शार्प यांचे धारदार वाचन चालू होते, "ज्यूली लँजेव्हा, बेनेदिक्त लँजेव्हा या फ्रेंच गृहस्थांची कन्या. मूळचं वास्तव्य बार-द-ड्यू, लोरिओ लेन. मृत्यू १८१२. म्युनिसिपल रजिस्टरमध्ये तशी नोंद आहे. जिआं जॅक लँजेव्हॉ यांची भगिनी. जिआंसाहेब ३६ व्या लाइट इन्फन्ट्रीत ड्रममेजर होते---"

आपली वंशावळ ऐकता ऐकता भांबावलेले डॉ. सॅरासिन म्हणाले, "हे बघा, तुम्हाला माझ्याबद्दल जेवढी माहिती दिसते तेवढी मला स्वत:लाही नाही. पण तुम्हाला म्हणायचंय काय? जरा मुद्द्यावर या ना?"

"१८०७ च्या सुमारास--" ते मानवी तारायंत्र पुढे बोलू लागले, "या बाईंनी बार-द-ड्यू गाव सोडले. त्यांनी जिआं सॅरासिनशी लग्न केले होते १७९९ मध्ये. हे तुमचे आजोबा. कालांतराने मेलूगावचे ते रहिवासी बनले. तिथे ज्यूली १८११ मध्ये मरण पावली. त्यांना एकुलते एक मूल होते. नाव इसिदोर सॅरासिन. हे आपले वडील."

"मला माहीत आहे. ते तुम्ही सांगायला नको."

"त्या क्षणापासून ते पॅरिसमधल्या त्यांच्या मृत्यूपर्यंतची माहिती उपलब्ध नाही."

"ती मी देऊ शकतो," डॉक्टर म्हणाले. त्यांना स्वत:चे महत्त्व या सर्व संभाषणात आता प्रथमच जाणवत होते. "माझे आजोबा मुलाच्या शिक्षणासाठी पॅरिसमध्ये राहिले. त्यांच्या मनातून त्याला डॉक्टर करायचं होतं. त्याप्रमाणे माझे वडील डॉक्टर झाले. फ्रान्समध्ये व्हर्सायजवळ

पॅलेसो गावी त्यांनी प्रॅक्टिस केली. माझा जन्म १८२२ मध्ये झाला आणि वडील १८७२ मध्ये मरण पावले."

"दॅटस् इट्!" मि. शार्पनी एकदम तीर सोडला. "यू आर माय मॅन !...तुम्हाला भाऊ--बहीण ?"

"कोणीही नाही. माझ्या आईचं मी एकुलतं एक लेकरू. मी दोन वर्षांचा असतानाच आई वारली. आता तरी सांगा..."

अस्थिपंजर ताठ उभा झाला. "राजाबहादूर जोवाहिर मोथुरनाथ," खानदानी नाव उच्चारताना प्रत्येक इंग्रज माणूस जी अदब दाखवतो ती शार्पच्या बोलण्यात दिसत होती, "आपला शोध लावण्याचं भाग्य सर्वप्रथम मला लाभावं यासारखा आनंद दुसरा नाही. मी आपलं अभिनंदन करतो."

"या माणसाला नक्की वेड लागलंय !" डॉक्टरसाहेब स्वत:शी म्हणाले.

सॉलिसिटर शार्पच्या भेदक नेत्रांनी त्यांच्या मनातला हा मजकूर तत्क्षणी वाचला होता. ते शांतपणे म्हणाले, "मी वेडाबिडा नाही आणि कोणताही अमली पदार्थ न घेता पूर्ण शुद्धीत मी तुमच्याशी बोलतो आहे. 'राजा', या किताबाचे तुम्ही आज एकमेव वारसदार आहात. जिआं जॅक लाँजेव्हा १८१९ मध्ये ब्रिटिश नागरिक बनले. हिंदुस्थानात असताना त्यांनी गोकुलराणी हिच्याशी लग्न केले होते. राणीसाहेब १८१४ मध्ये मरण पावल्या. त्यांना पहिला एकच मुलगा होता. तो वेडसर निघाला आणि निपुत्रिक स्थितीत राणी १८६९ मध्ये मरण पावली. तोपर्यंत दौलतीचा कारभार ब्रिटिश सरकार पाहात असे. त्या राजपुत्राच्या मृत्यूनंतर बंगालच्या गव्हर्नरसाहेबांनी तुमच्या आजोबांचा 'राजा' हा किताब मंजूर केला. काही दिवस ते राजेसाहेब होतेही. पण पुढे काय ? नंतर तुमचे आजोबा होते कुठे ? वडील होते कुठे ? त्यांचा पत्ता लागत नव्हता."

डॉ. सॅरासिन यांचा आपल्या कानांवर विश्वास बसत नव्हता. तरी ते ऐकतच राहिले...

"संस्थानच्या इस्टेटीचे तुम्ही वारसदार आहात. आग्रा येथील कोर्टाने जो निकाल दिला आणि ज्यावर प्रिव्ही कौन्सिलने पुढे शिक्कामोर्तब केले त्यानुसार त्या वेडसर राजपुत्राच्या निधनानंतर संस्थानची सर्व स्थावर-जंगम दौलत विकण्यात आली आणि मिळालेली रक्कम बँक ऑफ इंग्लंडमध्ये जमा करण्यात आली. या खात्यात आजतागायत व्याजाची सतत भर पडलेली असून १८७० मध्ये ही रक्कम दोन कोटी दहा लाख पौंड एवढी झाली. म्हणजे तुमच्या फ्रेंच नाण्यात ५२ कोटी ५० लाख फ्रँक. म्हणजे आजमितीला..."

प्रत्येक शब्दागणिक आता डॉक्टरांच्या हृदयात जोरजोरात ठोके पडत होते.

"आजमितीला बँकेतल्या या खात्यावर एकूण जमा आहे ५२ कोटी ७० लाख फ्रँक एवढी प्रचंड रक्कम. कोर्ट ऑफ चॅन्सलरीपुढे तुम्ही आपले ओळखपत्र दाखल केलेत की तुम्हाला यातून वाटेल तेवढे पैसे चेकवर काढता येतील. दरम्यान--"

"दरम्यान काय ?" डॉक्टरांच्या मुखातून कसेबसे दोन शब्द उमटले.

"दरम्यान तुम्हाला मेसर्स ट्रोलॉप स्मिथ ॲन्ड कंपनी हे आमचे बँकर हवी तेवढी रक्कम ॲडव्हान्स म्हणून देऊ शकतात. तुम्ही मला फक्त ऑर्डर देण्याचा अवकाश--"

पण डॉ. सॅरासिन ऑर्डर कसले देतात ? ते मर्डर झाल्यासारखे खुर्चीत निपचित पडले होते. सॉलिसिटर शार्प यांच्या शब्दांनी त्यांना पुन्हा जीवमान सृष्टीत आणले.

"राणीसाहेबांचा वारस कोण याचा गेली पाच वर्षे पत्ता लागत

नव्हता. सारी पृथ्वी धुंडाळून झाली. अखेरीस काल तो पत्ता लागला. 'डेली न्यूज' या वर्तमानपत्रात मी बातमी वाचली की डॉ. सॅरासिन नावाचे गृहस्थ एका परिषदेत पेपर वाचणार आहेत. लगेच मी त्या परिषदेला हजर राहिलो. तुमचा चेहरामोहरा पाहिला. खिशात एक फोटो होता. तो काढून त्याच्याशी ताडून पाहिला अन् माझी खात्री झाली की तुम्हीच ते इसिदोर सॅरासिनचे चिरंजीव!"

हे बोलताना त्याने आपल्या खिशातून एक जीर्ण छायाचित्र काढले. "हा तुमच्या आजोबांच्या पोर्ट्रेटवरून काढलेला फोटो आहे. याच्याशी तुमचं इतकं साम्य आहे की त्याबद्दल शंका घेण्याचं कारणच उरलं नाही."

फोटोतला गृहस्थ उंच नि दणकट शरीरयष्टीचा होता. त्याची दाढी रुबाबदार होती. त्याच्या अंगात वर जरीबुट्टी केलेला मखमलीचा अंगरखा होता अन् डोक्यावर तुऱ्याची पगडी होती. हा राजबिंडा पुरुष खुर्चीमध्ये अशा थाटात बसलेला होता की जणू नव्या लष्करी मोहिमेची आखणी आपल्या अंमलदारांना तो समजावून देतो आहे. त्याच्या मागील बाजूस चित्रकाराने तोफेच्या धुराची घुसमट अन् तीत गुरफटलेले घोडदळ दाखवले होते. तो कदाचित नाटकाचा पडदाही असेल!

"आपण ही कागदपत्रं चाळून पहा. मी दोन तासांनी येतो" असे म्हणून हातातला लठ्ठ लिफाफा डॉक्टरांपुढे टाकून शार्प निघून गेला.

डॉ. सॅरासिननी ते कागद चाळून पाहिले आणि त्यांची खात्री झाली की सॉलिसिटर शार्पने सांगितलेली हकीकत शब्दन्‌शब्द खरी आहे. राणीच्या मृत्यूनंतर आपले आजोबा सैन्यातून निवृत्त होऊन आपल्या मायदेशात फ्रान्समध्ये येऊन राहिले. मुलाला शिक्षण देण्यात ते रमले होते. दरम्यान 'राजा' ही पदवी अन् गडगंज संपत्ती आपली वाट बघते

आहे याची त्यांना मरेपर्यंत कल्पना आली नाही!

सॉलिसिटर शार्प परत आले तेव्हा आपले बावचळलेले अशील पूर्णपणे ताळ्यावर आलेले त्यांना आढळले.

"तुम्ही दिलेल्या माहितीबद्दल मी शंका प्रकट केली याबद्दल मला क्षमा करा," डॉक्टरसाहेब म्हणाले, "हे कागद वाचल्यावर माझं भाग्य खरोखरीच फळफळलं आहे याबद्दल माझी खात्री झाली."

"दॅटस् ऑल राइट!" शार्प म्हणाले. "भाग्यवान आम्ही आहोत. यापुढेही आपले सॉलिसिटर म्हणून आपली सेवा करण्याची आम्हाला संधी मिळेल अशी मी आशा करतो."

"त्याबद्दल निश्चिंत राहा," डॉक्टर म्हणाले, "मी सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून असेन."

मि. शार्प निघून गेल्यावर डॉ. सॅरासिन टेबलाशी पत्र लिहायला बसले आणि त्यांनी आपला सुपुत्र ऑटो याला ही बातमी कळवून पुढे लिहिले;

"पोरा! ही अफाट संपत्ती आता आपल्या इतकी उपयोगी पडणार आहे--आपल्या अन् साऱ्या जगाच्या, की त्याची कुणालाही कल्पना येणार नाही. माझ्या डोक्यात उत्तुंग कल्पना घोळत आहेत. विज्ञानात जगाला थक्क करून सोडणारे प्रयोग मी करीन आणि साऱ्या मानव जातीला श्रीमंत करीन! तुझी आई नि बहीण...ती अद्यापि तशी लहानच आहे. या बातमीने तिचे माथे फिरून जाणार नाही. दोघीही समंजस नि शहाण्या आहेत.

आणि हो, मॅक्सला माझ्या शुभेच्छा दे. त्यालाही माझ्या योजनेत मी सामील करून घेणार आहे.

तुझा प्रेमळ पिता
फ्रॅन्कुआ सॅरासिन."

पत्राची घडी करून त्यांनी ते लिफाफ्यात घातले आणि वर त्याच्या पॅरीस येथील कला व यंत्रशिक्षण विद्यालयाचा पत्ता लिहिला. नंतर अंगात ओव्हरकोट घालून अन् डोक्यावर हॅट ठेवून वैद्यकशास्त्रातला हा मुकुटमणी हॉटेलबाहेर पडला. पत्र पोस्टाच्या पेटीत टाकल्यानंतर ही वल्ली अचानक धनलाभाचा हा विषय विसरूनही गेली.

●

२. दोन मित्रांचे दोन नमुने

डॉ. सॅरासिन यांचा पुत्र ऑक्टॅव्हियस हा मठ्ठ होता असे म्हणता येणार नाही पण तो फारसा बुद्धिमानही नव्हता.

त्याचा स्वभाव चंचल होता. निर्णय घेण्याची कुवत त्याच्यात नव्हती. कुठल्याही विषयात वरवरचे ज्ञान मिळवले की झाले अशी काहीजणांची वृत्ती असते तसा. जसा वारा वाहेल तशी पाठ द्यायची हे धोरण.

सुदैवाने शाळेपासून त्याला एका चांगल्या मित्राची जोड मिळाली होती. मॅक्स ब्रुकमन हे त्याचे नाव. हा तडफदार युवक त्याच्यापेक्षा एक वर्षाने लहान होता; पण शारीरिक, बौद्धिक नि नैतिक अशा सर्वच बाबतीत तो ऑटोपेक्षा वरचढ होता. पुष्कळदा तो ऑटोवर हुकमतही गाजवीत असे.

मॅक्स हा मूळ आल्सेस प्रांतातला. बाराव्या वर्षी पोरका झालेला हा मुलगा सॅरासिन कुटुंबाचा एक घटकच बनला होता.

वीस वर्षाचा हा युवक कॉलेजात दुसरा आला होता; आणि त्याची जिद्द होती पहिला येण्याची. ऑटोला तो सतत धीर देत असे. तसे त्याने केले नसते तर ऑटो कॉलेजपर्यंत पोचलाही नसता.

१८७० मध्ये कॉलेजची टर्म संपते न संपते तो युद्धाला सुरुवात झाली. आल्सेस प्रांत ऑस्ट्रियाच्या घशात जाणार असे भय दिसताच देशभक्त मॅक्सने सैन्यात नाव दाखल केले. त्याच्या मागोमाग ऑटोही लढाईवर गेला. मॅक्सच्या उजव्या खांद्यावर शौर्याची फीत झळकली. तह झाल्यावर पुन्हा दोघे मित्र पॅरिस शहरी खोली घेऊन राहू लागले. थांबलेले कॉलेज शिक्षण पुढे सुरू झाले.

युद्धात फ्रान्सला आल्सेस नि लॉरेन हे प्रांत गमवावे लागले होते.

मॅक्सच्या मनाला ती खंत डाचत होती.

१८७१ मधली ऑक्टोबरची २९ तारीख. संध्याकाळचे सात वाजले होते. मॅक्स एकीकडे कॉफी गाळत पुढ्यातले गणित वाचत होता.

मधेच दरवाज्यावर टकटक वाजले. पोस्टमन पत्र घेऊन आला होता. अभ्यासात मनापासून कधीच न रंगणाऱ्या ऑटोची स्वारी त्या व्यत्ययामुळे सुखावली.

''पपांचं पत्र दिसतंय,'' पोस्टमनकडून लिफाफा घेत तो म्हणाला.

ऑटोचे वडील परिषदेसाठी इंग्लंडला गेले असल्याचे मॅक्सला माहीत होते. पण गेल्याच आठवड्यात त्यांनी पॅरिसला एक धावती भेट दिली होती अन् या दोन्ही पोरांना 'पॅले रॉयाल' या एके काळी फॅशनेबल पण आता जुनाट बनलेल्या हॉटेलात शाही मेजवानी दिली होती. मग आत्ता लगेच पत्र येण्याचे कारण? त्याने पुन्हा हातातल्या गणिताकडे लक्ष पुरवले.

ऑटोचा आश्चर्योद्गार त्याच्या कानी पडला. ''काय झालं?'' त्याने चमकून मागे पाहात विचारले.

''हे वाच!''

मॅक्सने पत्र वाचले. एकदा वाचले, दोनदा वाचले. त्याचेही डोळे विस्फारत चालले होते.

''कमाल आहे!'' तो उद्गारला.

पण मग पाइपमधून धूर सोडीत तो पुन्हा कामाला लागला. ''दोन कोटी दहा लाख पौंड! मॅक्स, केवढी प्रचंड रक्कम ही!''

मॅक्सने मान वर केली. ''प्रचंड शब्दही - अपुरा पडेल ऑटो!...एवढ्या पैशाचं करायचं तरी काय?''

''मी सांगू?'' मॅक्स म्हणाला. ''दोन कोटी, दहा लाख पौंड देशाला

देऊन टाक. तेवढ्या पैशात आपल्या शत्रूने जिंकलेला आल्सेस प्रांत आपल्याला परत मिळू शकेल."

"काहीतरीच!" ऑटो कपाळावर आठ्या चढवीत उद्गारला. "हे असलं काहीच्या बाही सुचवू नकोस तू पपांना! ते धर्मादाय काही रकमा देतील त्या देऊ देत. पण आपल्याला या लाखो फ्रँकवरचं व्याज तरी मिळू दे जरा चैन करायला!"

"मला वाटलंच तू असं म्हणणार!" गंभीर वृत्तीचा मॅक्स म्हणाला. "ही रक्कम जर पर्वताएवढी नसती ना, तरच बरं झालं असतं. काही हजार माणूस समजू शकतो. तुला नि तुझ्या बहिणीला चैनीत राहायला तेवढे पुरले असते."

आणि पुन्हा हातातल्या कामाकडे वळताना तो म्हणाला, "अरे यार! तुझं चित्त ठिकाणावर नाही. तू जरा फिरायला जाऊन ये."

ऑटोचे अभ्यासाकडे लक्ष लागणे आता शक्य नव्हते. पडत्या फळाची आज्ञा घेऊन तो उठला अन् बाहेर गेला.

रस्त्यावरून थोडे चालल्यावर एक गॅसची बत्ती लागली. तिच्या खांबाला टेकून त्याने पुन्हा खिशातले ते पत्र काढून वाचले.

'दोन कोटी, दहा लाख पौंड! ब ब ब ब! बँकेत ठेवले तर वर्षाला कमीत कमी दोन कोटी पन्नास लाख फ्रँक व्याज मिळेल. पपांनी आम्हाला वर्षाकाठी दहा लाख दिले तरी पुरेसे होतील. आणि....आणि...."स्वगत बोलत असता त्याचा कंठ गदगदून आला होता. "आणि वर तो किताब - राजा!"

'हिंदुस्थानातल्या राजांचं काय ते वैभव विचारावं! मी स्वत:साठी दोन - तीन भव्य राजवाडे बांधीन. घोड्यांच्या पागा ठेवीन. एक उमदा घोडा माझ्यासाठी, एक मॅक्ससाठी! नोकरचाकरांचा, माझ्याकडे राबता

असेल...'

....त्याचे स्वप्नरंजन एकाएकी थबकले. त्याला आठवण झाली होती आपल्या आईची - लाडक्या बहिणीची.

'पपांनी त्यांना कळवलं असेल का ? तेवढा वेळ असतो कुठे त्यांना ! ते काही नाही. मलाच गेलं पाहिजे दुअईला. ही बातमी ताबडतोब आईच्या कानांवर घालायला हवी. ...पण....पण मॅक्स खोलीवर वाट पाहील त्याचं काय ?'

ही अडचण त्याने ताबडतोब दूर केली. त्याने आपल्या मित्राला तार करून टाकली. "मी गावी जात आहे. उद्या परत येईन."

आगगाडीतून जातानासुद्धा त्याच्या मनचक्षूपुढे आपल्या भावी ऐश्वर्याची चित्रे तरळत होती. दुअई स्टेशनात उतरून तो त्वरेने घरी पोचला त्यावेळी पहाटेचे दोन वाजले होते. आईच्या कानांवर त्याने ती विलक्षण बातमी घालताच ती व्यवहारी पण सत्प्रवृत्त बाई काही क्षण विचारात गढून गेली. मग "मॅक्सचं काय ?" त्या एकदम म्हणाल्या. "त्याच्याबद्दल काहीच बोलला नाहीस तू !"

"मॅक्स ! अगं आई मॅक्स म्हणजे कसला शिष्ट माणूस बनला आहे ! गंभीर तत्वज्ञानी दुढ्ढाचार्य ! एवढी प्रचंड संपत्ती आपल्यावर कोसळावी हे त्याला मुळीच आवडलेलं दिसत नाही. याचे परिणाम चांगले होणार नाहीत अशी त्याला भीती वाटते !"

सॅरासिनबाई गंभीरपणे म्हणाल्या, "मॅक्स विचारी मुलगा आहे. त्याची शंका अगदीच चुकीची आहे असं म्हणता येणार नाही. एखाद्याच्या पायाशी द्रव्याचा अचानक ढीग येऊन पडला तर तो माणूस बिघडणं अशक्य नाही. अशी उदाहरणं घडली आहेत."

छोटी जीनेट झोपली होती. पण याच क्षणी ती नेमकी जागी झाली

अन् म्हणाली, "ममी, तू म्हणतेस ते अगदी खरं आहे. मॅक्सदादा खूप खूप शहाणा आहे. तो कधीच खोटं बोलत नाही." आणि एवढेच बोलून कुशीवर वळून ती परत झोपी गेली.

●

३. पैसा बोलतो आहे!

आंतरराष्ट्रीय स्वास्थ्य परिषदेची आज चौथी बैठक सुरू होती. पण डॉ. सॅरासिन यांना या खेपेस जो अनुभव आला तो पूर्वपिक्षा किती वेगळा होता! त्यांनी हॉलमध्ये पाय ठेवण्याचा अवकाश, सभेचे अध्वर्यू नेक नामदार लॉर्ड ग्लॅन्डोव्हर स्वत: उठून त्यांना सामोरे गेले. यापूर्वी एवढा मान त्यांना कधीही मिळालेला नव्हता. हा महापुरुष त्यांच्याकडे कधी ढुंकूनही पाहत नसे किंवा कधी काळी पाहिलेच तरी विज्ञानाचा एक मामुली धडपड्या विद्यार्थी म्हणून एखादा कौतुकाचा कटाक्ष त्यांच्याकडे टाकून लगेच आपली नजर दुसरीकडे वळवीत असे.

आज डॉ. सॅरासिनसारख्या त्यांच्या दृष्टीने य:कश्चित् वाटणाऱ्या माणसाचे स्वागत करण्यासाठी हा मान्यवर नेता पुढे आला आणि त्याने त्याला आपल्या उजव्या हाताच्या खुर्चीवर बसवले. बिचारा त्यामुळे चकित तर झालाच, पण त्याला समाधानही वाटले. उशिरा का होईना आपल्या संशोधनाची महती विद्वन्मान्य झाली असावी असा त्यांचा समज झाला. पण लॉर्डसाहेबांच्या नंतरच्या कृतीने त्याचे लगेच निवारण झाले.

आपल्या पाठीच्या कण्याला किंचित फिरकी देऊन लॉर्ड ग्लॅन्डोव्हरनी त्यांच्याकडे वळल्यासारखे केले अन् त्यांच्या कानाला लागून ते म्हणाले, "तुम्हाला नुकतीच मोठी दौलत मिळालीय म्हणे? किती...दोन कोटी दहा लाख पौंडांची, नाही का?"

त्यांचा स्वर किंचित् रोषयुक्त व्यथित असा होता. त्यांना जणू म्हणायचे होते : "हे आधी कसं कुणी मला सांगितलं नाही?"

त्यांच्याच पलीकडे बर्लिनचे नामवंत पंडित डॉ. ओव्हिडियस बसलेले होते, त्यांच्याही मुद्रेवर आता एक खोटे पुसटसे स्मित झळकले आणि

त्यांनी आपली पुष्टी ज़ोडली, "सॅरासिन्, डेली टेलिग्राफने अगदी योग्य शब्द वापरलेत तुमच्याबद्दल. हा पेपर म्हणतो की तुम्ही आता रॉथशील्टच्या पंक्तीला जाऊ बसलात." असे म्हणत त्यांनी आपल्या हातातल्या वर्तमानपत्राची घडी त्यांच्या पुढ्यात केली.

रॉथशील्ट! युरोप - अमेरिकेतले सर्वात धनसंपन्न घराणं! आणि त्याच्याशी आपली तुलना केली जाते!

डॉ. सॅरासिननी थरथरत्या हाताने तो अंक उघडला अन् पाहिले तो आत ठळक जागेत टोलेजंगी मथळा देऊन आपल्या 'भाग्योदया' ची बातमी छापलेली. "आपले सारे तारुण्य ज्याने विद्येची सेवा करण्यात घालवली त्या प्रसिद्धिपराङ्मुख पुरुषावर आता हिंदुस्थानची लक्ष्मी प्रसन्न झाली असून त्याच्या आतापर्यंतच्या निरलस उद्योगाचे चीज झाले आहे. या संपत्तीचा विनियोगही हा महान शास्त्रज्ञ योग्य प्रकारे करील याबद्दल आम्हाला शंका वाटत नाही" अशा शब्दात सॅरासिनवर स्तुतिवर्षाव करण्यात आला होता.

डॉ. सॅरासिननी त्या मजकुरावरून धावती नजर फिरवली आणि त्यांची पहिली प्रतिक्रिया जर कोणती झाली असेल तर ती त्रासिकपणाची. त्यांना विलक्षण उद्वेग वाटला. आपली किंमत आता वाढली आहे हे खरं. भयंकर वाढली आहे - दोन कोटी दहा लाख पौंड! पण - पण सोन्या-चांदीच्या झगमगत्या समुद्रात आपलं क्षुद्र व्यक्तित्त्व पार बुडून गेलं आहे अशी काही तरी विचित्र जाणीव त्यांना झाली. तशाच स्थितीत ते भाषणाला उठले तेव्हा टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

ते म्हणाले, "सज्जनहो! या अचानक द्रव्यलाभाबद्दल माझा गौरव करू नका. ("नाही - नाही! करणार - करणार!" च्या आरोळ्या) या अफाट संपत्तीचा उपयोग कसा करावा हे समजण्याइतकी अक्कल

माझ्यापाशी नाही. त्यामुळे या संपत्तीचे विश्वस्त म्हणून मी या परिषदेची नियुक्ती करतो आहे!"

यावर साऱ्या सभेत जी काही खळबळ उडाली तिचे वर्णन शब्दात करणे खरोखर कठीण आहे. सर्व सभाजन ताडदिशी उभे राहिले हे तर झालेच, पण आनंदाचा नुसता जल्लोष झाला. काही जण चक्क टेबलावर चढून 'हुर्रे' करू लागले.

लॉर्ड ग्लॅन्डोव्हर एकटेच निश्चल राहिले. आपल्या प्रतिष्ठेला शोभेशा शांतपणे ते उभे होते. त्यांची पूर्ण खात्री होती की डॉ. सॅरासिन श्रोत्यांची मस्करी करतो आहे. असले काही भव्य दिव्य करण्याइतका महामूर्ख तो खास नाही.

सभेत जरा शांतता प्रस्थापित झाल्यावर डॉ. सॅरासिन पुढे म्हणाले, "मित्रहो, माझी कल्पना अशी आहे. सार्वजनिक आरोग्य - ज्यासाठी आपण या सभा घेत असतो - अन् सार्वजनिक सौख्य यासाठी या पैशाचा उपयोग करण्यात यावा. साधनसंपत्ती आपल्या हाताशी भरपूर आहे; तेव्हा आपण आपली सर्वांची बुद्धी एकवटून अशा एका नगरीची रचना करूया की जे सर्व जगाला आदर्श असं शहर ठरेल. योजनाबद्ध नि शास्त्रशुद्ध असं हे शहर असेल. दारिद्र्याने गांजलेली, रोगाने पछाडलेली आणि आक्रमकांच्या छळामुळे नाडलेली असंख्य जनता साऱ्या जगभर पसरलेली आहे. हे लोक कोणत्याही राष्ट्रातले असोत कोणतीही भाषा बोलणारे, कोणत्याही धर्माचे असोत, त्यांना आपण बोलवून घेऊ. या नवनिर्मित नगरात त्यांना काम मिळेल, शिक्षण मिळेल, वेतन मिळेल. त्यांना आपण सुविद्य बनवू, आरोग्यसंपन्न करू. त्यांच्या नीतिगुणांचे संवर्धन करू. आपण शाळा उघडू, कॉलेज उघडू, प्रयोगशाळा बांधू..."

डॉ. सॅरासिन खाली बसले आणि पुन्हा एकदा लॉर्ड ग्लॅन्डोव्हरनी

किंचित वाकून एक डोळा किंचित मिचकावीत त्यांच्या कानाशी कुजबूज केली, "छान! पैसे गुंतवावेत तर असे! तुमचा बिल्डिंग प्लॅन तर मस्त आहे. बँकेच्या व्याजापेक्षाही जास्त पैसे सुटतील यातून! डॉक्टरसाहेब, आत्ताच सांगून ठेवतो माझ्यासाठी एक बंगला राखून ठेवा."

आपल्या सूचनेची अशी वावडी उडालेली पाहून डॉ. सॅरासिन चाटच पडले. लॉर्डसाहेबांचा भ्रम ते तत्क्षणी उत्तर देऊन दूर करणार होते; पण तेवढ्यात त्यांच्या अभिनंदनाचा जो प्रस्ताव चालू होता त्यातले शेवटचे शब्द त्यांच्या कानावर पडले.

माननीय वक्ते बोलत होते, "आजपर्यंत युद्धापायी लक्षावधी पौंडांची जी राखरांगोळी होत होती, त्यापेक्षा संपत्तीचा हा उपयोग निश्चितच चांगला आहे. या नव्या नगराला तिच्या संस्थापकाचंच नाव देणं योग्य ठरेल. मंडळी, सॅरासिनी सिटी हे नाव कसं काय वाटत आपल्याला?

ही सूचना ताबडतोब मंजूर झाली असती, पण डॉ. सॅरासिन आधीच उठून म्हणाले, "नाही! व्यक्तीचं नाव देण्यापेक्षा राष्ट्राचं नाव देऊया आपण." फ्रँकव्हिल!"

●

४. प्रतिस्पर्धी

'डेली टेलिग्राफ' मधली ती बातमी इतर इंग्रजी वृत्तपत्रांनी उचलली. एका जर्मन दैनिकाने ती जेव्हा तीन नोव्हेंबर रोजी ठळक शब्दांत छापली तेव्हा तिने अखेर जेना युनिव्हर्सिटीतले प्राध्यापक प्रो. शूल्झ यांच्या अभ्यासिकेत प्रवेश केला.

प्रज्ञावंतांच्या प्रभावळीत प्रो. शूल्झ यांचा दर्जा फार मोठा असला तरी त्यांचे व्यक्तिमत्त्व मुळीच आकर्षक नव्हते. सेहेचाळीस वर्षे वयाचा हा शास्त्रज्ञ अंगाने जाडजूड होता. भक्कम बांधेसूद खांदे त्यांच्या सुदृढ प्रकृतीची साक्ष देत. डोक्याच्या पुढील भागाला टक्कल पडलेले असून मागच्या बाजूलाही जे तुरळक केस होते ते लोकरीच्या धाग्यांसारखे वाटत. जिवणी मोठी आणि आतले दातही मोठे नि तीक्ष्ण वाटत. जणू तोंडाशी आलेल्या प्रत्येक पदार्थाचा चावा घ्यायला टपलेले.

आज जेव्हा सकाळची डाक घेऊन त्यांचा नोकर अभ्यासिकेत शिरला तेव्हा कट्ट्यावरच्या घड्याळाकडे पाहत त्यांनी खणखणीत आवाजात त्याला सुनावले, ''सहा पंचावन्न! साडेसहाला डाक येते. तू आज पंचवीस मिनिटं उशीर केलास. पुन्हा जर का पाच मिनिटं उशीर झाला तर तुला मी नोकरीवरून काढून टाकीन, समजलास?''

नोकराने मागे वळताना म्हटले, ''साहेब, जेवण तयार आहे.''

''मी सात वाजता जेवतो, माहीत आहे ना? तुला माझ्याकडे राहून तीन आठवडे झाले. पुन्हा पुन्हा सांगण्याची गरज पडू नये!''

याच डाकेत 'ती' बातमी देणारा वर्तमानपत्राचा अंक होता; पण टपाल तूर्त तसेच पडून राहिले आणि प्रोफेसरसाहेबांची स्वारी आपला लेख पुरा करण्यात गुंतली. लेखाचे शीर्षक होते : 'प्रत्येक फ्रेंच माणूस

कोणत्या तरी अनुवंशिक विकृतीने पछाडलेला असतो, असे का?"

लेख अर्धा लिहून झाला. दरम्यान शेजारच्या गोल मेजावर त्यांचे भोजन वाढून तयार होते. त्यावर प्रोफेसरमहाशय तुटून पडले. जेवणाचा फन्ना उडाल्यावर त्यांनी कॉफी मागवली अन् ते पाइपमधून धूर सोडीत बसले.

लेख पूर्ण झाला त्या वेळी मध्यरात्र उलटली होती. पत्रे पाहून त्यांनी बाजूला सारली अन् झोपण्याची तयारी केली. पलंगावर पडल्या पडल्या त्यांनी वर्तमानपत्र उलगडून डोळ्यांपुढे धरले. 'अतिप्रचंड धनलाभ!'या

मथळ्याखालच्या मजकुरात 'लँजेव्हॉल' हे नाव दिसले. तेव्हा त्यांना कसली तरी पुसट आठवण झाली; पण संदर्भ नीट लागेना. डोळे तर मिटायला आले होते. तेव्हा मेंदूला अधिक शीण न देता ते निद्रेच्या अधीन झाले.

पण स्वप्नातसुद्धा ते 'लँजेव्हॉल' नाव त्यांना सतावत होते.

सकाळी उठल्याबरोबर पुन्हा ते नाव मेंदूत तडकले आणि अकस्मात प्रकाश पडल्यासारखा झाला. त्यांनी जमिनीवर पडलेला 'डेली टेलिग्राफ'चा अंक उचलला आणि पुन्हा एकवार ती बातमी समग्र वाचली. मग ताडकन उडी मारून भिंतीवरच्या आरशाजवळ टांगलेली एक छोटी तसबीर त्यांनी खिळ्यावरून ओढून काढली; तिची मागील बाजू शर्टाच्या बाहीने पुसली अन् धुळीखाली पुसटत्या शाईत खरडलेला मजकूर विस्फारलेल्या डोळ्यांनी वाचला.

'थेरेसा शुल्झ : माहेरचे नाव लँजेव्हॉल' असे ते शब्द होते.

त्या संध्याकाळच्या एक्स्प्रेस गाडीने प्राध्यापकांची स्वारी लंडनकडे प्रयाण करती झाली.

लंडनच्या चेरिंग क्रॉस स्टेशनवर ते सकाळी पाच वाजता पोचले आणि बरोबर बारा वाजता 'बिलोज् ग्रीन अँड शार्प' या साऊदॅम्टन रो वरील कंपनीच्या ऑफिसमध्ये हजर झाले. सॉलिसिटर मि. शार्प अतिशय 'बिझी' आहेत असा निरोप मिळाला तरी त्यांनी हट्टाने त्यांना भेट देणे भाग पाडले.

"माझं काम अतोनात महत्त्वाचं आहे," ते म्हणाले. "जिआं जॅक लँजेव्हाल यांनी मागे ठेवलेल्या दौलतीवर हक्क सांगायला मी आलो आहे."

मि. शार्प यांनी टाक खाली ठेवला. ते ऐकत राहिले.

"जिआं लँजेव्हाल यांची मोठी बहीण थेरेसा हिचा मी नातू. थेरेसाने १७९२ मध्ये माझे आजोबा मार्टिन शुल्झ यांच्याशी लग्न केलं. ते ब्रुन्सविकच्या सैन्यात सर्जन होते. १८१४ मध्ये ते वारले. माझ्या काका आजोबांनी आपल्या बहिणीला लिहिलेली तीन पत्रं माझ्याजवळ आहेत. जेना गावच्या लढाईनंतर ते घरी परतले तेव्हाचा लेखी पुरावा माझ्याजवळ आहे, आणि माझ्या जन्माचा दाखलाही आहे."

मोजके शब्द बोलणारे प्रो. शुल्झ; पण या खेपेस त्यांची वाक्सरिता धो धो वाहत होती. त्यांच्या धमन्यातून सळसळणारे जर्मन रक्त त्यांना बोलायला लावत होते. जर्मन हे खरे आर्य रक्ताचे लोक; जगावर सत्ता गाजवावी तर त्यांनीच. एका फालतू फ्रेंच इसमाच्या घशात ही अफाट संपत्ती जावी हे त्यांना बिलकूल खपत नव्हते. आपल्या आजोबांनी एका फ्रेंच बाईशी लग्न करण्याचा गाढवपणा केला ही गोष्ट त्यांना डाचत होती खरी, पण म्हणून त्यांच्या जिवावर कुठल्या तरी फडतूस फ्रेंचमनने कोट्यधीश बनावं आणि ते देखील आपल्यासारखं शुद्ध रक्ताचं मानवरत्न जिवंत असताना? छे! छे! या अन्यायाची त्यांना कल्पनाही करवत नव्हती.

सॉलिसिटर शार्प यांनी अर्थात या राजकारणाकडे दुर्लक्ष केले. पण प्रो. शुल्झ यांनी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांचे काळजीपूर्वक मनन केल्यावर त्यांना स्वत:शी मान्य करणे भाग पडले की याचा दावा आपल्याला नाकारता येत नाही. फक्त हे नाते दुय्यम दर्जाचे असल्यामुळे पहिला मोठा हक्क डॉ. सॅरासिन यांचाच राहील आणि हा दुय्यम हक्कदेखील कोर्टात सिद्ध करणे अत्यंत जिकिरीचे जाईल. कदाचित वर्षानुवर्षे हा खटला रेंगाळला राहील आणि त्यावर....

हो, त्यावर खर्चही अफाट करावा लागेल! आणि शेवटी कदाचित

उभयपक्षी काही तरी तडजोड घडवून आणावी लागेल आणि त्याबद्दल जबरदस्त फी आकारता येईल.

●

५. एका आर्याचा तळतळाट

सॉलिसिटर शार्प खूष झाले होते; दोन्ही पक्षांना झुलत ठेवून आपले खिसे भरण्याची स्वप्ने पाहण्यात रंगले होते. पण प्रो. शुल्झना उत्तर देताना त्यांचा चेहरा भलता सचिंत नि गंभीर बनला होता. ''तुमची केस आम्ही कुणाला तरी मध्ये घालून कोर्टात लढवू शकू. नाही असं नाही. पण---''

ते बोलताना अडखळले तेव्हाच त्यांचा काय रोख आहे ते प्रोफेसर महाशयांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी आपल्या अडचणींचा पाढा वाचला तेव्हा त्यांना मुळीच आश्चर्य वाटले नाही. ते दंड थोपटून लढायला तयार होते. खर्चाला त्यांची तयारी होती, अन् वाटेल तेवढा विलंब लागला तरी त्याला त्यांची हरकत नव्हती. हा लढा तत्त्वाचा होता. 'सॅक्सन' विरुद्ध 'लॅटिन' वंश. आर्य विरुद्ध अनार्य! त्यात आपल्या आर्य वंशाचा झेंडाच अखेर विजयी ठरणार याबद्दल त्यांना शंका नव्हती. त्यामुळे खर्चासाठी वाटेल तेवढे कर्ज काढण्याची त्यांची तयारी होती.

प्रो. शुल्झ ऑफिसमधून बाहेर पडले आणि लगेच मि. शार्प यांनी या दुसऱ्या मोहिमेसाठी चंग बांधला. त्यांनी ताबडतोब डॉ. सॅरासिन यांना एक तार पाठवून आपल्या कचेरीत बोलवून घेतले. डॉक्टरसाहेब पाचच्या सुमारास हजर झाले.

सॉलिसिटर शार्पनी त्यांना ही नवी भानगड समजावून सांगितली; आणि ती ऐकताना जेव्हा डॉ. सॅरासिन बिलकुल विचलित झालेले दिसले नाहीत तेव्हा त्यांना जरा आश्चर्य वाटले.

''माझी एक मावस - आजी होती आणि एका फ्रेंच माणसाशी लग्न करून माझ्या आजीबरोबर ती देखील फ्रान्सची नागरिक बनली होती.

आणि ती गर्भश्रीमंत असून सारा घरखर्च ती चालवीत असे'' हे सत्य डॉक्टरांनी प्रांजळपणे कबूल केले. सॉलिसिटर शार्पनी अतिगंभीर लांबट चेहरा करून ते ऐकून घेतले. मग ते म्हणाले, ''हूं! तर मग या माणसाचा दावा कोर्टात नाकारणं जड जाईल हे खरं. पण आपण हरप्रयत्नाने त्याचा डाव हाणून पाडू आणि - हे बघा, तुमची ती मावसबहीण घरखर्च करायची वगैरे - ते काही कोर्टापुढे सांगण्याची गरज नाही, बरं का?''

डॉ. सॅरासिन तिथून बाहेर पडले ते जरा अस्वस्थ मनानेच. आपण जो प्रचंड प्रकल्प उभारणार आहो त्याला या नव्या भानगडीमुळे धक्का पोचतो की काय अशी त्यांना भीती पडली होती.

इकडे मि. शार्पनी प्रो. शुल्झना तातडीने बोलावून घेतले आणि त्यांना सांगितले की डॉ. सॅरासिननी थेरेसा लँजेन्हाल या बाईचे नावही ऐकलेले नाही; आणि कुठल्याही जर्मन माणसाशी आपल्या नात्यातल्या कुणाही व्यक्तीचा संबंध आलेला नाही असे ते ठासून सांगताहेत! यामुळे तुमची केस लढवणं आपल्याला जड जाणार आहे; तरी पण आपण प्रयत्नांची शर्थ करू!

आणि त्याप्रमाणे त्यांनी आठवडाभर 'प्रयत्नां'ची अगदी शर्थ केली. डॉ. सॅरासिनना त्यांनी असे भासवले की हे प्रकरण जर न्यायप्रविष्ट झाले तर खटला कमीत कमी दहा वर्षे रेंगाळेल. डॉक्टरसाहेबांवर हा जबर आघात होता. आपली स्वप्ननगरी केव्हा एकदा उभी राहते अशी त्यांना घाई लागली होती. दहा वर्षे थांबायला ते मुळीच तयार नव्हते.

इकडे प्रो. शुल्झना तितक्याच धारदार शब्दांत शार्पनी सांगून टाकले की ''तुमची केस कोर्टात दहा वर्षे तरी चालेलच पण त्यातून शेवटी तुमच्या फायद्याचं काही निष्पन्न होईल असं सांगता येत नाही. कारण

तुमची बाजू दुय्यम पडली!"

सॉलिसिटर शार्पचे 'शर्थीचे प्रयत्न' एवढ्यावरच थांबले नाहीत. एका सुप्रभाती त्यांनी एक नवीनच पिल्लू सोडून दिले अन् दोघाही दावेदारांची घबराट उडवली. "आणखी एक हक्कदार पुढे येतोय म्हणे! त्याची बाजू लंगडी असणार तेव्हा भिण्याचं कारण नाही. तरी पण हे प्रकरण झटपट मिटवलेलं बरं!"

आता मात्र दोघेही प्रतिस्पर्धी घायकुतीला आले. ज्यांची सारी मदार बँकेकडून कर्ज काढण्यावर होती त्या प्रो. शुल्झनी सॉलिसिटरच्या मागे ससेमिरा लावला. "कसंही करून त्याला तडजोडीला तयार करा." आणि डॉ. सॅरासिन इतके अधीर झाले होते की ते सॉलिसिटरच्या गळी पडून म्हणाले, "त्याला म्हणावं मी तडजोडीला तयार आहे." हो! उगाच हातचं सोडून पळत्याच्या पाठी कुणी लागावं? आपल्या स्वप्ननगरीच्या बजेटला थोडी कात्री लागली तरी चालेल!

एवढे झाल्यावर आणखी काय पाहिजे? सॉलिसिटर शार्पनी एका बँकरच्या मध्यस्थीने तडजोड घडवून आणली. असे ठरले की या दौलतीतून प्रत्येक हक्कदाराने एक कोटी पौंड घ्यावेत. दोन कोटी पौंडांची वाटणी झाल्यावर उरलेल्या एक कोटी पौंडांची काय वाट? ते अर्थात बँकर अन् सॉलिसिटर यांचे कमिशन. कारण ते महाभाग नसते तर हा तह झाला नसता आणि नसत्या लढाईची उचापत करावी लागली असती.

अशा रीतीने सर्वच पक्ष खूष झाले. सॅरासिनच्या नगररचनेला आता विलंब लागणार नव्हता आणि सॅक्सन वंशापुढे अत्यंत खुजा असा जो लॅटिन वंश त्याची निम्मी संपत्ती हिरावून घेतल्याचा आसुरी आनंद शुल्झला लाभणार होता.

आणि शुल्झ तेवढ्यावरच स्वस्थ बसणार नव्हता. एक आदर्श नि

आरोग्यसंपन्न महानगर उभे करण्याची सॅरासिनची योजना त्याच्याही कानावर गेली होती. ते ऐकून त्याचे हात शिवशिवू लागले होते.

"अस्सं काय ?" तो स्वत:शी म्हणाला, 'म्हणजे भुक्कड फ्रेंच अनार्यांना आर्यांच्या तोडीचे नागरिक बनवण्याचा डाव आहे काय तुझा? पण तू काय समजलाहेस ? मी तो हाणून पाडीन !'

वाटणीच्या करारावर सह्या झाल्यानंतर प्रो. शुल्झ स्वत: 'स्वास्थ्य परिषदे' च्या एका बैठकीला हजर राहिले. आदर्शनगरीबद्दलची सॅरासिन अन् त्यांचे समर्थक यांची भाषणे त्यांनी ऐकली. सभा संपल्यानंतर शुल्झनी स्वगत पण मोठ्याने काढलेले उद्गार कुणी तरी ऐकले :

"तुझ्या नगरावर मात करणारं नगर हा जर्मन बहाद्दूर उभं करील, समजलास? आणि माझं शहर हिमालय पर्वत ठरेल, तर तुझं मुंग्यांचं वारूळ !"

डॉ. सॅरासिन हा मानवतेचे भले करायला निघालेला एक सत्प्रवृत्त माणूस. शुल्झने केलेली ही वल्गना जेव्हा त्याच्या कानावर गेली तेव्हा त्याला वाईट वाटले. जगात सर्वच महत्त्वाकांक्षी माणसे सारखी नसतात हे न जाणण्याइतका तो भोळा नव्हता. आपल्या तोडीस तोड असे शहर उभारण्यामागे शुल्झचा हेतू शुद्ध नसणार हा तर्क त्याने तेव्हाच केला. आपल्याला एका जबरदस्त शत्रूशी सामना करावा लागणार आहे हे ओळखून तो अस्वस्थ बनला आणि हॉटेलात परतताच त्याने एक पत्र लिहिले.

ऑटोला नाही, मॅक्सला.

त्या पत्रात आपल्यावर येऊ पाहणाऱ्या संकटाची कल्पना डॉक्टरांनी मॅक्सला दिली. "आपल्याला या नगररचनेच्या कामात शूर आणि व्यवहारचतुर सहकाऱ्यांची गरज लागणार आहे."

मॅक्सचे उत्तर आले. त्यात त्याने लिहिले होते : 'प्रो. शुल्झ यांचे तुम्ही जे वर्णन केलेत त्यावरून मला त्या माणसाची कल्पना आली. मी आल्सेसचा आहे - जर्मनीला लागून असलेल्या फ्रेंच प्रांतातला. मी त्याला आता क्षणभरही नजरेआड करणार नाही. तुमच्या नगररचनेत मला याक्षणी जरी सहभागी होता आले नाही, तरी मी सर्वस्वी तुमचा आहे असे धरून चाला. तुमच्यापासून मी कितीही दूर असलो आणि कित्येक महिने किंबहुना काही वर्षे जरी माझी खबर तुम्हाला कळली नाही तरी माझ्या मनात अखंड तेवत राहील एकच विचार - तुमची म्हणजे पर्यायाने माझ्या मातृभूमी फ्रान्सची सेवा करणे !''

●

६. स्टालस्टाट अर्थात पोलादपूर

दोघा प्रतिस्पर्धी नेत्यांनी त्या पर्वतप्राय निधीचा ताबा घेतल्याला पाच वर्षे लोटली आहेत. आपले घटनास्थळ आहे अमेरिकन भूमीवरच्या ओरेगॉन प्रांताच्या खूप दक्षिणेला पॅसिपिक महासागरापासून वीसएक मैल आत. आतापर्यंत इथे वस्ती नव्हती. कोणत्याही अमेरिकन राज्याला अजूनपर्यंत न जोडलेला शासनविहीन प्रदेश. उत्तुंग पर्वत अन् मधल्या खोल दऱ्या यांनी व्यापलेला खडकाळ भूभाग, वरवर पाहता जसं काही युरोपातले स्वित्झर्लंड उचलून अमेरिकेत आणून ठेवलेले. मात्र फरक हा की स्वित्झर्लंडची शांतता इथे नाही. निसर्गाची हाक आपल्याला ऐकू येते का म्हणून एखादा कविमनाचा माणूस कान देऊ लागला तर त्याची निराशा होईल. पक्ष्यांची मंजुळ किलबिल किंवा धनगराच्या बासरीचा सूर त्याला ऐकू येईल म्हणता? मुळीच नाही. इथे रात्रंदिवस चालू असलेले घणाघाती घाव त्याच्या कानठळ्या बसवतील. कारण इथे साम्राज्य आहे फक्त लोखंडाचे नि कोळशाचे! जमिनीवर धुक्याचे पांघरूण पसरावे तसा इथे धूर पसरलेला असतो. इथली हवा इतकी दूषित झालेली आहे की मनुष्याच्या आठवणीत कधीही इथे एखादे फुलपाखरू किंबहुना किडा सुद्धा वावरलेला नाही.

या पर्वतभूमीच्या उत्तरेला जिथे डोंगरांचे उतार एकत्र येऊन एक विस्तीर्ण खोरे तयार झाले आहे, त्यातल्या तांबड्या मातीवर वसले आहे - 'स्टालस्टाट'. या जर्मन नावाचा अर्थ आहे पोलादपूर.

इथली माती लाल आहे. कारण तिच्यात भरपूर आयर्न ऑक्साईड आहे. सतरा -अठरा एकर क्षेत्रफळाच्या या खडकाळ भूमीवर निसर्गाची कायम अवकृपा असायची. तिथे काही सुद्धा पिकत नसे. पण मनुष्याने

मेहेरबानी केली अन् पाच वर्षांत हा प्रदेश उत्साहाने गजबजून गेला. शिकागोहून तयार करून आणलेले लाकडी भाग जोडून इथे झटपट घरे बांधण्यात आली आणि एक अवाढव्य कामगार वसाहत इथे उभी राहिली. या वसाहतीच्या केंद्रभागी एकीसारख्या एक दिसणाऱ्या इमारतींचे प्रचंड जाळे तयार झाले. त्यात अंतराअंतरावर डोकी काढणारी उंच धुराडी आग ओकू लागली. उद्योगाचे लोकविलक्षण पर्व इथे सुरू झाले.

हे स्टालस्टाट शहर म्हणजे प्रो. शुल्झ यांची खासगी मालमत्ता होती. इथे कोणत्याही सरकारची सत्ता चालत नसे. आपल्याला मिळालेल्या हिंदुस्थानी राजसंपदेचा उपयोग करून ही उद्यमनगरी त्याने उभी केली होती. उद्यमनगरी कसली? उद्दामनगरी! इथे कोणता उद्योग चालतो म्हणता? ऐका, म्हणजे तुम्ही सुन्न होऊन जाल. तुमच्या कानांना दडे बसतील. इथल्या कारखान्यातल्या मुशीतून तोफा बाहेर पडत असतात. बस्स! तोफाच तोफा! दुसरे काही नाही. तीस हजार मजूर इथे राबत असतात - बहुतेक सारी माणसे जर्मनीतून निवडून आणलेले संशयातीत नग आहेत. गुळगुळीत छिद्राच्या लांबच लांब नळ्या असलेल्या तोफा हे कामगार तयार करतात आणि कारखान्याचा मालक जगातल्या युद्धपिपासू राष्ट्रांकडे त्या निर्यात करीत असतो. ही राष्ट्रे म्हणजे रशिया, तुर्कस्थान, रुमानिया, जपान, इटली आणि चीन सुद्धा. पण सर्वात अधिक प्रमाणात जर्मनी. आणि तोफा तरी केवढ्या प्रचंड! फ्रान्समध्ये आतापर्यंत फार तर ८० हजार पौंड वजनाचे कच्चे पोलाद निघाले असेल; इंग्लंडमध्ये फार तर शंभर टनी तोफ ओतली गेली असेल, आणि खुद्द जर्मनीत तिथल्या जगद्विख्यात क्रुपच्या कारखान्याने दहा लाख पौंड पोलादाचा पर्वत उभा केला असेल! शुल्झ एवढ्यावर थांबलेला नाही. त्याला मुळी मर्यादा माहीतच नाही. वाटेल तेवढ्या वजनाची, वाटेल तेवढ्या

लांब नळीची तोफ त्याला सांगा - ऑर्डर द्या, तोफ तुमच्या दारात येऊन पडेल. अर्थात किंमतही तशीच जबरदस्त मोजावी लागेल.

उत्तर अमेरिकेच्या अगदी टोकाला हा राक्षसी उद्योग चालू आहे. बाहेरच्या मनुष्यवस्तीपासून पाचशे मैल दूर. कानठळ्या बसवणारा उद्योग. पण त्याबद्दल या कानाचे त्या कानाला कळू नये एवढी गुप्तता राखलेली! तुम्हाला तिथे सहज प्रवेश मिळेल म्हणता? नाव नको. स्टालस्टाट म्हणजे एक भुईकोट किल्ला आहे. उंच भक्कम तट, त्याला विराट वेशी, दणकट खिळेबंद दरवाजे, पण त्याच्याही आधी सारी वास्तू वेढणारा खोल खंदक. प्रत्येक दरवाज्यावर कडेकोट चौक्या - पहारे. काय बिशाद आहे तुमची या पोलादी मर्मस्थानात शिरण्याची! बाहेरच राहा एखाद्या उपनगरात. मुख्य नगरीत तुम्हाला प्रवेश नाही! परवलीचा शब्द आहे तुमच्यापाशी? निदान लेखी परवाना आहे? अनेक सह्यांनिशी शिक्कामोर्तब केलेला तो बहुमोल कागद आहे? तरच तुमच्या विनंतीचा विचार केला जाईल.

●



७. हा तरुण कोण ?

नोव्हेंबर महिन्यातल्या एका सकाळी एक तरुण स्टालस्टाटला आला तेव्हा त्याच्याजवळ तो जादूचा कागद असावा बहुतेक. तो परवाना! कारण त्याने आपली प्रवासात झिजलेली एक बॅग एका उपनगरातल्या खानावळीत ठेवली आणि तिथून जवळची वेस गाठली. तिथे परवाना दाखवताच त्याला प्रवेश मिळाला.

बलदंड शरीराच्या या तरुणाने अंगात सैलसर कोट घातलेला होता. कोटाच्या आत बिनकॉलरीचा शर्ट, पायांत मखमली तुमान, तिचे काठ भल्या मोठ्या बुटांच्या आत खोवलेले. डोक्यावर फताडी हॅट, तिचा पुढला रुंद काठ इतका खाली ओढलेला की त्यामुळे डोळे झाकले जावेत. चेहऱ्यावर नि पिंगट मिशीवर कोळशाची भुकटी साचलेली.

चौकीदाराने सांगितलेल्या मार्गावरून तरुण निघाला. त्याच्या उजवीकडे खोल खंदक असून बांधावरून अनेक पहारेकरी गस्त घालीत होते. डावीकडे कारखान्याला वेढा घालणारा रुंद मंडलाकार रस्ता अन् इमारतींची रांग यांच्या मधून गेलेली होती एक रेल्वेची सडक, अन् दुसरा एक तट.

सर्व सूचना व्यवस्थित पाळून झाल्यावर तरुणाची स्वारी एकदाची परवान्यातल्या सेलिग्मान नावाच्या फोरमनपाशी जाऊन पोचली.

"नाव ?"

"जोहान श्वाई."

"आल्सेशियन ?"

"नाही, स्विस."

तरुण उत्तम जर्मन बोलत होता. स्वित्झर्लंडमधल्या लोकांची भाषा जर्मनसारखीच असते. फोरमनने त्याला आता एक बिल्ला दिला. त्यावरचा नंबर होता ५७९३८. शिवाय एक निळे कार्ड त्याला मिळाले. "रोज सकाळी ७ वाजता तू कारखान्यात हजर झालं पाहिजे. चौकीवरचं आपल्या नावाचं हे कार्ड घेऊन आत यायचं. मला दाखवायचं. संध्याकाळी परत जाताना चौकीवरच्या पेटीत कार्ड टाकायचं."

"मला ही पद्धत माहीत आहे. मी शहरात राहायचो ना ?"

"नाही. बाहेर उपनगरात कुठे तरी राहायची जागा शोध. कामाच्या वेळात तुला दुपारचा खाना इथे स्वस्त दरात मिळू शकतो. तुझा सुरवातीचा पगार रोज एक डॉलर. केव्हापासून कामाला लागतोस ?"

"आजच."

"ठीक आहे - चल माझ्याबरोबर."

एका अरुंद रस्त्यावरून त्याने त्याला आत नेले. आतला चौक

ओलांडल्यावर त्यांना एक हॉल लागला. हॉल म्हणजे एखाद्या स्टेशनचा प्लॅटफॉर्म असावा तसा विस्तीर्ण फलाट होता. त्याच्या दोन्ही बाजूंना गोलाकार प्रचंड स्तंभांच्या रांगा होत्या. हे खांब म्हणजे खरे तर धूर ओकणाऱ्या 'चिमण्या' होत्या. वरती खूप उंचीवर काचेचे छत होते. त्यातून त्यांची तोंडे बाहेर निघालेली होती. प्रत्येक रांगेत अशी पन्नास तरी धुराडी असतील.

प्रत्येक धुराड्याखाली एकेक धडाडून पेटलेली भट्टी होती. रुळांवरून एक आगगाडी सतत येऊन आपल्या डब्यातले अशुद्ध लोखंड भट्ट्यात ओतीत होती. दुसऱ्या टोकाला शुद्ध पोलादाच्या स्वरूपात ते बाहेर पडत होते आणि आगगाडीच्या डब्यातून त्याची दुसऱ्या विभागात रवानगी होत होती. पोलादीकरणाच्या या प्रक्रियेला इंग्रजीत 'पडलिंग' म्हणतात.

"तू 'पडलर' म्हणून काम केलेलं आहे म्हणतोस? पण हातात लांबलचक सळी घेऊन भट्टीतला लाल पांढरा तप्त लोहरस ढवळण्याचं कष्टाचं काम तुला सोसणार नाही. मी तुला 'कास्टिंग'कडे घालतो."

आणि जेवण झाल्यानंतर या तरुणाची पाठवणी 'कास्टिंग' किंवा 'ओतकाम' विभागात झाली. इथेही मोठमोठ्या भट्ट्या होत्या. भडकत्या ज्वाळांमधून प्रचंड कढणपात्रे किंवा 'क्रूसिबल्स' फिरत होती. रुळांवरून सतत जा-ये करणाऱ्या आगगाडीतून त्यांना माल पुरवला जात होता आणि मग पक्क्या साच्यात ओतून तयार झालेले 'बार' किंवा वासे खालच्या नाल्यात अलगद ठेवले जात होते. नाल्यात श्वाइनि डोकावून पाहिले तेव्हा तिथे त्याला कारखान्याचा सर्वात गुंतागुंतीचा यंत्र-विभाग दिसला. याच ठिकाणी त्या वाशांच्या सफाईदार नलिका बनत. त्या तातडीने अन्यत्र नेल्या जात आणि त्या ठिकाणी तयार तोफा बाहेर पडत.

पोलादाचा रस साच्यात ओतण्याची क्रिया फार नाजूक अन् काटेकोरपणाची होती. ती वेळेवर पार पडावी अन् पोलादावर होणाऱ्या संस्कारात काडीचीही चूक राहू नये म्हणून एक अधिकारी कामगारांवर नजर ठेवून असायचा. त्याच्या हातात क्रॉनोमीटर किंवा तत्कालीन घड्याळ असे. दुसऱ्या हातात शिट्टी असे. शिट्टी वाजवून तो सूचना देई. त्यावेळी अन् त्याच साच्यात ते तप्त पोलाद ओतले जाई. या विभागातली शिस्त अतिशय कडक होती.

संध्याकाळी सात वाजता हा उत्साही तरुण श्वार्झ चौकीदाराजवळ निळे कार्ड देऊन बाहेर पडला. 'स्टाल स्टाट'च्या उपनगर विभागात चौकशी केल्यावर त्याला हवे तसे एक 'घर' मिळाले. एका प्रेमळ मातेने त्याला बिऱ्हाडकरू म्हणून ठेवून घेतले.

कारखान्यात तो डोळसपणे वावरला होता. तिथे त्याने जे जे पाहिले होते, अनुभवले होते त्याची आता त्याने वहीत नोंद केली. आपला निष्कर्षही त्यात त्याने नमूद केला, तो असा-

''सर्व धातूंचा कस उत्तम असावा म्हणून इथे जी काळजी घेतली जाते तिचे रहस्य त्या 'क्रूसिबल' मध्ये आणि साचेपात्रात आहे. या दोन्ही साधनांवर ज्या विशिष्ट मातीने प्रक्रिया केली जाते तिला प्रचंड महत्त्व आहे. तिचा अभ्यास मला केला पाहिजे....आणि....होय, आणि मला याचाही तपास काढला पाहिजे, की या जर्मन राक्षसाचा डाव तरी काय आहे? या लांब पल्ल्याच्या तोफा तो अखेर आमच्या फ्रँकव्हिलवर तर डागणार नसेल?''

मित्रांनो, हा श्वार्झ नावाचा तरुण खरा कोण होता हे तुमच्या चाणाक्ष बुद्धीला एव्हाना कळून चुकले असेल. तो होता मॅक्स ब्रुकमान. आपले पालक डॉ. सॅरासिन यांचे हितरक्षण करण्यासाठी त्याने या पोलादी

शहरात प्रवेश मिळवला होता. त्याने जी हेरगिरी चालवली होती ती डॉक्टरसाहेबांना न कळवता, पण केवळ त्यांचे भले व्हावे म्हणून.

●

८. खाणीत काय घडले ?

मॅक्सची घरवाली मूळची स्विस असून चार वर्षांपूर्वी विधवा झाली होती. तिचा नवरा इथल्या खाणीत काम करताना स्फोट होऊन मरण पावला होता. तिला वार्षिक तीस डॉलर पेन्शन मिळत असे. यात भर म्हणून तिचा तेरा वर्षांचा मुलगा कार्ल दर रविवारी आपला पगार आणून तिच्या स्वाधीन करायचा. आलब्रेख्ट नावाच्या कोळशाच्या खाणीत दरवान म्हणून त्याला नोकरी होती. कोळशाने भरलेले खटारे आले की दरवाजा उघडायचा, ते निघून गेले की बंद करायचा हे त्याचे काम. घरापासून खाण बरीच दूर असल्यामुळे तो रात्री घरी येतच नसे. रात्रीपुरते दुसरे एक काम त्याने पत्करले होते. खाणीत एक पागा होती. वाहनांचे घोडे तिथे बांधलेले असत. त्यांची देखभाल करणे हे त्याचे नंबर दोनचे काम. यामुळे जमिनीच्या पंधराशे फूट खोलीवर पाताळात त्याला दिवसाचे चोवीस तास घालवावे लागत. रविवारी सुट्टी असे; तेवढा एकच दिवस त्याला सूर्यदर्शन घडायचे. या सुट्टीत तो घरी पोचे तेव्हा त्याचा अवतार मोठा बघण्यासारखा असायचा. कपडे मळलेले, सर्वांगावर काळ्या भुकटीचे थर बसलेले, सहा दिवसात अंगाला पाण्याचा स्पर्शही झालेला नाही. त्याच्या वाटेकडे डोळे लावून बसलेली आई प्रेमाने त्याला जवळ ओढी अन् साबण लावून त्याला आंघोळ घाली. मग भडक हिरव्या रंगाच्या मऊ कापडाचा पोशाख त्याच्या अंगावर चढवी. त्याच्या दिवंगत वडिलांचा अंगरखा फाडूनच हा पोशाख आईने शिवलेला होता. न्हाऊन-माखून स्वच्छ झालेला कार्ल मग इतका देखणा दिसायचा की त्याच्याकडे पाहतच राहावे. त्याचे डोळे निळे होते अन् केस रेशमासारखे मऊ सोनेरी. कार्ल शांत स्वभावाचा, कमी बोलणारा

मुलगा होता. खाणीत धोक्याच्या जागी काम करणारी माणसे स्वभावत:च मानी असतात. कार्ल छोटा असूनही तसाच ताठ वृत्तीचा होता. त्याचा सर्वात मोठा आनंद म्हणजे आईच्या संगतीत स्वयंपाकघरात बसून तिला आपला कीटकसंग्रह दाखवणे. खोल दमट भूगर्भात वावरणारे तऱ्हेतऱ्हेचे किडे पकडण्याचा त्याला छंद होता. त्याचा वरिष्ठ अधिकारी एंजिनीयर कुठलाही एखादा नवा नमुना सापडला की तो त्याच्याकडून घेई अन् त्याला एखादे बक्षीस देई.

पण किड्या, मुंगळे नि कोळी यापुरता त्याचा छंद मर्यादित नव्हता. या पोराने दोन पाकोळ्या, छोटी वाघळे आणि एक मोठा उंदीर पाळला होता. त्यांच्यावर त्याचे भलतेच प्रेम होते. पुष्कळदा त्यांना जवळ घेऊन तो गोंजारत बसायचा.

पागेतला ॲथॉल नावाचा घोडाही त्याचा लाडका होता. गेली सहा वर्षे त्याने पंधराशे फूट खोल अंधारात काढली होती; आणि आता त्याला पुरे अंधत्व आले होते. पण दरवाजा उघडण्याची वेळ त्याला माहीत होती. नेमका त्या क्षणाला तो दाराशी येऊन उभा राही. सकाळ - संध्याकाळ चाऱ्याची वेळ झाली की तो खिंकाळे. अतिशय सौम्य स्वभावाचा नि आज्ञाधारक होता हा ॲथॉल घोडा.

"ॲथॉल किती प्रेमळ आहे म्हणून सांगू? अग आई, पुष्कळदा तो माझ्या गालाला गाल घासतो - माझा मुका घेतो!" कार्ल त्याचे कौतुक सांगायचा, "आणि माझ्या इतका उपयोगी पडतो की नाही - माझं घड्याळ आहे तो! तो सोबतीला नसता तर दिवस केव्हा संपला नि रात्र केव्हा सुरू झाली हे सुद्धा मला कळलं नसतं."

आपल्या बाळाच्या तोंडून घोड्याचे हे गुणगान आई कान देऊन ऐकी. तिचे डोळे पाण्याने भरत. आपला नवरा जिथे मरण पावला

तो खाणीचा अंतर्भाग तिने कधीच पाहिलेला नव्हता, कारण बायकांना खाणीत मज्जाव होता. पण आपला बाळ पिंजऱ्यात - किंवा पाळण्यात म्हणा - बसून इतक्या खोलीवर कसा उतरत असेल अन् तिथे कोणत्या परिस्थितीत काम करीत असेल याची कल्पना ती अश्रूपूर्ण नेत्रांनी करीत असे.

मॅक्सलाही या हुशार मुलाचे फार कौतुक वाटे. त्याने कार्लला शिकवायला सुरुवात केली. मॅक्सने स्वत: गेल्या दोन महिन्यांमध्ये आपल्या कामात विलक्षण नैपुण्य प्रकट केले होते. त्याच्या वरिष्ठांनी त्याच्याबद्दल उत्तम अहवाल संचालकांना सादर केला होता त्यामुळे आपल्याला बढती मिळून अंतरंगात प्रवेश मिळवणे सोपे होईल अशी आशा त्याला वाटत होती. पण ही गोष्ट एकदम साध्य झाली नाही. ते अखेरीस घडले, पण त्यासाठी फार मोठी किंमत मोजावी लागली.

एका रविवारी सकाळी दहाचे ठोके पडले तरी कार्ल शिकायला आला नाही तेव्हा मॅक्सला जरा आश्चर्य वाटले आणि तो बाईंकडे चौकशी करावी म्हणून खालच्या मजल्यावर गेला. तेव्हा बाईही चिंतेत आहेत असे त्याला आढळले. लगेच तो अधिक तपासासाठी कारखान्याकडे निघाला. वाटेत भेटलेल्या रात्रपाळीच्या मजुरांना त्याने विचारले; त्यांना कार्लबद्दल काहीच माहिती नव्हती. आलब्रेख्ट खाणीचा चौकीदार एवढेच म्हणाला, "कदाचित तो अजून खाणीतून बाहेर आलाच नसेल. बसला असेल किडे पकडीत!"

तेवढ्यात कार्लप्रमाणेच खाणीत कामावर असलेला एक पोरगा तिथे आला अन् म्हणाला, "तसंच असणार. मी त्याला सात वाजता हातात कंदील घेऊन एका भुयारात शिरलेला पाहिला."

ताबडतोब चौकीदार अन् दुसरे काही नोकर यांच्यासह मॅक्स खाणीत

उतरला. तिथल्या ओव्हरसीयरला भेटला. खाणीतल्या 'गॅलऱ्यां' चा संपूर्ण नकाशा पुढ्यात धरून त्यांनी सर्व बोगदे - भुयारे तपासली, कुठेही पोराचा पत्ता लागला नाही.

नकाशात एक ठिपक्या - ठिपक्यांची रेषा दाखवली होती. तीवर बोट ठेवून त्याने विचारले, "हे काय आहे ?"

"ते एक फार जुनं भुयार आहे. अलीकडे वापरातलं राहिलेलं नाही."

"तिथे जाऊया."

शोधपथक त्या जुन्या भुयाराकडे गेले. तिथल्या भिंती बुरशी चढलेल्या बुळबुळीत दमट होत्या. थोडे अंतर चालून गेल्यावर मॅक्स थांबला अन् म्हणाला, "चक्कर आल्यासारखं नाही वाटत तुम्हाला ?"

ओव्हरसीयरने परवानगी दिल्यावर मॅक्सने एक काडी शिलगावली अन् खाली वाकून ती जमिनीलगत धरली. तेव्हा ती ताबडतोब विझली.

मला वाटलंच होतं,"मॅक्स म्हणाला, "हा दूषित वायू आहे आणि जड असल्यामुळे जमिनीलगत त्याचा थर साचला आहे."...मला वाटतं ज्यांच्याजवळ वायुसंरक्षक साधनं नाहीत त्यांनी इथूनच परतावं. साहेब, आपण दोघे पुढे जाऊया."

ओव्हरसीयर अन् मॅक्स आपल्या बरोबर ही साधने घेऊन आले होते. त्यांनी लगेच आपापली हवा-पेटी पाठीला बांधली अन् तिची वायुनलिका दातांनी दाबून धरली.

आता दोघांनी त्या जुन्या ओस पडलेल्या गॅलरीत प्रवेश केला. तिथले भुयारन् भुयार त्यांनी तपासले. अखेरीस एका ठिकाणी त्यांना निळा प्रकाशबिंदू लकलकताना दिसला. जवळ जाऊन पाहतात तो तिथे एक विजेचा टॉर्च पडलेला होता आणि ओलसर भिंतीला लगटून पडलेला होता छोटा कार्ल. त्याचे निळे झालेले ओठ अन् खोल गेलेले



डोळे यावरून सारा प्रकार दोघांच्याही तेव्हाच लक्षात आला. जमिनीवरचे काहीतरी उचलण्यासाठी कार्ल खाली वाकला होता आणि क्षणार्धात दूषित वायूने त्याला घुसमटून टाकले होते.

त्याला शुद्धीवर आणण्याचे सर्व उपाय निष्फळ ठरले. त्याची प्राणज्योत चार - पाच तासांपूर्वीच विझली असावी.

ही बातमी घरी पोचताच त्याच्या आईवर वज्राघात झाला! बिचारीला जगात तो एकच आशातंतू उरला होता तोही आता तुटून गेला. ती निराधार झाली!

●

१. एक पाऊल पुढे

खाण विभागाच्या डॉक्टरांनी जो अहवाल दिला त्यात असे नमूद केले होते की दरवान कार्ल बॉअर, नंबर ४१९०२, वय वर्षे तेरा, कामाची जागा गॅलरी नं. २२८ याचा मृत्यू फुप्फुसात दूषित वायू कार्बन डायऑक्साईड गेल्यामुळे घुसमटून झाला.

आणि याला अव्वल दर्जाचा गणला गेलेला एंजिनीयर जोहान श्वाईझ याने पुष्टी जोडली होती की हा दूषित वायू हळूहळू इतर गॅलऱ्यांतही झिरपून जात आहे. याचा बंदोबस्त वेळीच करायला हवा. हा त्याचा रिपोर्ट वरिष्ठांपर्यंत जाऊन पोचला.

दहा तासांनंतर मॅक्स जेव्हा कारखान्यात गेला तेव्हा त्याच्या हातात एक तातडीचा हुकूम पडला, तो असा : "आज दहा वाजता श्वाईझ यांनी मध्यवर्ती विभाग, मार्ग व दरवाजा 'ए' या ठिकाणी संचालक मंडळाच्या भेटीसाठी हजर व्हावे."

'शेवटी जमलं!' मॅक्स स्वत:शी म्हणाला. 'हे खरं पहिलं पाऊल. आता पुढल्या गोष्टी जमणं कठीण नाही.'

मध्यवर्ती विभाग- सेंट्रल ब्लॉक! खासे लोकांची खास जागा, तिथे सहजासहजी प्रवेश मिळवणे कुणालाही शक्य नसे. मॅक्सला तो मिळाला होता. परवान्यांचा सोपस्कार झाल्यावर दोघा पहारेकऱ्यांनी मॅक्सचे डोळे बांधले आणि त्याचे हात पकडून त्याला आत नेले.

एका विस्तीर्ण पण साध्यासुध्या खोलीत त्याला नेण्यात आले. तिथे अगदी मोजके सामानसुमान होते. एक लांबलचक टेबल, त्यावर आराखडा काढण्यासाठी लागणारे सर्व साहित्य अन् एक काळा लाकडी फळा. खोलीला खूप उंचीवर खरखरीत काचेच्या खिडक्या होत्या, त्यातून

भरपूर उजेड आत आला होता.

काही सेकंदातच उच्च विद्याविभूषित वाटणारे असे दोन चष्मेवाले गृहस्थ खोलीत आले. त्यांच्यापैकी एकजण मॅक्सला उद्देशून म्हणाला, "तुम्ही आतापर्यंत दाखवलेली हुशारी आमच्या लक्षात आली असून तुम्हाला आता मॉडेल विभागात दाखल करून घेण्याचा विचार चालू आहे. आम्ही काही प्रश्न विचारतो, त्यांची उत्तरं द्याल?"

मॅक्सने अदबीने मान तुकवली. त्याला रसायनशास्त्र, बीजगणित अन् भूमितीमधले अनेक प्रश्न विचारण्यात आले. त्याने दिलेली उत्तरं समाधानकारक ठरली. फळ्यावर त्याने ज्या आकृत्या काढल्या त्याही रेखीव अन् बिनचूक होत्या.

"शिक्षण कुठे घेतलंत तुम्ही?"

"माझ्या जन्मग्रामी शाफ हाऊसेन शहरी."

"ड्राफ्टस्‌मन म्हणून तुम्ही बरं यश मिळवलेलं दिसतं."

"तो माझा आवडता विषय होता."

"स्वित्झर्लंडमधला शैक्षणिक दर्जा असाधारण आहे यात शंका नाही," त्यांच्यापैकी एक परीक्षक दुसऱ्याला म्हणाला, आणि मग त्याने मॅक्सपुढे एक कागद ठेवला. "यात नमूद केलेल्या तपशिलानुसार वाफेच्या इंजिनाचा आराखडा तयार करा. तुम्हाला दोन तासांची मुदत देतो" असे म्हणून दोघेही परीक्षक तिथून निघून गेले.

मॅक्स लगेच कामाला लागला. दोन तासांनी ते परत आले तेव्हा त्याचा आराखडा तयार होता. तो पाहून दोघेही इतके खूष झाले की त्यांनी जे नियोजित प्रमाणपत्र तयार ठेवले होते– 'पूर्णपणे समाधानकारक व उच्चस्तरीय'– ते तर दिलेच पण शिवाय त्याला पुष्टी जोडली, 'अशा दर्जाचा दुसरा ड्राफ्टमन् आपल्याकडे उपलब्ध नाही.'

"तुम्हाला आता मॉडेल विभागात प्रवेश मिळेल. तिथले खास नियम पाळाल का?"

"खास नियम मला अद्यापि कळलेले नाहीत. पण ते व्यवहार्य असतील तर मी अर्थात पाळीन."

"नियम असे आहेत : या विभागात तुमची नेमणूक झाली की त्या मुदतीत तुम्हाला बाहेर कुठेही जाता येणार नाही. इथेच राहावं लागेल. कडक लष्करी शिस्तीखाली इथे वागावं लागेल. शिक्षाही कडक असतील. पण त्याचबरोबर गुणांचं चीज होईल, बढती मिळेल. तिसरा नियम हा की या विभागात जे दिसेल त्याचा कुठेही उच्चार करणार नाही अशी गुप्ततेची शपथ तुम्हाला रोज सकाळी घ्यावी लागेल. चौथा नियम म्हणजे तुम्हाला फक्त कुटुंबातल्या व्यक्तींशी पत्रव्यवहार करण्याची मुभा आहे. तुमची येणारी जाणारी पत्रं उघडून वाचली जातील."

'थोडक्यात म्हणजे मी आता कैदी झालो,' मॅक्स स्वतःशी म्हणाला. उघडपणे त्याने शांत स्वरात उत्तर दिले, "नियम रास्त आहेत. मी त्यांचं पालन करीन."

"ठीक. तुमची राहण्याची व्यवस्था इथे केली जाईल. पहिल्या दर्जाचं जेवणखाण तुम्हाला मिळेल. सामान घेऊन आला आहात का?"

"नाही. मला कुठे ही कल्पना होती?"

"हरकत नाही. तुमचा पत्ता दिला की आमचा माणूस तुमच्या बिऱ्हाडातलं सामान घेऊन येईल. इथून तुम्हाला आता बाहेर पडण्याची मनाई आहे."

मॅक्स मनात म्हणाला, 'बरं झालं मी आतापर्यंत जी टिपणं लिहिली ती सांकेतिक भाषेत. त्यातलं कुणाला ओ की ठो कळायचं नाही.'

●

१०. आधुनिक राक्षसाच्या गुहेत

संध्याकाळपर्यंत मॅक्सला मुक्कामासाठी एक स्वतंत्र खोली मिळाली. एका विस्तीर्ण पटांगणातल्या उंच इमारतीत त्याच्यासारखे आणखीही काही तरुण होते. ग्रंथालय, संगीतगृह वगैरे करमणुकीच्या सोयी होत्या.

अभ्यासातून विज्ञानाच्या अनेक शाखांचे ज्ञान त्याला मिळत होते; आणि त्याची बौद्धिक पातळी इतर विद्यार्थ्यांपेक्षा कितीतरी उच्च दर्जाची होती, पण प्रत्यक्षात मात्र त्याला एका ठराविक विषयाबाहेर जाता येत नव्हते. स्टीम इंजिन किंवा बाष्पयंत्र. या भागातली कामाची विभागणी विलक्षण कडक होती. एक काय करतो आहे त्याचा दुसऱ्याला पत्ता नसे. त्यामुळे चार महिने या 'ए' विभागात घालवल्यानंतर सुद्धा एकूण स्टालस्टाट नगर कसे आहे याची त्याला प्रवेशाच्या वेळी जी माहिती होती तीत यत्किंचित भर पडली नाही. मंडळीत जी कुजबूज चाले त्यावरून एक तर्क मात्र त्याने केलेला होता. या विभागात मध्यभागी बुलटॉवर नावाचा जो गोल मनोरा होता तो या साऱ्या पोलादी यंत्रणेचा मेंदू असणार. हे सारे प्रचंड जाळे पसरणारा कोळी मनोऱ्याच्या तळाशी गुप्त जागी ठाण मांडून बसलेला असणार. कुठल्याही हल्ल्याला किंवा आगीसारख्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्याइतकी सुरक्षित जागा आहे, म्हणे ती! एखाद्या युद्धनौकेतल्या कॅबिनसारखी. आणि तिथे बसून तो म्हणे कुठल्यातरी भीषण संहारक अस्त्राची रचना करण्यात मग्न झाला आहे. असे अस्त्र की ज्यामुळे साऱ्या जगावर जर्मनी आपली सत्ता प्रस्थापित करील!

मार्च महिन्यात एके दिवशी सकाळी गुप्ततेची शपथ शंभराव्यांदा घेऊन झाल्यावर राखाडी गणवेषातल्या एका अंमलदाराने त्याला बोलावून

सांगितले, "खूशखबर ऐका! तुमचं बिऱ्हाड बदलतंय. तुम्हाला आता लेफ्टनंटचा हुद्दा बहाल करण्यात येत आहे. दुसरं असं की शुल्झसाहेबांनी तुम्हाला भेटीला बोलावलं आहे."

मॅक्सने एक आवंढा गिळला. ज्यासाठी जिवाचा एवढा आटापिटा केला ते ईप्सित आता साध्य होत होते! 'सक्त मनाई' ची शेवटची भिंत ओलांडून आत प्रवेश मिळताच त्याला असे झाले की आपण जणू नाटकाचे एखादे पूर्णपणे बदललेले दृश्य बघतो आहोत. आतापर्यंत कारखान्याचा जो कर्णकर्कश आवाज कानांवर पडत होता तो एकाएकी बंद झाला. या अंतर्भागात नांदत होती नीरव शांतता. रुक्ष, खडबडीत मरुभूमीऐवजी इथे पसरले होते हिरवळीचे अन् नाजूक सुंदर वनस्पतीचे राज्य. हा चमत्कार कसा काय होऊ शकतो हेच त्याला कळेना. उष्ण प्रदेशात वाढणारी कितीतरी फळझाडे नि फुलझाडे इथे होती.

या सर्व सृष्टीला जी ऊब आवश्यक, ती मिळते तरी कुठून?

आणि मग त्याच्या लक्षात आले - इथून जवळच एक कोळशाची धगधगीत खाण आहे, तिथली उष्णता इथे पाइपमधून तर आणलेली नसेल? खालीवर कुठे असे पाइप दिसतात का म्हणून त्याने पाहिले, पण पायांखाली होता हिरवळीतून जाणारा वाळूचा रस्ता. बरं, उष्णतेचं एक वेळ जाऊ दे. पाण्याचं काय? हा एवढा बगीचा फुललाय त्याला पाणी कुठून मिळतं? काही असो. ज्याने गेल्या सहा महिन्यांत गवताचे पाते सुद्धा पाहिले नव्हते त्या मॅक्सचे डोळे आता सभोवार हिरव्यागार सृष्टीचे दृश्य पाहात होते.

या परिसराची देखभाल करणारे सात-आठ लाल गणवेषातले नोकर त्याला दिसले. आणि मग तो जेव्हा शुभ्र संगमरवरी पायऱ्या चढून मनोऱ्याच्या चौथऱ्यावर पोचला तेव्हा आपल्या पायांखाली कसला तरी

धडधडाट चालू आहे असे त्याला जाणवले. 'ही भुयारी रेल्वे असणार!' तो आपल्याशी पुटपुटला.

मनोऱ्याचा हा प्रवेशाचा भाग भव्य नि सुंदर होता. त्याला चौफेर ग्रीक पद्धतीचे गोल खांब होते. वर छतातून लोंबत होते एक प्रचंड स्फटिकतुल्य काचांचे झुंबर. भरजरी गणवेषातल्या एका पोर्टरने त्याचे स्वागत केले; आणि एका शिपायाबरोबर त्याला आतल्या दालनात पाठवले. शिल्पकलेच्या उत्कृष्ट नमुन्यांनी सजवलेल्या या दालनाची शोभा तांबड्या नि सोनेरी रंगांनी वृद्धिंगत केली होती. इथे त्याला थोडे थांबावे लागले. शिपाई आत वर्दी देण्यासाठी गेला अन् थोड्याच वेळात परत आला.

"चला आत. साहेबांनी बोलावलंय."

आतली खोली म्हणजे अतिभव्य नि सुसज्ज अशी अभ्यासिका होती. आरशासारखा तकतकीत पृष्ठभाग असलेल्या एका विस्तीर्ण टेबलाशी, मऊ गादीच्या खुर्चीत आपल्या आवडत्या पाइपमधून धुराचे भपकारे सोडीत बसले होते पोलादपूरचे सर्वेसर्वा डॉ. शुल्झ.

आत आलेल्या माणसाकडे त्यांनी मान वळवून पाहिले सुद्धा नाही. फक्त थंड सुरात प्रश्न केला, "इथले नवे ड्राफ्टमन तुम्हीच का?"

"येस सर."

"तुम्ही काढलेले आराखडे मी पाहिले. चांगले आहेत. स्टीम इंजिनखेरीज दुसऱ्या कोणत्याही विषयात तुम्हाला रस नाही का?"

"असला तरी माझी चाचणी फक्त याच विषयात घेण्यात आली आहे."

"गोलंदाजीचं शास्त्र तुम्हाला कितपत कळतं?"

"फावल्या वेळात मी त्याचा अभ्यास केलाय. आवडतं मला ते."

या उत्तराने शुल्झसाहेबांचे कुतूहल जागृत झाले. त्यांनी आता त्याच्या चेहऱ्याकडे पाहिले.

"हं. मला एक तोफ बनवायची आहे. तिचा आकृतिबंध तुम्ही तयार कराल? तुमच्यावर मी विश्वास टाकतो आहे. तुमच्या आधी जो मूर्खशिरोमणी या जागेवर होता, त्याने आज सकाळी गाढवासारखा स्फोट घडवून आणला. एवढी कृपा केली की फक्त स्वत: मेला; आम्ही जिवंत राहिलो."

मॅक्सने एक आवंढा गिळला. तो मनात म्हणत होता, कर्तव्य करताना स्वत:चा बळी देणाऱ्या माणसाबद्दल काय कृतघ्नता ही! बाकी या नरपशूकडून दुसरी कोणती भाषा अपेक्षित होती म्हणा!

●



११. प्रो. शुल्झ रहस्य फोडतो

त्या दिवसापासून प्रो. शुल्झना मॅक्स हा तरुण अतिशय आवडू लागला. त्याच्या हुशारीवर ते बेहद्द खूष होते. अलीकडे साहेब नि मॅक्स सतत एकमेकांच्या सान्निध्यात असत. त्यांचे जेवण सुद्धा एकत्र व्हायचे. त्याच्या शास्त्रीय ज्ञानावर साहेब इतके भाळले होते की फार वर्षांनी आपल्याला योग्यसा मदतनीस मिळाला अशी त्यांची भावना झालेली होती.

पण इतके सर्व होऊनही मॅक्सला त्यांनी पूर्ण विश्वासात घेतले होते असे म्हणता येणार नाही. 'बुलटॉवर' मध्ये पाच महिने घालवल्यावरसुद्धा त्याला त्या इमारतीचे गूढ यत्किंचितही उकलले नव्हते. पण ते गूढ उकलणे हेच तर त्याचे उद्दिष्ट होते....

आणि ते साधण्यासाठी त्याने एक दिवस धाडसी उडी घेण्याचे ठरवले.

सप्टेंबरची ५ तारीख होती. दोघांनी रात्रीचे जेवण नुकतेच उरकले होते.

तेवढ्यात एका नोकराने दोन पाइप आणून त्यांच्यापुढे ठेवले. प्रो. शुल्झनी आपला पाइप शिलगावला अन् त्याचे झुरके घ्यायला सुरुवात केली. याच अत्युच्च सुखाच्या क्षणाची मॅक्स वाट पाहत होता. तो आता एकदम बोलून गेला, "साहेब, खरं म्हणाल तर मला हे धोरण तितकंसं बरोबर वाटत नाही."

"कसलं धोरण ?"

"हे जर्मनीने जिंकण्याचं धोरण !"

"का बरोबर वाटत नाही ?" प्रोफेसरसाहेबांनी तोंडातला पाइप काढून हातात धरला होता.

ते वटारल्या डोळ्यांनी मॅक्सकडे पाहत होते. त्याच्या बोलण्याने त्यांना एवढा प्रचंड धक्का बसला होता की क्षणभर त्यांचा श्वास घुसमटल्यासारखा झाला. मग एकाएकी त्यांच्या शिरातले रक्त मस्तकाकडे धाव घेऊ लागले. त्यांचा चेहरा लालबुंद झाला. क्षणमात्र मॅक्सला अशी भीती वाटली होती की आपण जरा फाजील उडी घेतली की काय ? पण नाही, हीच वेळ घाव घालण्याची आहे असे ठरवून तो लगेच पुढे म्हणाला, "साहेब, आम्हाला असं वाटतं का की १८७० च्या अनुभवातून फ्रेंच लोक काहीच शिकले नाहीत ? ते आता नवी अस्त्रं शोधून काढण्याच्या मागे आहेत आणि आपण ? आपण काय करतो आहोत ? जास्ती जास्ती अवजड तोफा ओततो आहोत, दुसरं काय ? ब्राँझच्या तोफा गेल्या, लोखंडी आल्या. जास्ती मोठ्या अन् वजनदार. पण शेवटी तोफाच. संशोधक दृष्टी फ्रेंच माणसाकडे आहे

तशी आपल्याकडे आहे का?''

शुल्झसाहेब ऐकत राहिले. बाह्यत: त्यांचा नूर आता शांत बनला होता. पण त्यांच्या अंतर्यामी काय चालले होते याची साक्ष त्यांच्या थरथरत्या ओठांवरून स्पष्ट होत होती.

ते ताडकन् उठले. मॅक्सकडे उपहासपूर्ण दृष्टिक्षेप करून दातांनी ओठ दाबत ते फिसकारले, ''आगाऊ तरुणा! माझ्याबरोबर चल! संशोधक वृत्ती म्हणजे काय याचा नमुना तुला दाखवतो!''

मॅक्सची आता खात्री झाली की आपण खेळलो ती खेळी योग्य होती. तारतम्यावर अहंभावाने विजय मिळवला होता. तो उठला अन् शुल्झसाहेबांच्या मागोमाग त्यांच्या अभ्यासिकेत गेला. तिथे चौफेर जी पुस्तकांची शेल्फे होती त्यापैकी एका शेल्फजवळ जाऊन प्रो. शुल्झ यांनी एक विशिष्ट कळ दाबली. लगेच शेल्फ बाजूला सरकले आणि आतली भली मोठी पोकळी उघडी झाली. आत होता एक लोखंडी जिना. त्याच्या दोनशे पायऱ्या चढून दोघे वर गेले ते बुलटॉवरच्या शिखरावर पोचले. इथून चौफेर नजर फिरवली की संपूर्ण स्टालस्टाट नगर दिसायचे.

मनोऱ्याच्या या प्रचंड घुमटात मध्यभागी सुरक्षित काचेच्या आवरणाखाली ठेवलेली होती एक अतिप्रचंड पोलादी तोफ. तीनशे टन तरी तिचे वजन असेल आणि तिच्या नळीचा व्यास होता पाच फूट. एका पोलादी गाड्यावर ती ठेवलेली होती आणि पोलादी रुळांवरून मागे पुढे नेता येण्याची सोय होती. तोफेचा गाडा सरकवण्याचे हे काम एखादा लहान मुलगाही करू शकेल इतके सोपे होते.

''बाप रे! या बयेची भेदक शक्ती किती असेल?''

''वीस हजार यार्डांवरून डागली तर ही तोफ चाळीस इंच जाडीचा

पत्रा भेदू शकेल. अगदी सहजगत्या. सुरीने पाव कापावा तितक्या सहज."

"हिचा मारा ? म्हणजे गोळ्याची फेक ?"

"रेंज म्हणतोस ? तीस मैल !"

"तीस मैल ? बाप रे ! गन पावडर तरी कोणती वापरता ?"

"सांगतो. आता तुझ्यापासून मी काही चोरून ठेवीत नाही," प्रो. शुल्झ रंगात येऊन म्हणाले, "मोठ्या कणांची गनपावडर आता कालबाह्य ठरली आहे. मी वापरणार आहे गनकॉटन. याची प्रसरणशक्ती नेहमीच्या पावडरीपेक्षा चौपट आहे आणि मी त्यात नायट्रेट ऑफ पोटॅश मिसळून ती पाचपट करणार आहे."

"पण---" मॅक्सने शंका काढली, "पण अशा प्रकारची तोफ. ती अगदी स्टीलची बनवलेली असली तरी--फार काळ टिकणं शक्य नाही. चार - पाच फैरीतच ती खलास होईल."



"तिने एक शॉट झाडला तरी पुरे आहे! तो शॉट जर एक अब्ज बळी घेणार असेल तर काम भागलं की!"

"एक अब्ज लोक!" मनातून घाबरलेला मॅक्स उद्गारला.

"आहे मोठं झकास अस्त्र. पण काही झालं तरी या पूर्वीच्या अस्त्रावर केलेल्या सुधारणा आहेत. यात नवीन संशोधन काही नाही."

"नवीन संशोधन! हूं!" शुल्झसाहेब खांदे उडवीत म्हणाले, "चल, तुला आणखी एक रहस्य दाखवतो."

●

१२. फ्रँकव्हिलला धोका!

स्टीलसम्राट शुल्झ आपल्या तरुण 'सहकाऱ्या' ला घेऊन आता आणखी एका गुप्त जागेकडे निघाला. त्यासाठी त्यांना आता एका जलनियंत्रित 'लिफ्ट' मधून खाली जावे लागले. या ठिकाणी सारख्या दिसणाऱ्या अशा कितीतरी लंबगोलाकार वस्तू व्यवस्थित मांडून ठेवलेल्या होत्या. सिलिंडरे ? नाही.

"हे आहेत आपले कुलपी गोळे!" साहेब म्हणाले.

असले अग्निगोल आपण पूर्वी कधी पाहिलेले नाहीत हे मान्य करणे मॅक्सला भाग पडले. यांतला प्रत्येक गोळा सहा फूट लांबीचा नि तीन फूट व्यासाचा होता. त्याला शिशाचे आवरण असून पुच्छभागी पोलादी पत्रा होता. पुढली बाजू अणकुचीदार टोकाची असून आपटताच हादरा सोसणारी स्प्रिंग त्याला जोडलेली होती.

"यांची शक्ती बरीच असणार यात शंका नाही," मॅक्स म्हणाला. "पण त्यासाठी एवढा लांबलचक अन् अवजड आकार आवश्यक होता का?"

"त्यांच्या आकारावर जाऊ नकोस," प्रो. शुल्झ म्हणाले. "अवाढव्य तरी तो आकार फसवा आहे. याचं वजन नेहमीच्या तोफगोळ्यापेक्षा जास्त नाही. त्याचं गुपित असं आहे, श्वार्झ– आणि खास माझं संशोधन आहे ते - गोळ्यांचं आवरण लाकडी आहे, पोलादी नाही. आणि याच्या अंतर्भागात आहे एक काचेची भली मोठी कुपी. या अस्त्राची ताकद त्या कुपीत आहे - आत द्रवरूप कार्बन डाय - ऑक्साईड भरलेला असून त्या वायूचा दाब हवेच्या दाबाच्या सत्तरपट इतका प्रचंड आहे. गोळा इष्टस्थळी आपटला की त्याचा स्फोट होऊन द्रवरूप कार्बन डाय

ऑक्साईडचं रूपांतर वायूत होतं. हा वायू विराट रूप धारण करून सारा आसमंत व्यापून टाकतो. त्यामुळे त्या परिसरातली हवा गारढोण बनते. तापमान शून्याच्या खाली शंभर अंश जाते. त्याच्या केंद्रभागापासून तीस यार्ड परिघातला प्रत्येक जीव घुसमटतो, थिजतो, गोठतो. तीस यार्ड हे मी कमीत कमी अनुमान सांगितलं. शे - दोनशे यार्ड धरायला हरकत नाही.

''याची आणखी एक गंमत अशी आहे की हवेपेक्षा जड असल्यामुळे हा गॅस कितीतरी तास भुईला चिकटून राहील. यामुळे पहिल्या स्फोटानंतर बऱ्याच काळपर्यंत हा परिसर धोक्याचा राहील. त्यात प्रवेश करणारा कोणताही प्राणी जिवंत राहणार नाही. मेहेरबानी ही समज की कोणताही प्राणी जखमी होणार नाही; क्षणार्धात मरेल!''

प्राणिसृष्टीवर आपण ही केवढी मेहेरबानी करतो आहोत, असा अहंकार त्या सैतानी शास्त्रज्ञाच्या बोलण्यात स्पष्ट उमटला होता. पटावरच्या सोंगट्यांसारखे दिसणारे त्याचे दात चकचक करीत होते.

''कल्पना कर - माझा तोफखाना एवढा प्रचंड आहे की प्रत्येक चौकीवर दहा तोफा, अशा शंभर चौक्या गोलंदाजीसाठी सज्ज आहेत. हवा अनुकूल आहे. विजेच्या तारेतून 'फायर' म्हणून संदेश जाताच या एक हजार तोफा एकसाथ मारा सुरू करतील आणि काय होईल? शत्रूचं वेढ्यात पडलेलं अडीच हजार एकर व्यापाचं शहर - त्याची राखरांगोळी! साऱ्या शहरावर पसरेल तो विषारी वायूचा महासागर आणि एका मिनिटात सारे जीव त्यात बुडून गतप्राण होतील!''

हे 'गोड' भविष्य वर्तवताना तो राक्षस जणू मिटक्या मारीत होता!

''इटलीच्या नेपल्स शहरातल्या 'ग्रातो देल कॅनो' त गेलो असता हा प्रकार माझ्या प्रथम पाहण्यात आला. ग्रातो देल कॅनो म्हणजे काय

माहित्ये ? कुत्र्यांची गुंफा - कुत्तेखाई ! वदंता अशी होती की या परिसरात जाणारा प्रत्येक कुत्रा घुसमटून मरायचा; माणूस मात्र जिवंत राहायचा. याचं रहस्य भुईला लगटून जो कार्बन डाय-ऑक्साईड होता त्यात असे. या ठिकाणची संभाव्य ताकद माझ्या केव्हा लक्षात आली, माहीत आहे ?''

''केव्हा ?''

''वर्षापूर्वी तो खाणीत काम करणारा छोटा पोरगा जेव्हा मेला अन् त्याचं कारण मेडिकल रिपोर्टावरून कळलं, तेव्हा !''

म्हणजे त्या कोवळ्या पोराच्या मृत्यूमुळे याच्या राक्षसी प्रयोगाला संजीवनी मिळाली. मॅक्स हतबद्ध होऊन शुल्झकडे पाहत राहिला. विजयोन्मादाच्या तेजाने शुल्झचा चेहरा थबथबला होता.

''मला आता तपशिलात उणीव भासत आहे ती एकाच गोष्टीची,'' राक्षस सचिंत स्वरात बोलत होता.

''ती कोणती गोष्ट ?''

''आवाज ! या अतिप्रचंड स्फोटाचा दणका ! तो मला नको आहे. मला हवा आहे तो सायलेंट स्फोट ! एका शांत सुरम्य रात्री एक लाख नागरिकांचा अंत क्षणार्धात व्हावा आणि त्याचा त्रास कुणाच्याही कानांना होऊ नये हे माझं स्वप्न आहे.''

तमाम प्राणिसृष्टीच्या कानांची केवढी काळजी ही ! पण प्रोफेसरसाहेब आपल्या स्वप्नात रंगले असतानाच मॅक्सच्या प्रश्नाने त्यांना जागे केले.

''हे सगळं छान आहे !'' तो म्हणत होता, ''पण अशा एक हजार तोफा उभ्या करायच्या म्हणजे वेळ किती लागेल ? आणि पैसा---''

''पैसा माझ्याकडे अमाप आहे आणि वेळ म्हणशील तर त्या हजार तोफांचा उपयोग हजारो जर्मन केव्हाही करू शकतील. मला तातडीने

उपयोगात आणायची तोफ कोणती ते तू पाहिलं आहेसच. तीत घालण्याचा कुलपी गोळा वेगळाच आहे. हा बघ तो गोळा!''

असे म्हणून त्याने मॅक्सला एका खास अजस्र कुलपी गोळ्याकडे नेले.

''याच्या अंतर्भागात काय ठेवलेलं आहे, माहीत आहे?---असले शंभर छोटे गोळे! दुर्बिणीसारखी त्या गोळ्यांची रचना आहे. म्हणजे एकाच्या आत दुसरा बसवलेला अशी शंभर गोळ्यांची एक साखळी. ती तोफ जेव्हा डागण्यात येईल तेव्हा हा कुलपी गोळा हवेचं पटल फाडून अंतराळातून उड्डाण करील. त्याचा वेग इतका असेल की तीस मैलांवरचं आपलं उद्दिष्ट गाठायला त्याला एक क्षण पुरेल. दुसऱ्या क्षणी तो गोळा फुटेल आणि त्यातून शंभर गोळे बाहेर पडून धडाधड आग ओकू लागतील. सारं शहर भस्मसात व्हायला एक क्षणही लागणार नाही!...आणि हा प्रयोग लवकरच होणार आहे, श्वाझ्र...''

''केव्हा? कुठे? कसा काय?''

''सांगतो, ऐक. माझ्या या स्टालस्टाट शहरापासून तीस मैल अंतरावर कास्केड पर्वतराजींच्या पलीकडे एक शहर वसलेलं आहे. त्याचं नाव फ्रँकव्हिल. बुलटॉवरवर ठेवलेली तोफसम्राज्ञी ते शहर भस्मसात करील. केव्हा? आज आहे डिसेंबरची ५ तारीख. आजपासून आठ दिवसांनी १३ डिसेंबरच्या मध्यरात्री - मिनिटन्‌मिनिट हवं असेल तर ठीक पावणेबारा वाजता तोफेला बत्ती देण्यात येईल आणि धुडुम्....दर्रर...''

●

१३. मरणाच्या दारात मॅक्स

स्वत:च्याच तोफांचा भडिमार! पण तो आवाज प्रोफेसरांना नको होता, म्हणून त्यांनी आताच कानांत बोटे घातली होती. आणि ते भयंकर भाकीत ऐकताना मॅक्सच्या अंगातले रक्त जणू गोठत चालले होते. सुदैवाने त्याची ती अवस्था प्रोफेसरांच्या लक्षात आली नाही.

"कळला ना तुला आता माझा बेत?" ते बोलू लागले. "फ्रँकव्हिल नगर वसवणाऱ्याचा हेतू नि माझा हेतू यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. डॉ. सॅरासिनला माणसांचं आयुष्य निरोगी नि संपन्न करायचंय. मला ते मुळी उखडूनच टाकायचंय!"

माणसं असं बोलू शकतात? मॅक्सला ते खरे वाटेना.

"पण... असं का? फ्रँकव्हिलच्या लोकांनी तुमचं काय घोडं मारलंय?"

"मला त्यांना त्यांचं घोडं दामटू द्यायचं नाहीये!" शुल्झ ओरडला आणि मग एकदम आवाज खालावून म्हणतो, "मॅक्स, तू एक अतिशय बुद्धिमान तरुण आहेस. पण तुझ्यावरचे संस्कार जुने आहेत....बुरसटलेले. सत्य-असत्य, पाप - पुण्य या साऱ्या कल्पना सापेक्ष आहेत, बेटा! निसर्गनियमांखेरीज जगात दुसरं काही खरं नाही. गुरुत्वाकर्षणाचा नियम मानवी वर्तनालाही लागू आहे. खेचाखेच - स्पर्धा! एक दुसऱ्याला खेचतो किंवा ढकलून देतो. एक पुढे जातो - दुसरा मागे पडतो. मला शुद्ध रक्ताचे जर्मन पुढे जायला हवे आहेत, कारण ते गुणवंत वंशाचे आहेत. ते आर्य आहेत. अनार्यांचा ते नि:पात करतील!"

शुल्झ इतका वाहावत चालला होता की त्याला अडवणे शक्य नाही हे मॅक्सने ओळखले. तो गप्प राहिला.

प्रो. शुल्झ परत निघाले. तोही त्यांच्या बरोबर निघाला. प्रत्येक दरवाजा बंद करीत त्यांनी दालनांमागून दालने ओलांडली आणि ते पहिल्या जागी परतले - भोजनगृहात.

खुर्चीवर बसल्या बसल्या प्रो. शुल्झनी शांतपणे नवा पाइप मागवला आणि आत आलेल्या नोकराला विचारले, "आर्मिनियस अनूसिगिमर हजर आहेत ?"

"आहेत, सर."

"त्यांना मी केव्हाही बोलवीन, तयार रहायला सांग."

नोकर निघून गेल्यावर प्रो. शुल्झनी आपली तीक्ष्ण नजर मॅक्सवर रोखली. त्या नजरेत पोलादाची शक्ती होती. पण मॅक्स जराही डगमगला नाही. तो म्हणाला, "तुम्ही खरोखरीच हा बेत अमलात आणणार आहात ?"

"त्याबद्दल शंकाच नको. फ्रँकव्हिलचे अक्षांश-रेखांश माझ्याकडे टिपलेले आहेत. मारा अचूक होईल; त्यात इंचाचीही चूक होणार नाही. १३ सप्टेंबरच्या मध्यरात्री म्हणजे पावणेबारा वाजता फ्रँकव्हिल शहर नामशेष होईल."

"मग हा बेत तुम्ही गुप्त तरी ठेवायचा होतात !"

"माझ्या मित्रा !" शुल्झसाहेब गालात जीभ घोळवीत म्हणाले, "तुला तर्कबुद्धी अगदीच नाही का रे ? असा अजागळपणा तू दाखवलास की वाटतं - तरुणपणी तुला मरणं यावं यात फारसं दुःखदायक काही नाही."

मॅक्सने ते शब्द ऐकले आणि तो ताठ उभा राहिला.

प्रोफेसरांनी टेबलावरची घंटी दाबली. दोन राक्षस आत येऊन उभे राहिले. आर्मिनियस अनूसिगिमर.

‘‘माझं गुपित ज्याला कळतं तो माणूस जिवंत राहात नाही,’’ प्रो. शुल्झ कोरड्या थंड आवाजात म्हणाले, ‘‘तुला आता मरणं भाग आहे.’’

मॅक्स निरुत्तर राहिला.

‘‘तू हुशार आहेस. तुला माझ्या योजना कळल्यावर जिवंत ठेवणं ही घोडचूक होईल. माझ्या नियमांत ते बसत नाही. तुझ्या आधीचा माणूस मेला तो याच कारणामुळे; अपघातामुळे नाही.’’

मॅक्सने त्यांच्याकडे पाहिले. तो कठोर स्वर, ती निर्घृण नजर, ते तळपणारे टक्कल....साऱ्या साऱ्या गोष्टी त्याच्या विरुद्ध जात होत्या. आपले मरण अटळ आहे हे त्याला कळून चुकले. प्रतिकाराचा एक शब्दही उच्चारण्यात अर्थ नव्हता.

‘‘चिंता करू नकोस’’ प्रो. शुल्झनी त्याला आश्वासन दिले. ‘‘मृत्यूपूर्वी तुला कोणताही त्रास होणार नाही. एका सुप्रभाती तू जागा होणार नाहीस एवढंच !’’

त्यांनी खूण करताच त्या दोघा दांडग्यांनी मॅक्सला धरून नेले आणि एका खोलीत कोंडून ठेवले, दाराबाहेर सतत पहारा करण्याची त्यांना ताकीद होती.

मॅक्स खोलीत एकटा पडला आणि स्मृतिचित्रांची एक परेड त्याच्या मनश्चक्षूंपुढून जाऊ लागली.

त्यांची आवडती माणसं....डॉ. सॅरासिन, ऑटो, जीनेट, त्या भावंडांची प्रेमळ आई....आणि....आणि सारेच त्याचे फ्रेंच बांधव स्नेहबंधांनी त्याला आपल्याकडे ओढत होते.

‘माझं मरण म्हणजे क:पदार्थ आहे,’ तो स्वत:शी म्हणत होता. ‘पण त्यांचं काय होईल आता ?’

मॅक्सला भेडसावणारे संकट फार भयानक होते. कोणत्याही क्षणी

मृत्यू त्याच्यावर झडप घालणार होता.

त्या रात्री त्याला क्षणाचीही झोप लागली नाही. 'नाही - नाही!' तो म्हणत होता, "मला पळालं पाहिजे! मला इथून निसटलं पाहिजे! मरणाला मी भीत नाही. पण माझ्या प्रिय जनांना धोक्याचा इशारा देण्यासाठी मला पळालं पाहिजे!...पण कसा पळणार इथून? कसा निसटणार या सैतानाच्या पोलादी पंज्यामधून?"

'केवढं भयंकर अस्त्र उभं केलंय या पिसाट पशूने? तीस मैलांवरची ती सुंदर नगरी हा क्षणात उद्ध्वस्त करणार? म्हणजे केवढी गती असेल त्या उडत्या अग्निगोलाची? सेकंदाला नऊ मैल?...पृथ्वी सूर्याभोवती ज्या तीव्र वेगाने फिरत असते त्याच्या एकतृतीयांश झाला की हा वेग? मी त्याला थांबवू शकणार नाही का?....नाही! ते कसं शक्य आहे? ही पोलादी यंत्रणा मी पामर कसा उद्ध्वस्त करणार? आधी मीच मुळी मृत्यूच्या दारात येऊन पडलो आहे. हाल न करता मारणार आहे म्हणे तो मला. म्हणजे कसा? तसलाच कार्बन डायऑक्साईड वापरून?....एखाद्या पेयातून दिलेलं द्रवरूप विष? जे द्रव क्षणार्धात वायुरूप धारण करून माझ्या आत्म्याला थंड करील? ....देवा...देवा....देवा!'

"पण नाही. माझे हाल होवोत न होवोत, मी असा स्वस्थ पडून मरणार नाही."

हे शेवटचे शब्द मोठ्याने उच्चारून तो उठला आणि आपण बंद कोठीत आहो हे माहीत असूनही दरवाज्याकडे गेला. त्याने दार ढकलले आणि चमत्कार असा की ते सहज उघडले.

तो बाहेर पडला. बागेत गेला. रोज या बागेत हिंडायची सवय होतीच त्याला. पण आज? आश्चर्याची गोष्ट ही की आजही त्याला

हिंडायला मिळत होतं....हे कसं काय ?

नाही. ती इतकी साधी गोष्ट नव्हती. त्याने जरा मागे वळून पाहिले तेव्हा त्याला कळून चुकले की ते दोन मृत्युदूत आपला पाठलाग करतातच आहेत. राखाडी पोशाखातले ते दोन राक्षस. काय एकेकाचा अवतार तरी! रानदांडगं शरीर, रेड्यासारखी गर्दन आणि घाबरवणाऱ्या मिश्या नि कल्ले! त्यांना मुळी हुकूमच असणार या कैद्याचा पिच्छा सोडू नका म्हणून! अंगरक्षक म्हणून हिंडा. त्याच्या मागे मागे....आणि वेळ येताच त्याचे अंगभक्षक बना!

'आणि बोलत पण नाहीत एक अक्षर. मुके नि बहिरे आहेत की काय तरी?'

त्यांना काहीतरी विचारण्याचा मॅक्सने प्रयत्न केला. पण उत्तर म्हणून

त्यांनी याच्याकडे नुसते डोळे वटारून पाहिले. अंगार ओकणारे लालभडक डोळे!

बागेत हिंडून झाले. नवा दिवस उजाडला. चहापाणी झाले. अजून तरी मॅक्सचे मरण ओढवले नव्हते.

●

१४. राखरांगोळी

पुन्हा बागेत एक फेरी. मनातले विचार सारखे त्या दोन राक्षसांसंबंधी. काय करून फितवावं त्यांना? खोलीत मद्याची एक बाटली होती. ते त्याने त्यांना देऊ केले. उत्तर मिळाले अग्निओक्या नजरेचं!

पण त्याच्या एक लक्षात आले. यांना शौक आहे तो एकच. धूम्रपान. प्रत्येकाजवळ सतत एक पाइप असायचा अन् त्यातून भपकारे निघत असायचे.

त्या धूम्रवलयात तर नसेल आपल्या सुटकेचं उत्तर गुरफटलेलं?

दिवास्वप्नच म्हणायचं. पण योगायोग असा की उत्तर त्यातच सापडावं.

त्याचं असं झालं... दुसऱ्या दिवशी मॅक्स बागेतून फेरफटका मारीत होता. प्रत्येक झाडाशी थांबून त्याच्या पानाफुलांचे कुतूहलाने निरीक्षण करीत होता. अगदी सहज एका रोपट्यापाशी तो थांबला. रोपटे तसे दिसण्यात सुंदर मुळीच नव्हते. गावठी किंबहुना रानटीच. त्याच्या एकाच फांदीला दोन दोन प्रकारची तांबडी पाने फुटलेली होती. काही लांबट गोल तर काही चिंचोळी टोकदार. काहींच्या वळून घड्या पडलेल्या आणि मधून मधून लोंबत होती लांब देठाची, घंटेच्या आकाराची फुले.

मॅक्सने एक छंद म्हणून वनस्पतिशास्त्राची पुस्तके चाळलेली होती. त्यांत या झाडाचे चित्र त्याने पाहिलेले होते. त्याचे गुणधर्म त्याला एकाएकी आठवले. त्याने पटकन् एक पान तोडले अन् चघळले. अगदी सहज जाता. जाता आणि मिनिटभराने त्याला असे वाटले की आपले हात जड झाले आहेत, पावलं मंद पडताहेत आणि डोक्यात गलबलतं आहे.

नशा! त्याला नशा चढत होती.

हे झाड कोणते आहे ते मॅक्सला आता कळून चुकले...बेला डोना. चव घेताक्षणी धुंद करणारी अमली वनस्पती.

चोथा थुंकून टाकून तो तसाच पुढे गेला. बागेच्या दक्षिण टोकाला एक कृत्रिम तलाव होता. पुष्करिणी. पण पाणी स्थिरावलेलं वाटत नाही. हे आलं असेल कुठून, अन् जात असेल तरी कुठे?

मॅक्स शोधक नजरेने पाहत होता; तर त्याला असे दिसले की तलावाच्या कडेला एका ठिकाणी कलात्मक पद्धतीने तयार केलेला एक धबधबा आहे. त्यातून पडणारा जलस्रोत भुयारी मार्गाने कुठेतरी बाहेर पडतो आहे.

कितीतरी वेळ मॅक्स ते दृश्य पाहत उभा होता. जणू काही धबधब्याची मौज पाहण्यात रंगला आहे. अखेर आपल्या 'रक्षकां'ना शंका येऊ नये म्हणून तो तिथून माघारी वळला. पण त्या मिनिटभरात त्याच्या मनाचा निश्चय झाला होता. देह पडो अथवा राहो...

काय वाट्टेल ते करून या राक्षसी कैदेतून सुटायचेच असा घोर निश्चय मॅक्सने केला होता. त्या दिवशी बागेतून परतताना त्याने त्या तांबड्या रोपट्याची काही पाने पहारेकऱ्यांच्या नकळत ओरबाडून घेतली. खोलीत आल्यावर शेकोटीपाशी धरून ती त्याने सुकवली. मग त्यांचा चुरा करून तो आपल्या जवळच्या तंबाखूत मिसळला.

आणखी सहा दिवस निघून गेले. मॅक्स रोज सकाळी उठायचा अन् नवल करायचा : हे काय? अजून आपण जिवंत आहो?

पण जिवंत राहण्याची जी वाढती मुदत आपल्याला मिळते आहे तिचा शक्य तेवढा फायदा घेण्याचे मात्र मॅक्सने नक्की ठरवले होते; त्यासाठी योजना आखल्या होत्या. आता तो रोज त्या बेलाडोनाची पाने तोडून आणी. आपण हे कृत्य चोरून करतो आहो असे नाटक

तो करी; पण कसे? आपल्या पहारेकऱ्यांच्या ते लक्षात यावे अशा प्रकारे मुद्दामच.

अर्थात तो स्वत: या पानांचे कधीच सेवन करीत नसे. तो ती तंबाखूत मिसळतो, पण त्याची पिशवी वेगळी ठेवतो हे त्या रक्षकांना कुठे माहीत होते? तो स्वत: साधा तंबाखू ओढायचा.

आणि त्याचा डाव सिद्धीला गेला. आपला कैदी या विशिष्ट रोपट्याची पाने रोज तोडून नेतो अन् त्याचा चुट्टा तंबाखूत भरतो हे त्यांच्या लक्षात आले.

त्या दिवशी सकाळी बागेत हिंडताना त्याने सहज दृष्टिक्षेप केला, तर ते दोघे तीच पाने तोडताहेत असे त्याला दिसले.

आणखी एका तासाने पाने शेकाभोवती भाजून ती पाइपमध्ये भरताना त्याने त्यांना पाहिले.

संध्याकाळी बागेतली सहल आटोपल्यावर तो तिथल्याच एका इमारतीच्या भिंतीला टेकून बसला अन् आरामात पाइपचे झुरके घेऊ लागला.

त्याच्या पहारेकऱ्यांनी ते पाहिले आणि तेही धूम्रसेवन करू लागले.

अवघ्या पाच मिनिटांत त्यांनी जांभया द्यायला सुरुवात केली. त्यांचे आडदांड देह धरणीवर आडवे झाले. जशी काही पिंजऱ्यात अंग तण्णावून पडलेली अस्वले. त्यांच्या डोळ्यांतले तेज मंद बनले होते अन् अंगे निळी पडली होती. हात लुळे होऊन दोन्हीकडे लोंबत होते.

चिलमी हातातून केव्हाच गळून पडल्या होत्या. त्यांनी घोरायला आरंभ करताच मॅक्स ताडकन उठला. ज्या इमारतीला टेकून आपण बसलो आहो ती एक कार्यशाला - वर्कशॉप आहे हे त्याला माहीत होते.

तो आत घुसला. तिथे कितीतरी प्रकारच्या यंत्रांचे लाकडी नमुने मांडून ठेवलेले होते. तऱ्हेतऱ्हेची बाष्पयंत्रे नि पंप. अगदी जहाजसुद्धा. आणि हो - शस्त्रास्त्रांचे नमुनेही होतेच की - लहानमोठ्या तोफा, टॉर्पेडो किंवा पाणतीर अन् तऱ्हेतऱ्हेचे कुलपी गोळे. पण प्रत्येक मॉडेल लाकडी तकलादू.

रात्र अंधारी होती. मॅक्सच्या धाडसी योजनेला समय अनुकूल होता. बुलटॉवर पाडणं आपल्याला जमेल न जमेल, तो पुढचा विचार आहे. सध्या हे मॉडेलहाऊस तर उडवून लावू.

पण उसळत्या मना, थांब! आधी दुसरंच काही साधायचं आहे. ती भिंतीवरच्या खिळ्याला लटकणारी - लोखंड कापणारी छोटी करवत – हॅकसॉ.

मॅक्सने ती झटक्यात ओढून घेतली अन् खिशात कोंबली. मग आगपेटी काढून त्याने काडी शिलगावली अन् तिथे पडलेले काही नकाशे पेटवून दिले. ती आग हा हा म्हणता भडकली. जवळच्या इतर इमारतींनाही तिची झळ पोचली.

विजेच्या घंटा खणखणू लागल्या. आगीचे बंब त्वरेने धावून आले. जिकडे तिकडे एकच हलकल्लोळ उडाला. जो तो हरतऱ्हेने आग विझवण्याचा प्रयत्न करू लागला. शक्तिशाली पंप पाण्याचे फवारे उडवीत होते. पण त्या प्रचंड पाणलोटाखाली सुद्धा आग विझण्याची चिन्हे दिसेनात. उलट ज्वाळांचे आणखी लोळ आकाशाकडे झेपावू लागले. आगीने सारा परिसर व्यापून टाकला.

कारखान्याचे मालक प्रो. शुल्झ स्वतः त्या ठिकाणी आले आणि आग विझवणाऱ्या कामगारांना प्रोत्साहन देऊ लागले.

सारेच दृश्य खळबळजनक होते आणि त्याचा जनक मॅक्स एका

कोपऱ्यात उभा राहून ते बघत होता. त्याने पाहिले तर कार्यशाळेची इमारत वाचत नाही अशी खात्री झाल्यामुळे शुल्झसाहेब मोठ्याने गर्जना करताहेत : "या इमारतीत एका काचेच्या केसमध्ये ३१७५ नंबरचं मॉडेल ठेवलेलं आहे ते जो कोणी वाचवील त्याला दहा हजार डॉलरचं बक्षीस!"

पण आगीचे लोळ अन् धुराचे लोट यांनी जीव घाबराघुबरा होत असताना कुणीही ते धाडस करायला तयार नव्हता.

आणि तरी...आला एक माणूस....अखेरीस पुढे आला.

"मी करतो ते काम, साहेब!"

"तू?" प्रो. शुल्झ उद्गारले. "तुला मृत्युदंड झालेला आहे. तू यशस्वी झालास तरी तुझी शिक्षा माफ होईल असं समजू नकोस."

"मला त्याची पर्वा नाही. तुमचं ते मौल्यवान मॉडेल वाचवणं एवढंच मी समजू शकतो."

"छान. मग हो पुढे! एवढी कामगिरी तू केलीस तर दहा हजार डॉलर तुझ्या वारसदारांना मिळतील अशी खात्री बाळग."

"ती खात्री मला आहेच, साहेब."

वायुसंरक्षक पोशाख, मुखवटादी साधने त्वरेने तिथे हजर झाली. मॅक्सने पोशाख चढवला अन् आगीत उडी घेतली.

'माझ्या हवापेटीतली 'कॉम्प्रेस' केलेली हवा पंधरा मिनिटं टिकेल. देव करो अन् तेवढ्या वेळात माझं काम फत्ते होवो!' तो स्वत:शी म्हणत होता.

तोफ वाचवणे हे अर्थातच त्याचे उद्दिष्ट नव्हते. तो फक्त पळ काढणार होता!

तो अग्निज्वाळात शिरला त्यावेळी चहू बाजूंनी त्याच्यावर आगीच्या ठिणग्यांचा मारा होत होता. मधूनच एखादा जळका वासा कडाडदिशी

मोडून खाली पडत होता. पण सुदैवाने मॅक्सला आगीच्या झळा लागल्या नाहीत. अलीकडच्या दारातून आत शिरलेला मॅक्स पलीकडच्या दारातून बेधडक बाहेर पडला. त्याच वेळी मागे जो आवाज झाला त्यावरून त्याने ओळखले की वर्कशॉपचं छप्पर कोसळलं!

तो थांबला नाही. त्या तळ्याच्या दिशेने धावत सुटला. तिथे काठावर पोचताच त्याने पाण्यात बुडी मारली. धबधब्याबरोबर वाहत जाऊन आपण भुयारात केव्हा पोचलो ते त्याला कळलेही नाही. भुयार संपूर्ण पाण्याने भरलेले होते. मॅक्सच्या पाठीवर हवेची पेटी असल्यामुळेच तो श्वास घेऊ शकत होता. भुयार किती लांबीचे असेल याची त्याला कल्पना नव्हती. त्याने पत्करलेले धाडस म्हणजे मृत्यूला निमंत्रण होते. पण त्याला त्याची पर्वा नव्हती.



प्रवाहाने त्याला झपाट्याने खूप दूर नेले आणि मग त्याची वाट एकाएकी बंद झाली. म्हणजे पाणी पुढे जातच होते; पण हा मात्र अडकला होता. लोखंडी जाळीचा अडसर त्याला आडवा आला होता.

'मला वाटलंच होतं' तो पुटपुटला आणि त्याने खिशातून आणलेली हॅकसॉ करवत काढली.

करवतीने जाळी कापताना तो पाण्यातल्या पाण्यात घामाने भिजला. पाच मिनिटे झाली तरी जाळी पूर्ण कापली गेली नाही तेव्हा क्षणभर त्याला भीतीने अन् निराशेने ग्रासले.

''हवा संपतच आली आहे. आता मी काय करू,'' तो आपल्याशी म्हणाला. ''देवा....देवा..''

अखेरचा प्रयत्न म्हणून दोन्ही हातांनी जाळी धरून त्याने ती जोरात ओढली आणि काय सांगावा चमत्कार? ढिली झालेली ती जाळी उचकटून त्याच्या हातात आली.

हवा संपत आली होती. त्यामुळे एव्हाना जवळ जवळ घुसमटलेला मॅक्स प्रवाहाबरोबर कसाबसा पुढे निघाला. पुढे पुढे पुढे....स्वातंत्र्याच्या हवेकडे.

दुसऱ्या दिवशी जळालेल्या वर्कशॉपची संपूर्ण राख उपसून झाली, पण मॅक्सच्या प्रेताचा पत्ता लागला नाही.

'बिचाऱ्याचं हाडन्हाड जळून त्याची राख झालेली दिसते!' प्रो. शुल्झ स्वत:शी म्हणाले. 'त्याचं वाईट झालं. पण माझे दहा हजार डॉलर वाचले!'

●

१५. खतरनाक खबर!

ती सप्टेंबरची १३ तारीख होती.

संध्याकाळचे सात वाजले होते. फ्रँकव्हिल शहर नष्ट करण्याचा प्रो. शुल्झ यांनी योजलेला क्षण जवळ येत होता आणि तरी त्या आदर्शनगरीत या आगामी संकटाची कोणालाही कल्पना नव्हती.

कास्केड पर्वताच्या पायथ्याशी पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावर हे सुंदर शहर वसलेले होते. हिरव्यागार वनश्रीने नटलेल्या फळाफुलांनी समृद्ध अशा या नगरातले रस्ते आखीव रेखीव अन् स्वच्छ होते. दोन्ही बाजूची घरे पांढऱ्या शुभ्र भिंतींची नि लाल कौलांची होती. मात्र त्यांच्यांत 'तोच-तोच पणा' नव्हता. प्रत्येक घराची रचना वेगळी नि वैशिष्ट्यपूर्ण होती; घराघराला व्यक्तिमत्त्व होते. आणि तरी या विविधतेमुळे नगररचनेच्या एकूण सौंदर्याला मुळीच बाध येत नव्हता. उलट त्याच्या शोभेत भरच पडली होती. या शहराला वादळी वारे माहीत नव्हते. कास्केड पर्वत त्याच्या पाठीशी उभा होता. उलट त्याच्या घळीघळींतून मंद आल्हाददायक वायुलहरी नेहमी झुळझुळत असत. आरोग्य हा फ्रँकव्हिल शहराने नित्य जपलेला मंत्र असून त्याचे चित्र प्रत्येक नागरिकाच्या प्रफुल्ल हसतमुख चेहऱ्यावर उमटलेले दिसे. निसर्गाच्या कुशीत मानवाच्या कर्तृत्वाने जन्मलेल्या या शहराने गेल्या पाच वर्षांत आपले पर्यावरण आस्थेने जपले होते. इथल्या लोकांना हवेचे किंवा पाण्याचे प्रदूषण माहीत नव्हते. स्वच्छतेबद्दलचे नियम अत्यंत कडक होते. कचऱ्याची नि सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी गावाबाहेर दूर अंतरावर चर खोदलेले असत. त्यातून पुढे आसपासच्या शेतांना उत्कृष्ट खताचा पुरवठा होत असे. फ्रँकव्हिलचा कल्पक निर्माता डॉ. सॅरासिन गेल्या पाच वर्षांत इथून

कधी हलला नव्हता. आपापल्या कलेत निपुण असे कितीतरी वास्तुशास्त्रज्ञ, शिल्पकार नि वैद्यविद्येतले जाणकार त्याने आपल्या भोवती गोळा केले होते. हर एक तज्ज्ञ अन् कलाकार आपले बुद्धिकौशल्य इथे पणाला लावीत होता आणि तरीं त्या मागचे सूत्रचालन डॉ. सॅरासिनचे होते आणि त्याला सर्वजण मान देत असत. इतके असूनही तो हुकुमशहा नव्हता. आपल्या नम्र नि प्रेमळ वर्तनाने तो सर्वांना सांभाळून घेत असे. त्याचे निवासस्थान म्हणजे शहराच्या मध्यवस्तीत बांधलेला एखादा राजवाडा नव्हता. समुद्रकाठच्या एका सुंदर पण आटोपशीर बंगल्यात तो राहत असे. किनाऱ्यावर नौकानयनासाठी बांधलेले पक्क्या संगमरवरी पाषाणाचे अनेक बंदरधक्के होते.

डॉ. सॅरासिन आपली पत्नी अन् मुलगी जीनेट यांच्यासह इथे राहायचा. त्याचा उल्लू पुत्र ऑक्टोव्हियस मात्र इथे कधी आलाच नाही. तो पॅरिसच्या विलासनगरीतच राहिला.

त्याचा मार्गदर्शक मित्र मॅक्स अचानक निघून गेल्यापासून त्याचे अभ्यासावरचे लक्षही उडाले. बापाने दिलेले पैसे तो चैनीत उधळायचा. 'असतील शिते तर जमतील भुते' या न्यायाने त्याच्याभोवती खुशालचेंडू मित्र गोळा झाले होते. नाचगाणी, नाटके, मद्यपान यात तो दिवस घालवीत होता. दोन वर्षे अशा रीतीने चैनबाजीत घालवून सर्व पैसा संपला, तेव्हा त्याला आईबापांची आठवण झाली. तो लगेच फ्रँकव्हिलला त्यांच्या घरी येऊन दाखल झाला आणि त्यामुळेच त्याचा पुरा सत्यानाश होण्याचा टळला.

आजच्या त्या प्रलयकारी क्षणी तो फ्रँकव्हिलमध्येच होता.

जीनेट आता एकोणीस वर्षांची झाली. वडिलांची सच्छील ध्येयवादी वृत्ती तिच्यात उतरलेली होती. आता या नव्या देशात राहायला आल्यापासून

तिने अमेरिकनांचे कुतूहल निं साहस हे गुणही उचलले होते.

डॉ. सॅरासिन यांनी या संध्याकाळी आपल्या दोघा खास मित्रांना जेवायला बोलावले होते. त्यांपैकी एक होते कर्नल हेडन - यादवी युद्धात पराक्रम गाजवणारे वीर. यांनी आपला एक हात नि एक कान पिट्सबर्गच्या लढाईत रणक्षेत्राला अर्पण केला होता; आणि तरी आजही ते बुद्धिबळात कुणाला हार जात नसत. दुसरे गृहस्थ होते मॉसिय लेन्झ. या नव्या नगरीचे शिक्षणसंचालक.

लेन्झसाहेब डॉक्टरांच्या विचारांशी मिळतेजुळते घेणारे होते. मुलांचा शिक्षणक्रम त्यांनी त्याच दृष्टीने आखलेला होता. बालमानसशास्त्राला त्यात महत्त्वाचे स्थान होते. इथल्या शाळांतून मुलांच्या स्वतंत्र प्रेरणांना उत्तेजन मिळे, त्यांच्या आवडीच्या विषयात त्यांना प्रोत्साहन दिले जाई. कोणताही विषय मुलांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर लादला जात नसे. आणि विशेष हे की मुलांनी मनाप्रमाणे शरीरही स्वच्छ नि बलवान ठेवले पाहिजे यावर भर दिला जाई.

फ्रँकव्हिलची आता जगातल्या, भौतिक त्याचप्रमाणे बौद्धिक वैभवाचे शिखर गाठणाऱ्या शहरांमध्ये गणना होत होती. जगाच्या कोनाकोपऱ्यांतून नामवंत चित्रकार, गायक नि यंत्रकार या शहराकडे ओढले गेले होते. इतर विषयांबरोबरच तरुणांना स्वसंरक्षणाच्या दृष्टीने लष्करी शिक्षणही दिले जात होते आणि तरी सीमेलगतच्या सर्व राज्यांशी फ्रँकव्हिलचे संबंध सलोख्याचे होते.

त्या काळच्या रिवाजाप्रमाणे डॉ. सॅरासिन व त्यांचे दोघे मित्र धूम्रपान करीत टेबलापाशी बसले होते; स्त्रिया आत गेल्या होत्या. राजकीय विषयावर संवाद चालू असतानाच एक नोकर आत आला आणि त्याने नुकतेच आलेले वर्तमानपत्र साहेबांच्या टेबलावर ठेवले. डॉ. सॅरासिननी

ते उचलले. तो 'न्यूयॉर्क हेरॉल्ड' चा अंक होता.

फ्रँकव्हिल इथे चाललेल्या लोकविलक्षण उद्योगाचे कौतुक आतापर्यंत अनेक युरोपीय वृत्तपत्रांनी केले होते. त्यामुळे तेवढ्या मजकुराकडे त्यांनी दुर्लक्ष केले. पण पुढला परिच्छेद वाचताना त्यांचे डोळे विस्फारले गेले आणि वर्तमानपत्र धरणारी त्यांची बोटे आश्चर्याने व संतापाने थरथरू लागली.

> "**न्यूयॉर्क : सप्टेंबर ८ :** मानवी हक्कांवर गदा आणणारा एक हिंसक प्रयोग लवकरच केला जाण्याची शक्यता आहे. आम्हाला एका विश्वासार्ह वाटणाऱ्या व्यक्तीकडून असे कळले आहे की फ्रँकव्हिल या आदर्शनगरीचा विध्वंस करण्याचे भयंकर कारस्थान स्टालस्टाट या प्रख्यात पोलादी शहरात रचले जात आहे. या बाबतीत अमेरिकन सरकारने कोणती भूमिका घ्यावी हे आम्ही सांगू शकत नाही. पण फ्रँकव्हिलचा कारभार पाहणाऱ्या समितीने याची अवश्य नोंद घ्यावी आणि संरक्षणाच्या दृष्टीने करण्याचे सर्व उपाय तात्काळ हाती घ्यावेत एवढे आम्ही सुचवतो."

●

१६. आणीबाणीची वेळ

पोलादपती शुल्झला डॉ. सॅरासिनच्या कार्याबद्दल द्वेष वाटत असे ही गोष्ट जगजाहीर होती. पण कोणतेही कारण नसताना एका शांत निरपराध शहरावर हल्ला करून एकाच माऱ्यात ते बेचिराख करण्याचे निर्घृण बेत तो रचत असेल हे कोणाला खरेही वाटले नसते आणि तरी 'न्यूयॉर्क हेरॉल्ड' सारखे प्रतिष्ठित वृत्तपत्र उगाच काहीतरी वावड्या उडवील हेही शक्य नव्हते. त्यामुळे ती बातमी वाचल्यावर डॉ. सॅरासिन यांच्या मनाला फार मोठा धक्का बसला. आपला भावनावेग आवरून डॉक्टरसाहेब खंबीरपणे म्हणाले, "काही तरी केलं पाहिजे. कौन्सिलची बैठक बोलवा! काय वाट्टेल ते झालं तरी हा संघर्ष टाळला पाहिजे!"

"ते शक्य नाही!" लेन्झ म्हणाले, "तो माणूस द्वेषबुद्धीने पेटलेला आहे. तो आपलं म्हणणं खरं केल्याखेरीज राहणार नाही."

"आणि हल्ल्याला तोंड द्यायचं म्हटलं तर ते अजिबात शक्य नाही," कर्नल हेडन म्हणाले. "त्याच्या तोडीस तोड अशी शस्त्रं आपण केव्हा अन् कशी निर्माण करणार?"

"पण काही झालं तरी आपण त्याला शरण जाणार नाही!" आता ऑटोही निर्धारपूर्वक ओरडला.

डॉ. सॅरासिन उठले अन् त्यांनी त्वरेने चार पावले टाकली. खोलीच्या कडेला भिंतीत छोट्या खोबणींची एक रांग होती. प्रत्येक खोबणीत एक कर्णा होता.

"या नव्या शोधाबद्दल बेलचे आभार मानले पाहिजेत," ते म्हणाले. त्यांनी एकेक कर्णा उचलला अन् टेलिफोनद्वारा नगरसमितीच्या प्रत्येक सभासदाशी संपर्क साधला. अर्ध्या तासाच्या आत फ्रँकव्हिलचे ते निवडक

प्रतिष्ठित नागरिक 'टाऊन हॉल' मध्ये गोळा झाले. हा हॉल म्हणजे एक प्रचंड घुमटाकार इमारत होती. तिचे छत काचेचे होते अन् तिचा अंतर्भाग गॅस बत्त्यांनी सुप्रकाशित केलेला होता.

डॉ. सॅरासिन व्यासपीठावर चढले. शहरावर कोणते संकट गुदरते आहे याची त्यांनी सदस्यांना थोडक्यात माहिती दिली आणि ते म्हणाले, "अशा आणीबाणीच्या क्षणी काय करायला हवं ते तुम्हीच ठरवा. तुम्ही सर्वजण ध्येयनिष्ठेने प्रेरित झालेले लोक आहात. एक नमुनेदार शहर तुम्ही निढळाच्या घामाने उभं केलं आहे. ते तुम्ही सुखासुखी नष्ट होऊ द्याल का ?"

"मुळीच नाही!" श्रोत्यांकडून एकसाथ उत्तर आले.

"आम्ही लढू....अखेरच्या क्षणापर्यंत लढू!"

"आम्ही आमचे प्राण देऊ; पण शहर वाचवण्यासाठी धडपडत राहू."

"आता येता सबंध आठवडा संरक्षणाचा सप्ताह, अहोरात्र धडपडीचा!"

ताबडतोब एक युद्ध - मंडळ नेमण्यात आले आणि ही 'धडपड' कशा प्रकारे करावी याचे गुप्तपणे बेत आखण्याचा प्रस्ताव मंजूर झाला. दरम्यान सर्व नागरिकांना संकटाची कल्पना देऊन सावधानतेच्या सूचना देण्यात आल्या.

या संबंधात तपशीलवार चर्चा चालू असतानाच एक अनपेक्षित घटना घडली. रात्री साडेदहाचा सुमार होता. 'टाऊन हॉल' च्या दारात एक विचित्र व्यक्ती येऊन उभी राहिली. तिचा अवतार मोठा और होता. कपडे फाटके, धुळीने माखलेले; कपाळाला झालेल्या जखमेतून रक्त वाहते आहे. गालांवरून घाम ओघळतो आहे; पण डोळे विलक्षण तेजस्वी. चर्या गंभीर, कठोर पण काहीतरी खळबळजनक वृत्त सांगायला

उत्सुक असे थरथरणारे ओठ. त्याला पाहताच सभेचे काम एकदम थबकले. जो तो त्याच्याकडे आश्चर्याने अवाक् होऊन बघू लागला. कोण असेल हा ? कुठून आला ? काय सांगायचंय याला ?

पण त्याला प्रश्न विचारण्याचे धाडस खुद्द डॉक्टरसाहेबांनाही झाले नाही. क्षणभराने तो आपण होऊन बोलू लागला.

"मी नुकताच स्टालस्टाटच्या कैदेतून सुटून आलो आहे. त्या सैतान शुल्झने मला मरणाची शिक्षा सुनावली होती; पण परमेश्वराची खैर म्हणून मी वाचलो. इथे येऊन पोचलो, तुम्हाला वाटतो तसा मी कुणी अनोळखी इसम नाही... डॉक्टरकाका, तुम्ही मला ओळखलं नाही का ? मी तुमचा मॅक्स ब्रुकमान !"

"मॅक्स !...तू..."विस्मयचकित झालेले डॉ. सॅरासिन अन् ऑटो एकमुखाने उद्गारले.

होय तो मॅक्सच होता. अशा भीषण परिस्थितीत जिवंत राहून तरी इथवर पोचला हा एक चमत्कारच होता....,त्या पाणभुयारातून श्वास कोंडलेल्या स्थितीत गटांगळ्या खात त्याने लोखंडी जाळी कशी फोडली अन् तो पुढे प्रवाहाबरोबर कसा वाहत गेला हे आपण पाहिले आहे. तो लोंढा इतका जोरदार होता की आणखी दोनच मिनिटांनी त्याचे मुटकुळे भुयाराबाहेर पडून स्टालस्टाटच्या हद्दीबाहेर घरंगळत गेले अन् त्या छोट्या नदीच्या काठावर जाऊन पडले. त्यावेळी त्याची अवस्था अत्यंत वाईट झालेली होती. तो अर्धमेलाच झाला होता.

तो जिथे जाऊन पडला, ते ठिकाण निर्जन होते आणि रात्र अंधारी होती. त्यामुळे कोणीही त्याच्या मदतीला आले नाही. कितीतरी तास तो काळोखात हालचाल न करता पडून राहिला. तो शुद्धीवर आला तेव्हा चांगले उजाडले होते. आपण त्या प्राणसंकटातून बचावलो आहे

हे लक्षात येताच त्याने आधी ईश्वराचे आभार मानले. दुसऱ्याच क्षणी त्याला आपल्या प्रियजनांची आठवण झाली.

"मला त्यांना वाचवलंच पाहिजे!" तो उद्‌गारला.

मोठ्या कष्टाने तो आपल्या पायांवर उभा राहिला. फ्रँकव्हिल तिथून तीस मैल दूर होते. आणि ते सारे अंतर त्याला पायी तोडायचे होते. कारण या भागात रेल्वे नव्हती. गाडी - घोडाही मिळण्यासारखा नव्हता. 'स्टालस्टाट'चा भीतिदायक परिसर. कुणीही या भागात जायला धजत नसे. पण मॅक्सला एक क्षणही विश्रांती घेणे शक्य नव्हते. तो तसाच धडपडत चालायला लागला.

फ्रँकव्हिलमध्ये तो पोचला तेव्हा सव्वादहा वाजले होते. शहरात जिकडे तिकडे भित्तिपत्रके लागली होती. प्रत्येकजण त्या आणीबाणीच्या क्षणी काही ना काही करण्यात गुंतला होता आणि तरी वातावरण भीतीचे नव्हते. आपल्या शिकवणुकीला अनुसरून जो तो शांतपणे वागत होता.

'म्हणजे यांना माहीत झालंय तर' मॅक्स पुटपुटला. 'पण तो क्षण अगदी जवळ आला आहे याची त्यांना कल्पना नसणार! आत्ता साडेदहा वाजलेत; आणि मुहूर्त ठरलाय पावणेबाराचा!'

पोटात अन्नाचा लवलेश नव्हता. तरी तसेच कडमडत जाऊन त्याने टाऊन हॉल गाठला. तिथे जमलेल्यांना त्याने आश्चर्याचा धक्का दिला.

●

१७. संकट टळले

स्टालस्टाटच्या कैदेतून शिताफीने निसटलेला मॅक्स फ्रँकव्हिलमध्ये दाखल होताच तिथल्या युद्धप्रयत्नात सामील झाला.

घाईघाईने व्यासपीठावर चढून तो ओरडला, "मित्रहो ! आठ दिवसांच्या कसल्या गोष्टी करताहात ? घटका भरत आली आहे. आणखी तासाभरातच तुमच्या या लाडक्या शहरावर तप्त लोखंड नि अग्नी यांचा वर्षाव व्हायला लागेल. त्या सैतानाने निर्माण केलेली तीस मैल दूरीवर अग्निगोल फेकणारी राक्षसी तोफ आपल्या दिशेने तोंड वासून उभी आहे. प्रतिकार शक्य नाही. बायकामुलांना ताबडतोब तळघरात धाडा! पुरुषांना जे जे मिळेल ते साधन घेऊन अग्निवर्षावाला तोंड देण्यासाठी सज्ज करा! अर्थात या प्रयत्नांचा काही उपयोग होईल असं नाहीच." -

"खर्चासाठी आम्ही दहा लाख डॉलर मंजूर केले आहेत," एक सभासद म्हणाला.

"त्याचा काही उपयोग नाही !" मॅक्स म्हणाला, "पण माणूस सुखासुखी मरत नाही. धडपड करीत राहतो! एक लक्षात ठेवा– आगीचे डोंब एकूण शंभर ठिकाणी उसळणार आहेत." -

हे भाषण मॅक्सने युरोपात केले असते तर लोकांनी त्याला वेड्यात काढले असते. पण अमेरिका हा नवविचारांनी भारलेला नवा देश. इथे विज्ञान सदैव फुलत होते. अशक्य वाटणाऱ्या अद्भुत गोष्टी विज्ञान हस्तगत करू शकते याची लोकांना कल्पना होती.

डॉ. सॅरासिन आपल्या मानसपुत्राने दिलेला सल्ला लक्षपूर्वक ऐकत होते. नागरिकांनी कसे वागायचे याबद्दलच्या सूचना तातडीचे संदेश पाठवून देण्यात आल्या. हुकमांची अंमलबजावणी ताबडतोब सुरू झाली.

ज्यांना तळघरात जाणे आवश्यक होते त्यांना लगेच तिकडे पाठवण्यात आले. काही मंडळी शहर सोडून बाहेर गेली; त्यांनी डोंगरदऱ्यांत आसरा घेतला. गाड्या, घोडे जे मिळेल ते वाहन घेऊन माणसे शहराबाहेर जाऊ लागली. उरलेले तगडे तरुण चौकाचौकांत जमा झाले. आग विझवण्याची मिळतील ती साधने, तसेच पाण्याच्या बादल्या, मातीचे नि रेतीचे ढीग यांचा, एरवी शांत नि साफसूफ असलेल्या त्या चौकात एकच पसारा दिसू लागला.

इकडे टाऊनहॉलमध्ये गुप्त खलबते चालूच होती. मॅक्सच्या मनात मात्र क्रांतिकारी विचार घोळत होते. तो स्वत:शी म्हणत होता, 'पावणेबाराला हा राक्षस आमची नगरी जमीनदोस्त करणार?...खरोखरी हे शक्य आहे का?' त्याने पटकन खिशात हात घालून एक नोटबुक काढले. हात वर करून त्याने लोकांना गप्प राहण्याचा इशारा दिला; आणि मग पेन्सिलीने वहीत काही आकडेमोड केली. त्याने पुन्हा मान वर केली तेव्हा त्याचा चेहरा उत्तेजित दिसत होता.

"मंडळी!" तो एकदम म्हणाला, "एक तर मी मांडलेल्या गणितात काही चूक झाली असेल. नाही तर –"

"नाही तर काय?"

"नाही तर आपल्याला भिण्याचं अजिबात कारण नाही. प्रॉब्लेम सुटला आहे. क्षेपणास्त्रातली एक समस्या मला उलगडत नव्हती; ती आता या क्षणाला सुटली. शुल्झने चूक केली आहे! त्या सैतानी संशोधकाचं स्वप्न धुळीला मिळणार आहे. तोफेतून धाडलेला तो कुलपी गोळा फ्रँकव्हिलवर येईल, पण इथे आदळणार नाही - पुढे निघून जाईल!"

"काय सांगता?"

"पुढे? म्हणजे कुठे?"

"अंतराळात! ठिणगी विझावी तसे ते अस्त्र विझेल! फ्रँकव्हिलला धोका नाही."

डॉ. सॅरासिन विचारात गढले होते. त्यांनी आता मान वर केली अन् भिंतीवरच्या घड्याळाकडे पाहिले.

"मंडळी, बाहेर चला!" मॅक्स म्हणाला. सर्वजण त्याच्या मागोमाग बाहेर पडले. चौकात त्यांची गर्दी जमली. प्रत्येकाचा श्वास रोखलेला होता. प्रत्येकाची दृष्टी आकाशाकडे लागली होती.



ठण्ण! पावणेबाराचा नियोजित टोला पडला. आकाशात खूप उंचीवर एक काळा ठिपका दिसला. स्स.....स्स.....असा क्षीण आवाज करीत तो हां हां म्हणता सर्वांच्या डोक्यावरून निघून गेला. हा विजेचा वेग म्हणायचा की विचाराचा वेग? पण तो काळा ठिपका केव्हा शहराच्या हद्दीबाहेर जाऊन दिसेनासा झाला ते कळलेही नाही. मॅक्सला हास्याची उकळी फुटली.

"टा....टा...! बाय...बाय!" तो उद्गारला. "तुझा प्रवास सुखाचा होवो! ...मंडळी! शुल्झचं हे पिल्लू जर याच वेगाने जात राहिलं तर ते पृथ्वीवर पडणार नाही!"

यानंतर दोन मिनिटांनी मेघगर्जना व्हावी तसा आवाज झाला.

बुलटॉवरवरच्या तोफेचा तो आवाज होता. मिनिटाला साडेचारशे मैल वेगाने उडणाऱ्या त्या अस्त्राने आपले घर सोडल्याला ११३ सेकंद झाले, तेव्हा तो आवाज कानांवर पडला.

फ्रँकव्हिल सुखरूप होते.

●

१८. बचेंगे तो और लढेंगे

“मुक्काम पोस्ट फ्रँकव्हिल....तारीख १४ सप्टेंबर.

“प्रोफेसरमहाशय, हा पत्राचा मायना नीट लक्षपूर्वक वाचलात? आता हे पत्रही तसेच नीट वाचा. मी जिवंतपणी हे लिहीत आहे.

“माझे खरे नाव श्वाझे नाही. मी स्विस नाही. फ्रेंच आहे. आल्सेस ही माझी जन्मभूमी. कर्मभूमी मात्र अमेरिका. माझे नाव मॅक्स ब्रुकमान.

“तुम्ही तुमचे गुपित फोडलेत; तसे मीही माझे गुपित आता फोडतो. पण....घाबरू नका. त्याचा मोबदला म्हणून मी तुमचा जीव घेणार नाही!...

“माझ्या देशाशी तुम्ही अकारण शत्रुत्व केलेत आणि फ्रँकव्हिल नगरी नष्ट करायला निघालात, पण तुमचा क्रूर बेत तडीला गेलेला नाही. आमचे सुंदर शहर होते तसे उभे आहे. तुमचा तो लाडका तोफगोळा मात्र आमच्या डोक्यावरून गेलेला आम्ही पाहिला. रात्री ठीक ११ वाजून ४५ मिनिटे व ११ सेकंद या वेळी. ही सुवार्ता ऐकल्यावर वस्तुतः हर्षवायू होऊन तुमचे पोट फुटायला हवे; पण ते बिघडलेले पोट आहे. खदखदेल - पण फुटणार नाही.

“पण तो गोळा कुठे गेला म्हणता? माझ्याही ते फार उशिरा लक्षात आले. तो पश्चिमेकडे गेला. अंतराळात भ्रमण करायला! तो तसाच चकरा खात राहील जगाच्या अंतापर्यंत. प्रारंभीच ज्या क्षेपणास्त्राचा वेग सेकंदाला १० हजार यार्ड

आहे ते पृथ्वीवर पडणे शक्य नाही. त्याची गती आणि पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण यांचे गणित जमून तो पृथ्वीभोवती मरेपर्यंत गिरक्या खात राहील!

"बुलटॉवरची तुमची ती तोफ मात्र एव्हाना नष्ट झाली असेल अशी मी आशा बाळगतो. काही असले तरी त्या तोफेवर तुम्ही खर्च केलेले वीस लाख डॉलर फुकट गेलेले नाहीत. तुम्ही पृथ्वीला एक नवा उपग्रह मिळवून दिला आहे!

"कळावे, तुमचा मॅक्स ब्रुकमान."

हे पत्र घेऊन एक जासूद तातडीने स्टालस्टाटला रवाना झाला.

हे पत्र वाचून क्रोधाने पेटलेला प्रा. शुल्झ आपल्या अभ्यासिकेत गेला आणि पुन्हा कामाला लागला. 'जमीन अस्मान पालथे घालीन, पण फ्रँकव्हिल नष्ट करीन' अशी त्याने नव्याने प्रतिज्ञा केली होती. आणि त्याच्या या बेडर स्वभावाची मॅक्सला कल्पना होती. तोही ओळखून होता की आपल्यावरचं संकट टळलेलं नाही. राक्षस कधी स्वस्थ बसत नसतो.

त्याच्या शस्त्रास्त्रांच्या कोठारात आणखी काय काय भरलेले आहे याची संपूर्ण माहिती मॅक्सला होती.

"आणखी कितीतरी तोफा नि कुलपी गोळे त्याच्या भांडारात आहेत" मॅक्स म्हणाला. "पण ते सर्व भयंकर असले तरी आपल्या ओळखीची पारंपरिक अस्त्रं आहेत ती. त्यांच्याविरुद्ध आपण संरक्षणाचे उपाय योजू. अहोरात्र श्रम करू. अखेर मरू, पण शरण जाणार नाही!"

आणि त्या क्षणापासून फ्रँकव्हिल नगराचा नूरच पालटला. ते शांतताप्रिय शहर युद्धसज्ज होऊ लागले. प्रतिकाराची ताकद असलेला प्रत्येक नागरिक

सैन्यात दाखल झाला. खाणीतून निघालेल्या कोळशाचा नि लोखंडाचा उपयोग आता एकाच कामाकडे होऊ लागला. संरक्षणकार्य! लोकरीच्या कपड्यांचे, चिलखतांचे नि शस्त्रास्त्रांचे उत्पादन! फ्रँकव्हिलच्या शस्त्रागारात नि दारूच्या कोठारात लष्करी साहित्याची नित्य भर पडत गेली आणि त्याचबरोबर शहरातील धान्यकोठारही काठोकाठ भरले गेले. कारण कारखान्यातल्या मजुरांप्रमाणे शेतकरीही दुप्पट मेहनत करून धान्य पिकवीत होते.

संरक्षणाच्या योजना अविश्रांतपणे चालू होत्या. शहराभोवती खोल खंदक खोदले गेले. त्यामागे भरपूर उंचीचे तट उभे राहिले. वाळूने अन् मातीने भरलेल्या पोत्यांचे ढीग चौकाचौकांतून रचले गेले.

सर्व लष्करी तयारीवर कर्नल हेडन देखरेख करीत होते. मॅक्स तर आता सर्वांचा लाडका नेता बनला होता. आणि ऑटो? तो देखील मेहनतीत मागे नव्हता. तो स्वभावाने पार बदलला होता. आपल्या गणवेषावर खास अधिकाराची भपकेबाज बिरुदे मिरवावीत अशी पोरकट सुरसुरी त्याला अजूनही मधूनमधून येई; पण तो ती प्रयत्नपूर्वक बाजूला सारी. एक सामान्य सैनिक म्हणून कर्नल हेडनच्या प्रत्येक आज्ञेचे तो बिनतक्रार पालन करी. मॅक्स तर त्याचा आता गुरूच बनला होता.

मॅक्सला क्षणाची फुरसत नव्हती आणि तरी त्याचे नि सॅरासिन कुटुंबियांचे एकत्र भोजन पुष्कळदा होत असे. डॉक्टरसाहेब त्याच्यावर बेहद्द खूष होते. आणि त्याची नि जीनेटची मैत्री त्या कठीण प्रसंगातूनही वाढीला लागलेली पाहून मादाम सॅरासिन अलीकडे निराळीच स्वप्ने पाहत होत्या - जावई मिळावा तर असा!

मॅक्स नि जीनेट यांच्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात होत होते यात शंका नाही; पण नागरी संरक्षणाच्या कामात दोघेही इतकी बुडून गेली होती

की दुसरा तिसरा विचार त्यांच्या मनाला शिवणेही शक्य नव्हते.

"आज या कामगारांनी एका दिवसात शंभर यार्ड खंदकाचं खोदकाम पुरं केलं! मॅक्स, शर्थ केलीत तुम्हा पुरुषांनी! आम्ही बायका आपल्या स्वेटर विणतो आहोत अन् मुलं सांभाळतो आहोत!"

"म्हणजे केवढ काम करताहात तुम्ही! अग जीनेट, ही सारी धडपड कुणासाठी चाललीय? केवळ आपल्या स्वत:साठी नाही - भावी पिढीसाठी! आणि तसं म्हणशील तर कारखान्यातूनसुद्धा थोड्या का बायका काम करताहेत?" असे त्यांचे संभाषण चाले.

मॅक्स म्हणाला ते खरे होते. संरक्षणाचे काम इतके जीव ओतून होत होते की त्यात स्त्री - पुरुष हा भेदच राहिला नव्हता. प्रत्येकजण आपल्या प्रिय नगरीच्या रक्षणासाठी जीव द्यायला तयार झाला होता.

ही सगळी धडपड चालू असताना घड्याळाचे काटे पुढे सरकत होते; कॅलेंडरची पाने फाडली जात होती. आश्चर्याची गोष्ट ही की महिन्यांमागून महिने गेले तरी स्टालस्टाटचा स्टीलसम्राट आपल्या पोलादी किल्ल्यात स्वस्थ बसला होता. त्याने कोणतीही हालचाल केली नव्हती!

●

१९. व्यापारी जगात खळबळ

अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरचे सॅनफ्रान्सिको बंदर म्हणजे नव्या जगाचे एक महान उद्यम केंद्र. तिथल्या स्टॉक एक्स्चेंज ऊर्फ शेअर बाजारात सावकार, दलाल आणि व्यापाऱ्यांचे प्रतिनिधी यांचा अखंड वावर चालू असतो. तिथला आरडाओरडा अक्षरश: कान किटवणारा असतो. त्या उत्तुंग नि देखण्या दगडी इमारतीत जगाच्या कोनाकोपऱ्यातून आलेले धनवेडे एकत्र जमतात. त्यात तमाम देशांतले तमाम धर्मांचे लोक - ख्रिस्ती, यहुदी, मुसलमान, हिंदू आणि हो, परस्परांना पाण्यात पाहणारे चिनी-जपानी सुद्धा खांद्याला खांदा घासताना दिसतात. काळे - गोरे, युरोपीय - आशियाई आणि अर्थात अमेरिकन असे सर्व मानवी नमुने तिथे बघायला मिळतात. विविध भाषांतून चालणाऱ्या त्यांच्या आवेशपूर्ण घोषणा म्हणजे जणू पक्ष्यांचा कलकलाट असतो. मासळी बाजारातला गोंगाट त्यापुढे काहीच नाही!

अशा या आवाजी दुनियेत ऑक्टोबरच्या १२ तारखेला एक खळबळजनक प्रकार घडला. सकाळी ठीक अकरा वाजता नेहमीप्रमाणे निरनिराळ्या व्यापारी कंपन्यांचे दलाल हजर झाले. आल्याबरोबर प्रत्येकजण आपल्या पत्रपेटीकडे धावला; आपापले टपाल गोळा करून टेबलाशी जाऊन बसला. लंबेचवडे जाडजूड लखोटे फाडले गेले. आतल्या मजकुरावरून घाईघाईने नजरा फिरल्या. नंतर सर्वजण त्या दिवशीचा 'बाजार' केव्हा खुलतो म्हणून उत्कंठेने वाट पाहू लागले. योग्य वेळी बाजारभावांच्या घोषणा झाल्या. लगेच टिपणे घेण्याची अहमहमिका सुरू झाली. देशोदेशींच्या तारा आल्या. मिनिटामिनिटाला विद्युत्संदेशाचे निळे कागद येऊन भिंतीवर चिकटत होते आणि एक अधिकारी कर्कश

सुरात ते वाचून दाखवीत होता. ते नीट ऐकू यावेत म्हणून दुसऱ्याला मागे ढकलून पुढे सरकण्याची दलाल मंडळीत स्पर्धा सुरू होती. गोंगाट सारखा वाढतच होता. वह्यांवर लेखण्या चरचरत होत्या; कागद टरकावले जात होते. फरसबंद भूमीवर कागदी कपट्यांचा कचरा साचत होता.

पण एक वाजण्याच्या सुमारास खळबळजनक प्रकार घडला. आपापले गट करून तावातावाने बोलत असलेली दलाल मंडळी काही क्षण स्तब्ध झाली. भूकंपाचा हादरा बसावा तशी एका विलक्षण बातमीची लाट त्यांच्या अंगावरून गेली होती. त्यामुळे प्रत्येकाची जणू वाचाच कुंठित झाली.

आणि मग प्रत्येकाला जणू एकाच क्षणी तोंड फुटले. आश्चर्योद्गाराची कारंजी उडू लागली.

"अशक्य ! अशक्य !"

"शक्यच नाही ! कुणाला खरं वाटेल हे ?"

"ही लबाडी आहे - बनवाबनवी ! अशी अफवा पसरून कुणीतरी स्वत:चा लग्गा साधणार असेल !"

"मला नाही वाटत तसं ? जिथे धुराचा लोट आहे तिथे विस्तव असणारच !"

"एखादा माणूस उच्चासनावरून इतका खाली घसरू शकतो ?"

"घसरतो काय ? कोसळतो ! अशी किती तरी उदाहरणं घडली आहेत....इतिहास वाचा म्हटलं !...लखपती कंपन्या पाहता पाहता बुडाल्या आहेत !"

हा संवाद चालू असतानाच एक जण तिथे ओरडत आला : "कोडं सुटलं ! मंडळी, आत्ताच आलेला तो संदेश ऐका !"

फलकावर नुकताच एक नवा नीलसंदेश लटकू लागला होता आणि

पुन्हा पुन्हा घोषणा होत होती : ‘‘न्यूयॉर्क, १२,४७ सेंट्रल बँक. विषय : स्टालस्टाटचे पोलाद कारखाने. हुंड्या स्वीकारणे बंद.’’ आणि याहून महत्त्वाचे शब्द संदेशाच्या शेवटी होते : ‘‘शुल्झ यांचा पत्ता नाही!’’

शुल्झसारखा अब्जाधीश बेपत्ता झाला?...ती बातमी ऐकून तमाम दलालांच्या तोंडचे पाणी पळाले.

आणि मग दोन वाजेपर्यंत धडाधड बातम्या येत होत्या :

न्यूयॉर्कच्या ‘मायनिंग बँके’ ने दिवाळे काढले.

शिकागोच्या ‘वेस्टर्ले अॅन्ड सन’ ला सत्तर लाख डॉलरचा फटका बसला.

बफेलो सिटीच्या ‘मिटवॉकीज’ ला पन्नास लाख डॉलरचा.

‘इंडस्ट्रिअल बँक ऑफ सॅनफ्रान्सिको’ ला पंधरा लाखांचा.

आणि दुसऱ्या सटरफटर कितीतरी कंपन्यांना त्यांच्या त्यांच्या मानाने नुकसाने सोसावी लागली होती.

याची प्रतिक्रिया थोड्याच वेळात दिसू लागली. पोलादाची किंमत सटासट वाढत होती. कोळशाचे भाव आकाशाला भिडत होते. लोखंडाचे जिन्नस बनवणाऱ्या कारखान्यांचे शेअर तेजीत होते.

आणि हो! फ्रँकव्हिलच्या जमिनीचे दरही वाढत होते. युद्धाच्या प्रारंभी शून्यापर्यंत उतरलेल्या किमती आता वाढत वाढत एकराला एकशेऐंशी डॉलरपर्यंत चढल्या होत्या.

संध्याकाळी वर्तमानपत्रांच्या ताज्या आवृत्तीवर लोक तुटून पडू लागले. पण ‘हेरॉल्ड’ किंवा ‘ट्रिब्यून’ सारखी पत्रेसुद्धा विशेष काही बातमी पुरवू शकली नाहीत. एवढेच वृत्त हाती आले होते की शुल्झ यांच्या वतीने सादर करण्यात आलेली ऐंशी लाख डॉलरची एक हुंडी न्यूयॉर्कच्या

त्यांच्या बँकेने परतवून लावली होती. कारण एवढी रक्कम शुल्झच्या खात्यावर नव्हतीच.

स्टालस्टाटची भक्कम पोलादी चौकट पत्त्याच्या बंगल्यासारखी कोसळली होती. कंपनीचे कामगार देशोधडीला लागले होते.

स्टालस्टाटच्या अध:पतनाची झळ अमेरिकेतल्या किंबहुना युरोपातल्या सर्वच मोठमोठ्या बँकांना नि कंपन्यांना जेव्हा पोचू लागली, तेव्हा सारे जग अमेरिकेच्या सरकारला दोष देऊ लागले. पण अमेरिकन सरकार तरी करणार काय? 'स्टालस्टाट' ही एक स्वतंत्र भूमी होती. तिच्यावर कोणत्याही बाह्य सरकारची सत्ता चालत नव्हती. सत्ता होती फक्त एका माणसाची - शुल्झ! परंतु या माणसाचा तर पत्ताच नव्हता!

●

२०. शुल्झच्या शोधात दोन तरुण

शुल्झ बेपत्ता झाल्याची बातमी जेव्हा फ्रँकव्हिल गावी पोचली, तेव्हा मॅक्सच्या तोंडून पहिले उद्‌गार निघाले ते असे - "हा त्या बदमाषाचा एखादा डाव तर नसेल ?"

शहराच्या बंदोबस्तात सध्या यत्किंचित ढिलाई करता कामा नये असे त्याने युद्धमंडळाला बजावले; आणि त्यामुळे संरक्षणाची तयारी जोरात सुरूच राहिली. पण त्याला स्वत:ला स्वस्थता नव्हती. शुल्झ गेला कुठे ? त्याचं झालं काय ? हा प्रश्न त्याच्या मनाला सतत सतावत होता. तो मेला असेल तर ठीकच आहे, पण तो जिवंत असेल तर...अखेरीस त्याने ठरवले की आपण पुन्हा एकदा स्टालस्टाटला भेट देऊन त्या उद्‌ध्वस्त शहराची पाहणी केली पाहिजे.

आपला विचार त्याने डॉक्टरसाहेबांजवळ बोलून दाखवला, तेव्हा ते व्यथित सुरात म्हणाले, "बेटा, पुन्हा पुन्हा तू आपला जीव धोक्यात घालतो आहेस; पण तुला अडवण्याचा मला तरी काय अधिकार आहे ? कितीही चांगली असली तरी माझीदेखील एक महत्त्वाकांक्षाच होती. तिच्या पायी हजारो लोकांवर मी एक प्राणसंकट ओढवून आणलं होतं. तू ज्या शंका बोलून दाखवल्यास त्यामुळे मलाही अलीकडे बेचैन वाटू लागलं आहे...तू जा. अवश्य जा. ईश्वर तुझं रक्षण करो !"

आणि मॅक्सच्या सान्निध्यात 'नवा माणूस' बनलेला ऑटोदेखील त्याच्याबरोबर जायला तयार झाला, तेव्हा त्याच्या आईवडिलांची मनें अगदी भरून आली. त्यांनी या दोघा शूर तरुणांना अश्रूपूर्ण नेत्रांनी निरोप दिला.

त्याच दिवशी एका घोडागाडीने मॅक्स नि ऑटो यांना स्टालस्टाटच्या

सीमेवर आणून सोडले आणि गाडी परत गेली.

दोघांनी बरोबर आवश्यक ते साहित्य नि शस्त्रे घेतली होती. 'रहस्यभेद करून मगच परत येऊ' असा दोघांनी मनोमन निर्धार केलेला होता. स्टालस्टाट म्हणजे एक भुईकोट किल्लाच होता. त्याच्यासभोवती जो उत्तुंग तट होता त्याच्या लगत खंदकाच्या काठावरून दोघे मित्र चालू लागले; तेव्हा या पोलादी शहराबद्दल मॅक्सला जी उरलीसुरली भीती वाटत होती तीही नष्ट झाली. आतून कारखान्याची ठकठक ऐकू येत नव्हती. धुराड्यातून धूर निघत नव्हता. तटावरून संत्री गस्त घालत नव्हते किंवा तटाच्या छिद्रातून संगिनी चकाकत नव्हत्या. प्रतिकार करणारा एकही मनुष्यप्राणी त्यांना भेटला नाही. वातावरण ध्वनिशून्य नि भकास होते; त्यांच्या पावलांचेच प्रतिध्वनी पुन्हा पुन्हा उठत होते.

ऑटो म्हणाला, "इतकी भयानक शांतता मी कधी अनुभवली नव्हती."

सात वाजण्याच्या सुमाराला दोघे मुख्य वेशीसमोर येऊन पोचले; पण दरवाज्यातून आत शिरणार कसे? खंदकावरचा पूल काढून तटालगत उभा केलेला होता. तो सहा यार्ड रुंदीचा धोकेबाज खंदक ओलांडायचा कसा?

मॅक्सने बरोबर एक मजबूत दोरखंड आणलेला होता. त्याचे एक टोक उंच उडवून पुलाच्या कठड्याला अडकवण्याचा त्याने प्रयत्न केला. त्याला जमले नाही तेव्हा ऑटोने दोर फेकून पाहिला. या खटाटोपात त्यांचा एक तास निघून गेला, तेव्हा कुठे दोराचे टोक पुलाच्या कठड्यात अडकले. त्यानंतर दोर चढून जाणे हे काम फारसे अवघड नव्हते. अगोदर ऑटो गेला. मॅक्सने बरोबर आणलेले सामान दोरावरून वर धाडले आणि मग तो स्वत: चढला.

तटावर तर ते पोचले; आता पलीकडे जाणे अगदी सोपे होते.

तोच दोर त्यांनी आतल्या बाजूस सोडला आणि त्याला धरून ते सरसर आत उतरले. आता त्यांना लागलेला मंडलाकार रस्ता मॅक्सच्या परिचयाचा होता; कारण त्याचा पहिल्या दिवशी आतल्या कार्यालयात प्रवेश झाला तो याच रस्त्यावरून; पण त्या वेळी इथे कोण गजबजाट होता! आणि आज....आज होती उदासवाणी स्मशानशांतता! त्यांच्या पुढ्यात कारखान्याच्या उंच इमारती उभ्या होत्या - काळ्याकुट्ट नि मुक्या. त्यांच्या खिडक्यांची काचेची तावदाने त्यांच्याकडे वटारून पाहात होती. ती त्यांना जणू दरडावत होती : 'कशाला आलात? चालते व्हा इथून!' त्यामुळे मॅक्सदेखील दबला.

"आपण 'ओ' गेटकडे जाऊ या," तो ऑटोच्या कानात म्हणाला. "माझ्या ओळखीचं गेट आहे ते."

ते पश्चिम दिशेने चालू लागले. लवकरच त्यांना ती इंग्रजी 'ओ' अक्षराची भव्य कमान लागली. तिचा ओक लाकडाचा मजबूत दरवाजा बंद होता आणि दरवाज्यावरचे लोखंडी खिळे यांच्याकडे रोखलेले होते. मॅक्स पुढे झाला आणि एक मोठा धोंडा घेऊन त्याने दरवाज्यावर थाडथाड प्रहार केले. त्यांचे नुसते प्रतिध्वनी उमटले. दरवाजा फुटणे शक्य नव्हते.

"फेका आपला दोर!" मॅक्स म्हणाला. पुनश्च ती दोराची कसरत करून झाली. या खेपेस दोर चढणे सोपे गेले की कठीण, हे सांगणे कठीण आहे. कारण दमणाऱ्या पायांना ते लोखंडी खिळे मधूनमधून आधार जसे देत होते तसे टोचायलाही कमी करीत नव्हते. पण अखेरीस हीही तटबंदी ओलांडून झाली.

●

२१. कोण आहे ते?

स्टालस्टाटचा बाहेरचा परिसर ओलांडून 'ओ' विभागात येताच मॅक्स म्हणाला, "हे माझं जुनं वर्कशॉप. जुन्या आठवणी जाग्या होत आहेत खऱ्या; पण इथल्या भट्ट्या आज थंडावल्या आहेत आणि लोखंडी रूळ गंजले आहेत. तरी पण आपल्या उपयोगाचं काही ना काही इथे मिळेल."

हे म्हणत असतानाच भिंतीवर टांगलेली काही हत्यारे त्याने भराभर गोळा केली.

याला लागून पलीकडे जास्तच मोह पाडणारा एक विभाग होता. तो म्हणजे उपाहारगृह! तिथे पोचताच दोघांनी काऊंटरपाशी बैठक मारली आणि गोठवलेले मटण व पेये यांचा समाचार घेतला. फराळ चालू असतानाच मॅक्स पुढील व्यूह रचीत होता. 'सेंट्रल ब्लॉक' ची भिंत दोराच्या साहाय्याने ओलांडणे ही अशक्यच गोष्ट आहे हे त्याला पक्के माहीत होते. म्हणजे त्या ब्लॉकमध्ये दरवाज्यातून जाणेच भाग होते आणि तो दरवाजा कुठे असेल, कसा असेल याचा त्याला अजिबात पत्ता नव्हता. कारण त्या वेळी त्याला नेले होते डोळे बांधून.

स्फोटक द्रव्य वापरून भिंतीला भगदाड पाडणे हा एक मार्ग होता; पण तो अतोनात धोक्याचा. कारण शुल्झने कुठे कुठे सापळे लावलेले असतील, सुरुंग पेरले असतील त्याचा नेम नव्हता. जिवावरच्या धोक्याला अर्थात मॅक्स डरत नव्हता. आपल्या आयुष्यातले हे अंतिम धाडस आहे हे जाणूनच ते करण्याचे मॅक्सने ठरवले. दगडाचे मोठमोठे चिरे एकत्र लिंपून ही भिंत बनवलेली होती. भिंतीच्या अगदी तळाशी दोघांनी कुदळी हाणून एक खळगा खणला. हे खोदकाम पुरे होईपर्यंत दहा

वाजले होते. त्या खळग्यात त्याने फ्यूजचे एक टोक बुडवून ठेवले; अन् दुसरे टोक हातात धरून तो खूप दूर गेला अन् तिथे त्याने ते टोक पेटवले. तेलात भिजवलेली ही वात जळायला पाच मिनिटे लागतील असा त्याचा अंदाज होता आणि या जागेखालच्या भक्कम तळघरात कॅन्टीन आहे हे त्याला माहीत होते तेव्हा ऑटोला बरोबर घेऊन तो तिकडे धावला. मग दोघे जीव मुठीत धरून आता काय होते याची वाट पाहत उभे राहिले.

मिनिटांमागून मिनिटे गेली अन् मग साऱ्या बांधकामाला - इतकेच नाही तर तळघरालासुद्धा एक जबरदस्त हादरा बसला. भूकंपाने हलावा तसा सारा परिसर हादरला. दुसऱ्याच क्षणी आवाजाचा असा काही धूमधडाका झाला की जणू तीन–चार तोफांनी एकसाथ भडिमार सुरू केला आहे. लगोलग बाहेरच्या बाजूस सर्वत्र दगडधोंडे नि ढेकळे यांची वृष्टी व्हायला सुरुवात झाली. छपरे धाडधाड कोसळत होती, तुळया कडाकड मोडत होत्या, भिंती कोलमडत होत्या. काचा फुटल्याचा किचकिचाट त्यातच मिसळला होता. सुदैवाने तळघर मात्र सुरक्षित होते.

काही क्षण निघून गेले. तो भयंकर कर्णकर्कश धबधबाट आता थांबला आहे अशी पूर्ण खात्री झाल्यावरच मॅक्स नि ऑटो यांनी तिथून बाहेर पडण्याचे धाडस केले.

कुठलाही स्फोट झाल्यानंतर त्या भागातली परिस्थिती काय बनते याची मॅक्सला पुरी कल्पना असूनही आता त्याच्या दृष्टीला जे काही पडले ते बघून तो अवाक् बनला. नजरेच्या टप्प्यात येणारा अर्धाअधिक आसमंत म्हणजे अक्षरश: उकिरडा बनला होता. जिकडे तिकडे दगडधोंड्यांचे नि मातीच्या ढेकळांचे ढिगारे पडले होते. त्यातच जळक्या

लाकडांमधून निघणारा धूर धुमसत होता; अन् वर उडालेल्या धुरळ्याचे ढग हळूहळू जमिनीकडे झेपावत होते. ती धग चुकवीत अन् काचांच्या तुकड्यांवर पाय पडू नये म्हणून जपत त्यांना वाट काढावी लागली.

ऑटो - मॅक्स आता अंतर्भागातल्या भिंतीकडे धावले. त्या भिंतीचाही पंधरा - वीस फूट लांबीचा भाग तडकला होता. आतले दालन स्पष्ट दिसत होते. याच दालनात आपण कितीतरी कंटाळवाणे तास घालवल्याचे मॅक्सला आठवत होते. आता तिथे पहारा वगैरे नसल्याने ऑटोला घेऊन तो बिनदिक्कत आत शिरला.

इथेही भयानक शांतता होती. ज्या खोलीत मॅक्सने दोघा चष्मेवाल्या विद्वानांपुढे परीक्षा दिली होती त्या खोलीत त्यानेच काढलेला स्टीम-इंजिनचा एक आराखडा अर्धवट अवस्थेत पडलेला होता. अर्धवट, कारण तो रेखाटत असताना मधेच शुल्झने बोलावल्यामुळे त्याला जावे लागले होते. ग्रंथालयात त्याच्या ओळखीची पुस्तके नि चोपड्या विस्कटून पडलेल्या होत्या.

दोघेही आता सेंट्रल ब्लॉकच्या अगदी आतल्या सीमेपर्यंत पोचले होते. इथेही एक मंडलाकार भिंत होती. याच भिंतीपलीकडे असणार तो सदा फुललेला बगीचा.

"याही भिंतीला नाचायला लावू या का?" ऑटोने विचारले. तेव्हा मॅक्स म्हणाला, "माझी हरकत नाही; पण आधी एखादं दार सापडतं का पाहूया. दार जास्ती लवकर उडवता येईल."

त्यांनी भिंतीला जपून घेराव घातला तेव्हा त्यांना खरोखरीच एक चिंचोळे दार सापडले. तेही भक्कम ओक लाकडाचे बनवलेले होते. पण त्याला छिद्र पाडण्यात त्यांना यश मिळाले. त्या छिद्राला डोळा लावून मॅक्सने बघितले. त्याचा अंदाज खरा होता. पलीकडच्या बाजूस

त्याला फुलझाडे दिसली.

"हे दार फोडायला सुरुंगाची दारू कशाला हवी?" असे म्हणत ऑटोने हातातल्या कुऱ्हाडीने त्याच्यावर घाव घातला.

दरवाजा हलंल्यासारखा वाटला; पण मग जो बारीक आवाज झाला तो किल्ली फिरवल्यांचा अन् कडी सरकवल्याचा होता.

दार अर्धवट उघडले. आतल्या बाजूस साखळी अडकवलेली होती.

त्याच क्षणी जर्मन भाषेत केलेला सवाल त्यांच्या कानावर पडला, "वेर डा? कोण आहे ते?"

●

२२. स्टालस्टाटच्या गाभाऱ्यात

गोळीबार झाला असता तरी बसला नसता एवढा आश्चर्याचा धक्का त्यांना माणसाच्या आवाजाने बसला. दोघेही गप्प राहिले. त्यांची जणू वाचाच बसली होती.

"वेर डा?" आव्हानाचा पुनरुच्चार झाला. मॅक्स दचकला. त्याने आता जर्मन भाषेतच उत्तर दिले.

तो म्हणाला, "दोस्त असेल, दुष्मन असेल, मला भेट हवी आहे हेर शुल्झ यांची."

उत्तरादाखल ऐकू आला एक उद्‌गार : "आक्ख!"

मॅक्सने फटीतून पाहिले. त्याला दिसला. लाल पिंग्या रंगाचा केसांचा झुपका. मग एक मिशी आणि मग एक सुस्तावलेला डोळा. ही मूर्ती सिगिमारची आहे हे त्याने ओळखले. सिगिमार म्हणजे त्याच्यावर नजर ठेवण्यासाठी नेमलेल्या त्या दोन राक्षसी रक्षकांपैकी एक.

"जोहान श्वार्झ!" राक्षस पुटपुटला. त्याच्या मंद बुद्धीलाही आश्चर्याचा धक्का बसला असावा - "हा माणूस जिवंत कसा?"

"नेणार का मला शुल्झसाहेबांकडे? बोल!" मॅक्सने पुन्हा प्रश्न केला.

सिगिमारने मान हलवली. "ऑर्डर नाहीये!" छिद्रातून शब्द आले, "ऑर्डरशिवाय आत घेणार नाही!"

"मी भेटायला आलोय एवढं तरी सांग ना साहेबांना."

"साहेब इथे नाहीत. साहेब गेले," सिगिमारच्या शब्दात खिन्नता उमटली होती.

"मग कुठे आहेत ते? केव्हा परत येतील?"

"माहीत नाही. पण कुणालाही आत घेण्याची ऑर्डर नाही!"

प्रत्येक उत्तर तुटक पण ठासून. ते ऐकून दोघांपैकी जास्त चिडला - ऑटो.

"ऑर्डर गेली खड्ड्यात!" तो मॅक्सला म्हणाला, "आपण सरळ आत घुसू या!"

त्याने दारावर धक्के मारले. परिणाम एवढाच झाला की कडी लावली गेली. साखळी अडकवली गेली.

ऑटो आणखीच चिडला. "आत एकटा माणूस नाही. जास्ती जण असावेत," तो म्हणाला.

आता मॅक्सने छिद्राला डोळा लावला, "आर्मिनियस असणार!" तो म्हणाला. अन् जास्त जोरात ओरडला, "उघडतोस की नाही?"

उत्तरादाखल छिद्रातून आत आली एक संगीन.

"ठीक आहे!" मॅक्स म्हणाला, "शस्त्राला उत्तर अस्त्राने मिळेल!" आणि लगेच थोडी दारू दरवाज्याखाली खोवून त्याने वात पेटवून दिली. तत्क्षणी दरवाज्याच्या ठिकऱ्या उडाल्या. हातात रिव्हॉल्वर नि दातांत उघडे चाकू धरून मॅक्स नि ऑटो दाराबाहेर पडले.

ते आता बागेतल्या हिरवळीवर आलेले होते. ते निसर्गदृश्य पाहून ऑटोला हर्ष झाला.

"किती सुंदर देखावा हा!" तो उद्गारला. "उष्ण प्रदेशातच वाढणारी ही फळाफुलांची झाडं इथं कुठून आली?....तरी पण मॅक्स," बोलता बोलता त्यानं आवाज एकदम खालावला होता, "आपण इथून जपूनच गेलं पाहिजे बरं का? कुठल्या झुडपाआड एखादा बदमाष लपून बसला असेल काही सांगता येत नाही."

बागेतून जाणाऱ्या दोन वाटा होत्या. पण दोन्हींत अंतर फारसे नव्हते.

ऑटो डाव्या वाटेवरून निघाला; तर मॅक्स उजवीकडे वळला. दोघेही हातातली पिस्तुले रोखून दबकत दबकत जात होते. मधेच एखादे मोठे झाड दिसले की उडी मारून त्याच्या आड आसरा घेत होते.

शंभर एक यार्ड अंतर चालून झाले नाही तोच आणखी एक गोळीबार झाला. क्षणापूर्वी मॅक्सने जे झाड सोडले होते, त्याच्या खोडावर गोळी आपटली अन् त्याचा छिलका उडाला.

"प्रकरण गंभीर आहे, मॅक्स!" ऑटो म्हणाला. "खाली वाक....रांगत चाल!"

आणि लगेच स्वत: भुईसपाट होऊन तो सरपटत चालू लागला. मॅक्सने मात्र इतक्या तातडीने त्याचे अनुकरण केले नाही. परिणाम असा झाला की बंदुकीची आणखी एक गोळी त्याला जवळजवळ चाटून गेली. त्याने पटकन् उडी मारून दुसरे झाड पकडले नसते तर त्याची धडगत नव्हती.

"एवढं बरं आहे," ऑटो म्हणाला, "की नेमबाजीचा यांना फारसा सराव दिसत नाही!"

"ए!" मॅक्स हलक्या आवाजात गुरकावला. "गप्प बैस! समोरच्या चौकात ती बिल्डिंग दिसते ना, तोच बुलटॉवर! त्याच्या तळमजल्याच्या काचा फुटलेल्या दिसतात आणि तिथे धूर बघ किती साचलाय! तिथे नक्की राक्षस दबा धरून बसले असतील. पण थांब, मला एक युक्ती सुचलीय!"

एका ताडाच्या झाडाची जाडजूड फांदी त्याने चाकूने तोडून घेतली; तिच्या बेळक्यावर आपला कोट ठीकठाक बसवला अन् टोकावर टोपी ठेवून दिली. हे बुजगावणे मातीत खोचून तो चट्दिशी बाजूला झाला.

"तू पिस्तूल झाडत राहा - आणखी थोड्या काचा फोड! तोवर

मी त्यांना पिछाडीकडून गाठतो."

ऑटोच्या पिस्तुलातून सटासट गोळ्या सुटू लागल्या अन् खिडक्यांनी आणखी तावदाने फुटली. उत्तरादाखल शत्रूने केलेल्या गोळीबाराने बुजगावण्याच्या चिंधड्या झाल्या.

तिकडे मॅक्स सपाट्याने उड्या मारीत टॉवरच्या मागच्या बाजूस गेला. पंधरा एक मिनिटे गेली अन् गोळीबार एकाएकी बंद पडला. ऑटोला आरोळी ऐकू आली "धाव धाव! लवकर ये - मी त्याला पकडलाय!"

●

२३. पहारेकऱ्यांचा परामर्श

"धाव - मी त्याला पकडलाय्!" ही मॅक्सची आरोळी ऐकून ऑटो त्या दिशेने धावला. पाहतो तर मॅक्स खोलीत शिरला असून त्याची नि सिगिमारची जोरदार झुंज चालू आहे. दोघेही एकमेकांना आवळून धरून जमिनीवर आडवे पडले होते अन् लोळत होते. सापाला मुंगसाने विळखा घालावा तसे ते दृश्य होते. मॅक्सने अगदी अनपेक्षितपणे हल्ला केल्यामुळे सिगिमारला शस्त्र वापरणे शक्य झाले नव्हते. पण त्याच्या शरीराची ताकदच इतकी जबरदस्त होती की स्वत: खाली पडल्यावरही त्याने आपल्या वाघासारख्या पंज्यात मॅक्सची मानगूट दाबून धरली होती. ऑटोला तिथे पोचण्यास आणखी क्षणाचा विलंब लागला असता तर मॅक्सचा जीव वाचणे कठीण झाले असते. आता ऑटोने झडप घालून सिगिमारची ती राक्षसी मिठी सोडवली. मग दोघांनी मिळून त्याला यथेच्छ बुकलला आणि तो पुरा चीत झाल्यावर त्याला नि:शस्त्र करून दोरीने पक्के बांधून टाकले.

"दुसरा कुठे आहे?" ऑटोने ताठ होत विचारले.

मॅक्सने बोट दाखवले. खोलीच्या दुसऱ्या कडेला आर्मिनयसचे धूड निश्चल पडले होते.

"त्याला गोळी लागली. ठार झालाय तो!" मॅक्स अजूनही दबलेल्या आवाजात बोलत होता, "चल! आपण आता या जागेचे मालक झालोत!"

या खोलीतून त्या खोलीत असे करीत करीत दोघेही टॉवरच्या अगदी अंतर्भागापर्यंत जाऊन पोचले. सोनेरी अन् हरितवर्णी भिंतींचे ते भव्य सुशोभित दालन त्यांनी गाठले. तिथला थाटमाट पाहून ऑटो थक्क झाला. मॅक्सचा मात्र त्या वैभवाशी परिचय होता. त्याला आश्चर्याचा

धक्का बसला तो दुसऱ्याच कारणामुळे. त्या विस्तीर्ण खोलीत कागदांचा एवढा पसारा पडलेला होता की एखाद्याला वाटावे आपण न्यूयॉर्कच्या पोस्ट ऑफिसात तर आलेलो नाही ?

त्या उकिरड्यात शुल्झसाहेबांचे सारे दस्तऐवज नि सारी पत्रापत्री चिंध्या होऊन पडली होती. बिले, धनादेश, मनिऑर्डरी या साऱ्यांची मिळून लाखांनी गणती करता आली असती. पण सर्वच्या सर्व आता मातीमोल झाले होते. कारण त्यातल्या लखोट्यांची सिले फोडून त्यांना मोल देणारा तो हुकुमशाही हात दृष्टीआड झाला होता. कुठे असेल तो हात ? कुठे असेल त्या हाताचा मालक ?

"अजून आपण त्या गुप्त जागेत गेलेलो नाही!" मॅक्सचा स्वर त्या 'कागद महाला'त विलक्षण गंभीरतेने घुमत होता.

त्याने सभोवार नजर फिरवली. पुस्तकांनी भरलेली कपाटेच्या कपाटे

तिथे होती. काही उद्ध्वस्त, काही कशीबशी उभी. त्यांतल्या कुठल्या कपाटात ते गुप्त दार असेल बरं ?

त्याने भराभर पुस्तके उपसायला सुरुवात केली. ऑटोने त्याचे अनुकरण केले. दोघांनी हातातल्या काठ्यांनी कपाटांचे कप्पे टोकरून पाहिले. काही उपयोग झाला नाही. कुठेही आत पोकळी असेल असे वाटेना.

"कदाचित" मॅक्स म्हणाला, "आपलं रहस्य फुटलं, आता त्याचा काही उपयोग नाही असं जाणून शुल्झने ते बुजवून टाकलं असेल."

"पण मग दुसरं एखादं दार त्याने खोदलं असणार! त्याशिवाय तो इथून जाणार कसा ?"

"आणि कुठे ?"

"थांब आपल्या पायांखालच्या गालिच्यात तर नसेल एखादं चोरदार ?"

गालिचा कुठेही कापलेला दिसत नव्हता. पण त्याला जमिनीत पक्केपणी रोवणारा प्रत्येक खिळा त्यांनी उचकटून पाहिला. त्याचाही काही उपयोग झाला नाही.

"पण चोरदार याच खोलीत असेल अशी तुला खात्री वाटते का ?" ऑटोने विचारले.

"पूर्ण खात्री वाटते !"

"मग आता एकच बाजू तपासण्याची राहिली" असे म्हणून ऑटोने वर बघितले. "छत !"

हे बोलत असतानाच तो एका उंच स्टुलावर चढला होता. त्याने पिस्तूल काढून हातात धरले होते.

छताला मध्यभागी एक अतिभव्य झुंबर लोंबत होते. त्यातला मधला मोठा लोलक गुलाबपुष्पाच्या आकाराचा होता. पिस्तुलाच्या दस्त्याचा फटका मारून तो फोडावा असे ऑटोने योजले होते. पण आश्चर्याची

गोष्ट ही की त्याने डाव्या हाताने लोलक पकडला मात्र, संपूर्ण झुंबर सपाट्याने वर सरकले अन् वरच्या पोकळीत दिसेनासे झाले. दुसऱ्याच क्षणी पोकळीतून खाली सरकत आली एक लोखंडी शिडी.

या दोघांपुढे उभे ठाकलेले ते जणू एक आव्हान होते - किंवा आवाहन म्हणा !

"चल !" मॅक्स म्हणाला. "आपल्याला वरचा मजला बोलावतोय !"

आणि वरचा मजला चढून गेल्यावर त्यांना काय दिसले ?

●

२४. भीतीने गोठवणारे दृश्य

छताच्या पलीकडे लोखंडी शिडीचे वरचे टोक, एका भिंतीत अडकवून ठेवलेले होते आणि ती भिंत होती एका वर्तुळाकार खोलीची. हे दोघे तरुण शिडी चढून वरच्या गोल दालनात आले.

दोघांनी क्षणभर एकमेकांकडे पाहिले. मग सभोवार दृष्टी फिरवली. त्यांच्या असे लक्षात आले की ज्या गोल दालनात आपण आलो आहोत ते खूपच प्रशस्त आहे, पण सर्व बाजूंनी बंद. आणि तरी खोलीत अंधाराऐवजी लख्ख प्रकाश पसरलेला आहे. झगमगीत पण शीतल. जणू काही पौर्णिमेचे चांदणे. हा चंद्र आहे तरी कुठे म्हणून त्यांनी जिज्ञासेने वर पाहिले. तर चंद्र वर नसून खालच्या तक्तपोशीत मध्यभागी तळपत होता. जाड काचेच्या एका भिंगातून तो प्रकाश आत येत होता, काच आतून बाहेरून बर्हिगोल होती; त्यामुळे भिंगातून येणाऱ्या प्रकाशाचे तेज दसपटीने वाढलेले होते.

या हवाबंद दालनात संपूर्ण शांतता नांदत होती. स्मशानशांतताच म्हणा ना! त्यांना खरोखरीच असा भास झाला की आपण कुणाच्या तरी समाधीत प्रवेश केला आहे; आणि या समाधीचा भंग आपण करता कामा नये. काही क्षण दोघेही गप्प उभे राहिले.

मग मॅक्स तक्तपोशीतल्या त्या प्रकाशभिंगावर वाकला. लगेच ऑटोनेही तसेच केले.

काय दिसले त्यांना?

एक अगदीच अनपेक्षित असे भयानक दृश्य.

प्रो. शुल्झ यांची ती गुप्त प्रयोगशाला होती. आत दोन झगमगीत गोल दिवे पेटलेले होते. त्यांना विद्युतघटद्वारा विजेचा कायम पुरवठा

केलेला असावा. खोलीत मध्यभागी एक टेबलखुर्ची होती आणि खुर्चीत बसलेली होती एक मूर्ती. ती मूर्ती म्हणजे जिवंत माणूस असणार, असेच कुणालाही प्रथमदर्शनी वाटले असते. मात्र त्याची डोळ्यांबाहेर डोकावणारी बुबळे अन् विकट हास्य करणारी जिवणी, अन् तीत लखलखणारे दात पाहताक्षणी मॅक्सने ओळखले की हा पोलादपती शुल्झच आहे. पण तो जिवंत नाही; मेलेला आहे! त्याने स्वतःच तयार केलेल्या मृत्युयंत्राचा स्फोट होऊन जी कल्पनातीत थंडी निर्माण झाली तीत त्याचे शरीर गोठले असणार अन् हा पुतळा तयार झाला असणार!

बर्हिगोल भिंगामुळे दसपट मोठा वाटणारा तो भीषण पुतळा पाहून दोघांच्याही अंगावर शहारे आले. किती दिवस झाले असतील या माणसाला समाधिस्थ होऊन? जवळजवळ एक महिना! त्या सबंध महिनाभरात हे प्रेत असेच टेबलाशी बसून होते; पण बाहेरच्या जगाला त्याचा पत्ता नव्हता. धृवप्रदेशातल्या गारढोण जमिनीत बर्फाखाली गाडलेला एखाद्या प्रचंड प्रागैतिहासिक प्राण्याचा देह सापडावा तसे ते भयंकर दृश्य होते. पायाखालच्या त्या बंद जागेतले सारेच मुळी थिजलेले, गोठलेले. तिथले वातावरण काय अन् आजूबाजूच्या बरण्यांमधून भरलेली रसायने काय, पारा काय, साऱ्याचे थिजून बर्फ झालेले.

शुल्झ टेबलावर वाकलेला होता. दात विचकीत तो खाली पाहत होता. त्याच्या पुढ्यात एक उघडी वही होती अन् हातातल्या लेखणीने तो कागदावर काहीतरी लिहीत होता. म्हणजे त्याचे प्रेत काहीतरी लिहीत होते.

दोघाही तरुणांची शरीरे अजून काट्यांनी फुललेली होती. पण मन थोडे ताळ्यावर येताच मॅक्सला वाटले की हे दृश्य कितीही भीतिदायक



असले तरी ते आपण बाहेरून बघतो आहो ही किती भाग्याची गोष्ट आहे! नशीब म्हणायचं की हे भिंग फोडण्याची बुद्धी आपल्याला झाली नाही. तसं आपण केलं असतं तर इथलंही वातावरण गोठलं असते अन् आपलेही पुतळे बनले असते!

हा भीषण अपघात कसा झाला असेल याची कल्पना मॅक्सला लवकरच आली. पुतळ्याच्या आसपास खोलीभर जे पांढरे चकचकीत तुकडे पसरलेले होते त्या फुटलेल्या काचा होत्या. शुल्झच्या तोफांचे कुलपी गोळे आतून पोकळ होते अन् त्यांच्या पोकळीत द्रवरूप कार्बनडायऑक्साईड भरलेला होता याची त्याला आठवण झाली; त्याचा अतिप्रचंड दाब सहन करण्याइतक्या जाड काचेच्या कुप्यांमधून तो मृत्युरस भरलेला होता. साध्या काचेच्या दहा किंवा बारापट प्रतिकारशक्ती त्या काचेची होती. आणि तरी मॅक्सला हेही माहीत होते की या नवनिर्मित शोधाचे एक वैगुण्य हे की कधी कधी कोणती तरी अनपेक्षित रहस्यमय क्रिया घडून या कुपीचा स्फोट होतो. त्याचे कारण काय असेल ते शास्त्रज्ञांनाही कळले नाही. प्रयोगशाळेत ठेवलेल्या कुलपी गोळ्यांचा अचानक स्फोट झाला असावा अन् आतल्या द्रवरूप रसायनाचा वायू बनून त्यामुळे सारे वातावरण थंड बनले असावे. थंड म्हणजे गारठोण. शून्याच्या खाली शंभर अंश! अर्धाक्षण स्तिमित भयचकित झालेल्या शूल्झचे हां हां म्हणता दगडी पुतळ्यात रूपांतर झाले असावे.

आणि हे होत असताना हा माणूस काहीतरी लिहीत होता, काय लिहीत असेल तो? ते नक्कीच वाचण्यासारखं असेल कारण मरतानाचे त्याचे ते विचार असणार.

शुल्झचे हस्ताक्षर मॅक्सच्या ओळखीचे होते आणि आता भिंगामुळे ते खूपच मोठे झाले होते. त्यामुळे थोडे कष्ट घेतल्यावर तो मजकूर वाचणे मॅक्सला शक्य झाले.

ते अखेरचे शब्द शुल्झसारख्या हुकुमशाहाला शोभण्यासारखे होते. ती एक जर्मन भाषेतली आज्ञा होती....ऑर्डर!

''बी. के. आर. झेड यांना फर्मावण्यात येते की फ्रँकव्हिल

वरचा हल्ला नियोजित वेळेच्या एक पंधरवडा लांबणीवर टाकावा. ही ऑर्डर हातात पडताच मी सांगून ठेवलेली प्रत्येक कृती त्या क्रमाने करावी. तीत यत्किंचित चूक होता कामा नये. आजपासून पंधरा दिवसात फ्रँकव्हिल शहर नष्ट झाले पाहिजे. तिथला एकही नागरिक जिवंत राहता कामा नये.

डॉ. सॅरासिन आणि मॅक्स ब्रुकमान यांचे मृतदेह माझ्याकडे धाडले जावेत. मला ते हवे आहेत.

शुल्झ''

शुल्झने सही करताना शेवटचे अक्षर नीट उमटले नव्हते. ते थरथरले होते. ती नेहमीची सही नव्हती. कोणत्याही बँकेने ती मान्य केली नसती.

मॅक्स आणि ऑटो कितीतरी वेळ एकमेकांकडे पाहत निश्चल उभे होते. कुणातरी मांत्रिकाने केलेला जादूटोणा बघावा तशी त्यांची अवस्था झाली होती. तो उदासवाणा देखावा शक्य तितक्या त्वरेने दृष्टीआड करणे भाग होते.

दोघेही मागे वळले; आणि भिंतीतल्या चोरदारातून बाहेर पडले. लोखंडी शिडी त्यांची वाटच पाहात होती. तिच्या पायऱ्या झरझर उतरून ते खाली गेले मात्र, शिडी वर निघून गेली अन झुंबर सरकत पूर्वजागी आले.

आता त्या छताच्या आड गोल भिंतीच्या तळाशी गारठलेल्या प्रयोगशाळेत त्या अतिबुद्धिमान पण अति क्रूर शास्त्रज्ञाचा पुतळा गोठलेल्या अवस्थेत तसाच बसून राहणार होता. किती काळ? विद्युद्‌घटातील शक्ती संपताच दिवे विझले असते. पण हे प्रेत अंधारात तसेच बसून राहणार होते - शतकानुशतके. पिरामिडमधल्या प्रेतासारखे 'ममी' बनून.

खाली हातपाय बांधून कैद केलेला सिगिमार अजून जिवंत होता.

त्याच्या काढण्या सोडवून त्यांनी त्याला मुक्त केले. तेव्हा आपल्याला मिळालेल्या मुक्तीचे करायचे काय हेच त्याला कळेना. त्याला हतबुद्ध स्थितीत तसाच सोडून मॅक्स नि ऑटो त्वरेने तिथून निघाले. परतीचा प्रवास त्यांना वाटला होता तितका कंटाळवाणा झाला नाही. कारण, नुकत्या घेतलेल्या भयानक अनुभवामुळे त्यांची मने जणू गोठून गेली होती.

●

२५. शेवट गोड !

ते घरी पोचले तेव्हा डॉ. सॅरासिन आपल्या अभ्यासिकेत काही वाचत बसले होते.

"खबर चांगली आहे," मॅक्स म्हणाला, "काका, आता काळजीचं कारण उरलेलं नाही----शुल्झ मेला !"

डॉक्टरसाहेब काही क्षण नि:स्तब्ध बसले. त्यांच्या तोंडून एकही उद्‌गार निघाला नाही. नंतर ते म्हणाले, "मुलांनो, तुम्हाला वाटलं असेल की ही बातमी ऐकून मला आनंदाच्या उकळ्या फुटतील. कारण एका गोष्टीची काळजी आता खरोखरच दूर झाली.

"पण माझ्या मनाला होणारी वेदना तुम्हाला समजते का ? त्या वेदनेचं कारण हे की एका अतिबुद्धिमान, अत्यंत प्रतिभाशाली व्यक्तीने असं मूर्खासारखं का वागावं ? आपल्या अंगच्या गुणांचा त्याने समाजाच्या कल्याणासाठी वापर का करू नये ? शहरेच्या शहरे उध्वस्त करणारी अन् लाखो नागरिकांना ठार करणारी अस्त्रं त्याने कशाला शोधून काढावीत ?"

आता मॅक्सने त्या प्रकाराची तपशीलवार माहिती डॉक्टरांना सांगितली; आणि त्याने शुल्झच्या अखेरच्या लिखाणाची जी नक्कल करून आणली होती ती त्यांच्यापुढे ठेवली. तो पुढे म्हणाला, "पण शुल्झसाहेब आपल्या सीलबंद कोठीत पुतळा होऊन पडलेत. जगाच्या दृष्टीने त्यांच्या मृत्यूचा तात्कालिक पुरावा हा की सारं स्टालस्टाट शहरंच मुळी मृतावस्थेत आहे. तिथे एकही जिवंत प्राणी नाही."

"चौकीदार सिगिमार सोडला तर!" ऑटो पुटपुटला. "पण तो तरी आता आहे की नाही कुणास ठाऊक !"

"झोपी गेलेली राजकन्या आणि तिची नगरी यांची ती परीकथा

आहे ना'' मॅक्स म्हणाला, ''तशी अवस्था झालीय त्या पोलादी शहराची!''

डॉक्टरकाका, तुम्ही कितीही म्हणालात तरी शुल्झ हा युद्धाची खुमखुमी असलेला रणराक्षस होता. तो मरण पावल्याने जगाचं होणारं मोठं नुकसान टळलं आहे हे गाळीव सत्य खरं आहे ना?''

''युद्ध - त्यातून आजकालचं युद्ध हा एक निंद्य प्रकार आहे हे अगदी खरं. ही संहारक वृत्ती हाणून पाडून आपण तिला विधायक वळण देऊ शकणार नाही का?'' समजा, असं केलं तर?''

''कसं?''

''स्टालस्टाटमध्ये प्रचंड यंत्रसामुग्री आहे, तीत आवश्यक तो फेरबदल करून आपण ती चांगल्या कामासाठी वापरू शकणार नाही का? तसं केलं तर कितीतरी उत्तमोत्तम कारखाने आपण उभे करू शकू!''

डॉक्टरांच्या मुखावरचे चिंतेचे पटल हळूहळू दूर होत होते. ते आता उत्तेजित सुरात म्हणाले, ''तुझी कल्पना छान आहे, मॅक्स! तू पत्करशील का ही जबाबदारी?''

''अवश्य पत्करीन!''

''आणि त्याच्या हाताखाली मी आनंदाने काम करीन!'' ऑटोने लगेच त्याला टेकू दिला. ''पण एका अटीवर!''

''अट? ती कोणती?''

''तिथल्या काही साध्या तोफा तरी आपण जशाच्या तशा ठेवायला हव्यात! आपल्यावर पुन्हा एखादा रणराक्षस हल्ला करायला आला तर? प्रत्येक देशाला संरक्षण हे हवंच असतं!''

डॉ. सॅरासिन यांच्या मुखावर एक म्लान हास्य झळकले. काही झाले तरी युद्धावर जाऊन आलेला ऑटो व्यवहार बोलत होता.

नंतर काही वेळ डॉक्टरसाहेब गप्प होते. त्यांच्या विचारांनी एक वेगळीच दिशा घेतली होती. ते मग एकदम म्हणाले, ''स्टालस्टाटच्या

पुनर्रचनेबद्दल नंतर बोलूया. तो विषय सामाजिक स्वरूपाचा आहे. आता आपण वळूया एका वैयक्तिक विषयाकडे. आपण तिघेही या समाजकार्यात इतके बुडून गेलोत की प्रत्येक माणसाला काही वैयक्तिक जबाबदाऱ्या असतात हेही आपण विसरून जातो. आपल्या आवडत्या व्यक्तींची आठवण देखील अशा वेळी आपल्याला राहत नाही!''

''असं मुळीच नाही, डॉक्टरकाका!'' मॅक्स ठासून म्हणाला. ''मी घरापासून कितीही दूर गेलो तरी तुमची अन् मामाची आठवण मला सतत होत राहिली आहे. तुमची दोघांची आणि — आणि जीनेटची!''

''तेच मला सुचावायचं होतं!'' डॉ. सॅरासिन हसत म्हणाले. ''मॅक्स, आज जीनेट नि तिची आई इथे नसली तरी त्यांची आठवण मला नि ऑटोलाही नित्य होत असते. तुला ती व्हावी हे विशेष महत्त्वाचं आहे. तुझ्या गैरहजेरीत जीनेटला फ्रान्समधल्या कितीतरी श्रीमंत अन् गुणी तरुणांकडून लग्नाची मागणी आली होती. पण प्रत्येक मागणी तिने फेटाळून लावली. आणि याचं कारण काय? तिने एक दिवस आपल्या आईजवळ मन मोकळं केलं. मॅक्स, ती तुझी वाट पाहते आहे! तुझी संमती आहे ना?''

''संमती? मॅक्सला हे ऐकून काय वाटले ते तो शब्दांनी कसे सांगणार? त्याच्या चेहऱ्यावरची लालीच काय ते उत्तर देत होती.

जीनेट वाट पाहात होती?

आणि हे जावईबापू? तेही वाटच पाहत होते की. पण त्यांना ही जाणीव इतक्या प्रकर्षाने आत्ता कुठे होत होती!

मित्रांनो, असा गोड शेवट करून आपण फ्रँकव्हिल नगरीचा अन् या कुटुंबाचा इथेच निरोप घेऊया!

● ○ ●

अचाट साहसाने भरलेल्या ज्यूल व्हर्न कादंबऱ्या

ज्यूल व्हर्न (१८२८-१९०५) हा फ्रान्समधला एक विज्ञानवेडा कादंबरीकार. त्याच्या प्रतिभेने पृथ्वी, समुद्र, आकाश तर व्यापलेच पण अंतराळातसुद्धा भराऱ्या मारल्या. अवजड विमान आकाशोड्डाण करू शकेल ही गोष्ट लोकांना खरी वाटली नसती अशा काळात त्याचा कथानायक 'हवाई हुकुमशहा' कॅ. रोबर याने वाचकांना आपल्या खास विमानातून जगभर हिंडवून आणले. पृथ्वीवर जेव्हा उत्पात झाला तेव्हा त्याचे कथानायक 'धूमकेतूच्या शेपटावर स्वार' होऊन सूर्याकडे रवाना झाले!

हे विज्ञानसृष्टीतले चमत्कार तुम्ही पहिल्या संचात वाचलेत. आता हा पाच कादंबऱ्यांचा दुसरा संच वाचा. रॉकेट हा प्रकार आत्ता कुठे तुम्हा आम्हाला माहीत झाला आहे. शंभर वर्षांपूर्वी ते शक्य तरी होते का? पण ज्यूल व्हर्न रॉकेटसाठी थांबला नाही. त्याने आपल्या बहाद्दर मानसपुत्रांना तोफेच्या पोकळ गोळ्यात बसवून धुडमदिशी 'चंद्रावर स्वारी' करायला धाडले! दुसऱ्या एका प्रसंगी त्याचे दुसरे मानसपुत्र ज्वालामुखीच्या विवरात उतरले आणि त्यांनी 'पाताळलोकची अद्‌भुत यात्रा' केली!

पण ज्यूल व्हर्नची लेखणी अशा आगळ्यावेगळ्या वैज्ञानिक कादंबऱ्यातच रमायची असे मात्र नाही. त्याच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची कथानके काल्पनिक असली तरी त्यातले वास्तववादी प्रसंगही इतके अद्‌भुत आहेत की 'बादशाही जासूद' आणि 'एका चिन्याचा जमालगोटा' वाचायला घेतलात की अखेर गाठीपर्यंत पुस्तक हातचे सोडवत नाही!

संच पहिला : १.कॅप्टन ग्रँट तुम्ही कुठे आहात? २.गिरिशिखराचे गुपित ३.हवाई हुकुमशहा ४.कंपनी चालली सूर्याकडे! ५.धूमकेतूच्या शेपटावर

संच दुसरा : १.चंद्रावर स्वारी २.पाताळलोकची अद्‌भुत यात्रा ३.एका चिन्याचा जमालगोटा ४.बादशाही जासूद ५.साता समुद्राचा सुलतान

संच तिसरा : १.निर्जन बेटावरचे धाडसीवीर २.अद्‌भुत व्यक्तीच्या शोधात धाडसी वीर ३.चला उत्तर ध्रुवाकडे! ४.बर्फ भूमीवरचे बहाद्दर ५.ध्रुवाने लावले वेड!

संच चौथा : १.ज्यूल व्हर्नची अद्‌भुत सृष्टी २.झपाटलेला प्रवासी ३.पोलादपूरचा रणराक्षस ४.तीन बलून बहाद्दर